CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १७ जुलै २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २२९ । पाने १२ । किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# गुप्त हल्ल्याची भीती, हाफिजला सुरक्षाकवच

## भारताच्या न्यायालयाने अटक वॉरंट काढल्याने तंतरली

## संरक्षणासाठी विशेष एजंट, माजी कमांडो तैनात

**इस्लामाबाद, १६ जुलै**

पहलगाम दहशतवादी हल्ला प्रकरणात जम्मू-काश्मीरमधील एनआयए विशेष न्यायालयाने लष्कर-ए-तोएबाचा म्होरक्या हाफिज सईदविरोधात अटक वॉरंट काढला, त्यातच गुप्त हल्ल्यात गेल्या सहा महिन्यांत अनेक दहशतवादी मारले गेले. हाफिजवरही हल्ला होण्याची शक्यता पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयने व्यक्त केली. त्यामुळे हाफिज सईद, मसूद अझर आणि सय्यद सलाहुद्दीन याच्यासह २४ कुख्यात दहशतवाद्यांच्या संरक्षणासाठी विशेष एजंट आणि माजी कमांडो तैनात करण्यात आले.


सुरक्षा दलाच्या गराड्यात असलेला हाफिज सईद

पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या रहस्यमय गुप्त कारवायांमुळे दहशतवादी संघटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर भीती पसरली आहे. गेल्या वर्षभरात २३ दहशतवादी हल्ल्यात मारले गेले, यामागे भारताचा हात असल्याचा दावा पाकिस्तानच्या लष्कराने केला. अशातच भारताची राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने पहलगाम हल्ल्याचा सूत्रधार हाफिज असल्याचे आरोपपत्रात नमूद केले. त्यावरून जम्मूच्या विशेष न्यायालयाने त्याच्याविरोधात अटक वॉरंट जारी केला.

हाफिजसह त्याच्या सहकाऱ्यावर मोठा हल्ला होण्याची शक्यता आयएसआयने व्यक्त केल्याने पाकिस्तानी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांची चांगलीच तंतरली. त्यामुळे आयएसआयने, हाफिज सईद, मसूद अझर, युसूफ शाह आणि मुफ्ती मोहम्मद असगर खान यांच्यासह सुमारे दोन डझन दहशतवाद्यांची सुरक्षा वाढवली आहे. लष्कर-ए-तोएबा आणि जैश-ए-मोहम्मद यांसारख्या अनेक दहशतवादी संघटनांचे नेते सतत आपली ठिकाणे बदलत आहेत. आयएसआयने त्यांच्या संरक्षणासाठी एजंट आणि माजी एसएसजी कमांडो तैनात केल्याची माहिती वृत्तसंस्थेने दिली आहे. (वृत्तसंस्था)

### अड्ड्यांवर वाढवली सुरक्षा

पाकिस्तानमधील मंगला धरण, बहावलपूर, रावळकोट, कराची, कोटली, तेरहकलान, सियालकोट, मुरीदके आणि सरजल यासह अनेक दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर सुरक्षा दल तैनात करण्यात आले. ही ठिकाणे दहशतवाद्यांचे लपण्याचे अड्डे आणि प्रशिक्षण केंद्र आहे. गुप्त हल्ल्याच्या भीतीने दहशतवाद्यांच्या सुरक्षेबाबत घबराट पसरल्याने आयएसआय आणि पाकिस्तानी लष्कराने हा निर्णय घेतल्याची माहिती वृत्तसंस्थेने दिली.

### २३ दहशतवादी रडारवर

दहशतवादाविरोधातील शून्य-सहिष्णुता धोरणांतर्गत, भारताच्या गृह मंत्रालयाने बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायद्या (यूएपीए) अंतर्गत २३ जणांना दहशतवादी घोषित केले आहे. यामध्ये १७ पाकिस्तानी आणि ६ भारतीय दहशतवाद्यांचा समावेश आहे. भारतीय दहशतवादी सध्या पाकिस्तानातच आहेत. त्यांच्यावर हल्ला होण्याची शक्यता असल्याचा अहवाल आयएसआयने पाकिस्तानी लष्कराला दिला.

### सुरक्षा वाढवण्यात आलेले दहशतवादी

लष्कर प्रमुख हाफिज सईद, जैशचा संस्थापक मसूद अजहर, हिजबुल मुजाहिद्दीनचा प्रमुख मोहम्मद युसूफ शाह उर्फ सय्यद सलाहुद्दीन, अल हिजामा, कारी जरार, मसूद इलियास काश्मिरी, डॉ. हमजा, असगर खान, हाफिज खालिद नाईक, बिलाल अहमद अब्दुस मिर, बिलाल अहमद कुअद, हरीद अहमद, हरिद मिरद, हाफिज खालिद नाईक यांच्यासह सुमारे दोन डझन दहशतवाद्यांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

## अमेरिका-इराण युद्धात १३ भारतीय नागरिकांचा मृत्यू

**नवी दिल्ली, १६ जुलै**

अमेरिका-इस्रायल विरोधात इराण संघर्षात आतापर्यंत १३ भारतीयांचा मृत्यू झाला, तर तीन जण अजूनही बेपत्ता असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली.



होर्मुझच्या सामुद्रधुनीत इराण आणि अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे इतर देशांच्या तेलवाहू जहाजांना लक्ष्य करण्यात आले असले तरी, संघर्षाचा फटका भारतालाही बसला आहे. देशात इंधनाचे दर तर वाढलेच. पण आखातात काम करणाऱ्या १३ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला, तर ३ जण अद्याप बेपत्ता असल्याचे जयस्वाल यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. अमेरिका-इराण यांच्यात संघर्ष उफाळल्याने भारताचे सात जहाज आखाती देशात अडकले आहे. या जहाजांवर १४८ भारतीय खलाशी तैनात आहेत. आता आखाती प्रदेशातून बाहेर पडण्यासाठी या जहाजांना पुरेशी सुरक्षा हवी आहे. दोन दिवसांपूर्वी संयुक्त अरब अमिरातचे दोन तेलवाहू जहाज होर्मुझमधून जात असताना इराणने त्यांच्यावर क्षेपणास्त्र डागले. (वृत्तसंस्था)

# ब्राझीलच्या उत्पादनांवर २५ टक्के आयात शुल्क

## ट्रम्प यांची घोषणा, लुला सरकारचा निषेध, नियमांचे उल्लंघन असल्याचा आरोप



**वॉशिंग्टन, १६ जुलै**

अमेरिकेच्या वाणिज्य विभागाने ब्राझीलमधून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. राष्ट्राध्यक्ष लुला दा सिल्वा यांच्या सरकारने निर्णयाचा निषेध करत, बहुपक्षीय व्यापार नियमांच्या उल्लंघनाचा आरोप केला आहे.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, व्यापार पद्धतींच्या वर्षभर चाललेल्या तपासानंतर, १९७४ च्या व्यापार कायद्याच्या कलम ३०१ अंतर्गत ब्राझीलवर २५ टक्के आयात शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. दुसरीकडे अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर यांनी गुरुवारी सांगितले, आम्ही ब्राझीलच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. त्यानंतर, अमेरिकेच्या वाणिज्य विभागाने शुल्काचा निर्णय घेतला. ब्राझीलची अनेक व्यापार धोरणे अन्यायकारक आणि भेदभावपूर्ण असून, ती अमेरिकन व्यवसाय आणि कामगारांच्या स्पर्धात्मक स्थितीला लक्षणीयरीत्या बाधा आणत आहेत. डिजिटल व्यापार आणि इलेक्ट्रॉनिक पेमेंट सेवा, भ्रष्टाचारविरोधी हस्तक्षेप, बौद्धिक संपदा संरक्षण, इथेनॉल बाजारपेठ प्रवेश आणि अवैध जंगलतोड यांच्याशी संबंधित ब्राझीलचे काही उपाय अविवेकी असून ते अमेरिकन शेतकरी, कामगार आणि निर्यातदारांच्या व्यापारावर भार टाकतात किंवा त्यावर निर्बंध घालत असल्याचे चौकशीत समोर आल्याचे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### व्यापार धोरणावर आक्षेप

ग्रीर म्हणाले, अन्यायकारक व्यापार पद्धतींपासून अमेरिकेच्या आर्थिक हितांचे संरक्षण करणे हा ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणांचा भाग म्हणून शुल्क आकारले आहे. ब्राझीलच्या अन्यायकारक व्यापार पद्धतींमुळे अमेरिकन कामगार आणि उत्पादकांना २१० दशलक्षाहून अधिक ग्राहक असलेल्या या महत्त्वपूर्ण बाजारपेठेत प्रवेश करण्यापासून रोखले गेले आहे.

### वाटाघाटी करण्यात अपयश



परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो म्हणाले, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाला बहुतांश ब्राझीलियन आयातीवर २५ टक्के शुल्क आकारण्याचे निर्देश दिले. हे का केले याबद्दल कोणतीही शंका नसावी. लुला आणि त्यांच्या सरकारने अमेरिकेशी प्रामाणिकपणे वाटाघाटी केल्या नाहीत. ब्राझीलने १९७४ च्या व्यापार कायद्याचे कलम ३०१ लागू करण्याच्या अमेरिकेच्या व्यापार मंत्रालयाच्या निर्णयाला फेटाळून लावले.

# शाहबाज शरीफविरोधात पीटीआयने ठोकला शड्डू

- देशव्यापी आंदोलनाची घोषणा
- ५ ऑगस्टला संसदेवर मोर्चा

**इस्लामाबाद, १६ जुलै**

व्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तानमधील सुरू असलेल्या आंदोलनाच्या पृष्ठभूमीवर आता माजी पंतप्रधान इम्रान खानचा पक्ष पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफने (पीटीआय) ५ ऑगस्टपासून देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. इम्रान यांच्या सुटकेसह अनेक मागण्यांसाठी पक्ष रॅली, निदर्शने आणि संसदेवर मार्चा काढणार आहे. पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख असीम मुनीर यांना अडचणीत आणण्यासाठी पीटीआयने रणनीती आखली आहे.


गौहर अली खान माध्यमांशी बोलताना

पाकिस्तान सध्या अनेक आघाड्यांवर गंभीर संकटाचा सामना करत आहे. व्याप्त काश्मीरमध्ये महिनाभरापासून सुरू असलेले आंदोलन, बलुचिस्तानमध्ये बीएलएकडून लष्करावरील हल्ले आणि तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) खैबर पख्तुनख्वामध्ये सुरक्षा दलांना लक्ष्य करत असताना आता पीटीआयने सरकारविरोधात आंदोलनाची घोषणा केली. पीटीआय संसदीय पक्षाच्या बैठकीत, इम्रान खान यांच्या अटकेला तीन वर्षे पूर्ण होत असल्याच्या पृष्ठभूमीवर ५ ऑगस्टपासून देशव्यापी आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. पक्षाचे म्हणणे आहे की, इम्रान खान यांची सुटका आणि इतर राजकीय मागण्यांसाठी जनतेला एकत्र आणणे हा या आंदोलनाचा मुख्य उद्देश आहे. पक्षाचे अंतरिम अध्यक्ष गौहर अली खान यांनी सांगितले की, आंदोलनाचा भाग म्हणून देशभरात जाहीर सभा, निदर्शने आणि लाँग मार्च आयोजित केले जातील. याशिवाय संसदेवर मोर्चा काढण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### रणवीर सिंह दीपिकाला घेऊन पोहोचला लंच डेटवर

**मुंबई :** बॉलिवूड जोडपे दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंह मुंबईत लंच डेटसाठी पोहोचले. मंगळवारी हे जोडपे कडेकोट बंदोबस्तात मुंबईतील एका प्रसिद्ध रेस्टॉरंटमध्ये बेने दोसा खाण्यासाठी पोहोचले. या आऊटिंगचे व्हिडीओ समाज माध्यमावर समोर आले आहेत. ज्यात दोघे रेस्टॉरंटमधून बाहेर पडताना दिसत आहेत. दोघांनीही हे आऊटिंग खूप साधे ठेवले होते आणि कॅज्युअल कपडे परिधान केले होते. दीपिकाने एक सैल को-ऑर्ड सेट घातला होता, तर रणवीर टी-शर्ट आणि काळ्या पॅन्टमध्ये दिसला. दोघांनी आपल्या चेहऱ्यावर मास्क घातला होता आणि ते त्यांच्या गाडीकडे निघाले. जेव्हा ते रेस्टॉरंटमधून बाहेर येत होते, तेव्हा दीपिकाच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी तिथे उपस्थित लोकांना व्हिडीओ न काढण्याची विनंती केली.



### 'नागरवाला' प्रकरणावर जॉन करणार चित्रपट




**मुंबई :** जॉन अब्राहमचा 'नागरवाला' चित्रपट पुन्हा एकदा चर्चेत आहे. केके मेनन आता या प्रकल्पाचा भाग नाहीत आणि त्यांच्या जागी नवीन कलाकाराचा शोध सुरू आहे. तर, विजय सेतुपतीच्या 'ऑपरेशन गंगा'वरही काम वेगाने पुढे सरकत आहे. चित्रपटाची पटकथा आणि संशोधन कार्य जवळपास पूर्ण झाले आहे आणि लवकरच प्री-प्रॉडक्शनची पुढील प्रक्रिया सुरू होण्याची अपेक्षा आहे. 'नागरवाला' अजून सुरुवातीच्या विकासाच्या टप्प्यात आहे. जॉनचा दुसरा वास्तविक जीवनावर आधारित चित्रपट 'ऑपरेशन गंगा' प्रगितपथावर आहे. चित्रपटाचा पहिला मसुदा खूप आधी तयार झाला होता आणि आता अंतिम मसुद्यावर काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. चित्रपटाची कथा भारत सरकारच्या 'ऑपरेशन गंगा'वर आधारित आहे. ज्या अंतर्गत रशिया-युक्रेन युद्धादरम्यान हजारो भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्यात आले होते.

### 'मैं वापस आऊंगा'च्या यशाचा आनंदोत्सव

**मुंबई :** दिलजीत दोसांझ, वेदांग रैना आणि शरवरी वाघ अभिनित 'मैं वापस आऊंगा' या चित्रपटाच्या यशाची पार्टी मुंबईत आयोजित करण्यात आली होती. चित्रपटाच्या यशाचा जल्लोष साजरा करण्यासाठी बॉबी देओल, अनन्या पांडे आणि दिया मिर्झा यांच्यासह बॉलिवूडमधील अनेक मोठे स्टार्स उपस्थित होते. इम्तियाज अली दिग्दर्शित या रोमँटिक ड्रामा चित्रपटाने प्रदर्शनाच्या ३३ दिवसांत ६२.६१ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले आहे. अशा प्रकारे, हा इम्तियाज अलीच्या कारकीर्दीतील तिसरा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. पार्टीत अभिनेता बॉबी देओल आपल्या खास अंदाजात थम्स-अप करत पापाराझींना पोज देताना दिसले, तर अनन्या पांडे पांढऱ्या रंगाच्या ड्रेसमध्ये दिसली. चित्रपटाचे दिग्दर्शक इम्तियाज अली यांनी हात जोडून मीडियाला अभिवादन केले.




## जॉर्जिया मेलोनींना संसदेत मोठा धक्का

**रोम, १६ जुलै**

इटलीमध्ये निवडणूक सुधारणांशी संबंधित एका महत्त्वाच्या दुरुस्ती विधेयकाला कनिष्ठ सभागृहात गुप्त मतदानाच्या वेळी केवळ एका मताने फेटाळण्यात आले. यामुळे सरकारच्या बहुमतावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले, दुसरीकडे सत्ताधारी आघाडीतील मतभेदही उघड झाले आहेत.

मतदानात मेलोनी यांच्या ब्रदर्स ऑफ इटली पक्षाने प्रस्तावित केलेल्या दुरुस्तीच्या बाजूने १८७ तर विरोधात १८८ मते पडली. मतदान गुप्त असल्याने, सरकारच्या काही खासदारांनीही प्रस्तावाच्या विरोधात मतदान केले असावे असे मानले जात आहे. संसदेने फेटाळलेली दुरुस्ती मतदारांना पक्षाच्या यादीतून आपले पसंतीचे उमेदवार निवडण्याचा अधिकार देण्याशी संबंधित होती. (वृत्तसंस्था)

## मस्कविरुद्ध फौजदारी चौकशीची शिफारस

**वॉशिंग्टन, १६ जुलै**

निवडणुकीपूर्वी मतदारांना १० लाख डॉलर्सचे धनादेश दिल्याच्या प्रकरणात अमेरिकेच्या विस्कॉन्सिन निवडणूक आयोगाने उद्योगपती एलन मस्क यांची चौकशी करण्याची शिफारस केली आहे.

आयोगाने हे प्रकरण ब्राऊन काऊंटीच्या जिल्हा ॲटर्नीकडे फौजदारी चौकशीसाठी पाठवले आहे. अभियोजन पक्षाला आता ४० दिवसांच्या आत ठरवावे लागेल की मस्क यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करायचा की नाही. आयोगाने गेल्या आठवड्यात मिळालेल्या दोन तक्रारींना ५-१ च्या बहुमताने पुढे नेण्याचा निर्णय घेतला. (वृत्तसंस्था)


जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यात, पहलगाम मार्गावर वार्षिक अमरनाथ यात्रेदरम्यान जखमी झालेल्या ज्येष्ठ नागरिकाला पोलिस कर्मचाऱ्यांनी खांद्यावरून वेद्यकीय केंद्रात हलवले

# अरुणाचल प्रदेशात पुरामुळे हाहाकार

## सात जणांचा मृत्यू, लाखो नागरिक स्थलांतरित

**इटानगर, १६ जुलै**

अरुणाचल प्रदेशात सततच्या मुसळधार पावसामुळे पूर आणि भूस्खलनाचा फटका २८ पैकी २६ जिल्ह्यांना बसला आहे. राज्य आपत्कालीन कार्य संचालन केंद्राच्या माहितीनुसार, आतापर्यंत एका लाखांपेक्षा अधिक नागरिक स्थलांतरित झाले, तर या आपत्तीत आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला असून, २९ जण जखमी आहेत.

गेल्या २४ तासांत, अप्पर सुबनसिरी, अप्पर सियांग, क्रा दाडी, कामले आणि पापुम पारे जिल्ह्यांमध्ये पूर आणि भूस्खलनाच्या घटनांची नोंद झाली आहे.

अप्पर सियांग हा सर्वाधिक प्रभावित जिल्हा असून, तेथील ४९,२५९ लोक बाधित झाले आहेत. राज्यभरात आतापर्यंत ६२२ घरांचे नुकसान झाले आहे. यामध्ये ४५४ कच्ची घरे, १०० पक्की घरे, ४४ झोपड्या आणि इतर २४ बांधकामांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# ऑपरेटरला ३९ हजारांत पडली वरातीत बॅण्डवाल्याची 'दांडी'

## सेवेतील त्रुटीसह अनुचित व्यापार पद्धतीत बॅण्ड ऑपरेटरला ठरवले दोषी

**नवी दिल्ली, १६ जुलै**

लग्नाचा मुहूर्त ठरलेला, वऱ्हाडी मंडळीही आली आणि लग्नाची वरात निघणार, अशा ऐन आनंदाच्या क्षणी ठरवलेले बॅण्ड पथकच न आल्याने नवरदेवाच्या कुटुंबीयांची जी तारांबळ उडाली, त्याची आता संबंधित बॅण्ड ऑपरेटरला मोठी किंमत मोजावी लागली आहे.



ऐनवेळी सेवा न देऊन ग्राहकाला अडचणीत आणल्याप्रकरणी हिमाचल प्रदेशातील जिल्हा ग्राहक आयोगाने एका बॅण्ड ऑपरेटरला चांगलाच दणका दिला. आयोगाने त्याला सेवेतील त्रुटी आणि अनुचित व्यापार पद्धतीचा दोषी ठरवत, तक्रारदार ग्राहकाला तब्बल ३९ हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. तक्रारदार पवनकुमार यांच्या मुलाचे लग्न ५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार होते. यासाठी त्यांनी 'ब्रास बॅण्ड' पथक बुक केले होते. बुकिंग सुमारे एक महिना आधी नऊ हजार रुपयांना करण्यात आले होते आणि त्यापैकी ४,२०० रुपये आगाऊ रक्कम म्हणून देण्यात आले होते. लग्नाच्या दिवशी बॅण्ड पथक आलेच नाही. तक्रारदाराने ऑपरेटरला वारंवार फोन केले. सुरुवातीला ऑपरेटरने बॅण्ड येत असल्याचे आश्वासन दिले, परंतु नंतर फोन उचलणे बंद केले. फोन बंद करून टाकला. वरात रखडल्यामुळे, तक्रारदाराला ऐन वेळी दुसऱ्या बॅण्डची व्यवस्था करावी लागली. या तातडीच्या सेवेसाठी १० हजार रुपये मोजावे लागले. ऑपरेटरकडून सेवेत त्रुटी राहिल्याचा आरोप करत पवनकुमार यांनी कांग्रा येथील जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे धाव घेतली. ऑपरेटरने नोटीसला कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर खटल्याला विरोध केला नाही. त्यामुळे संपूर्ण कार्यवाहीदरम्यान त्यांच्या अनुपस्थितीत खटला चालवण्यात आला. ऑपरेटर स्वतः हजर राहिला नाही किंवा तक्रारदाराने सांगितलेल्या घटनाक्रमाला आव्हान दिले नाही, त्यामुळे जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाचे अध्यक्ष हेमांशु मिश्रा आणि सदस्य आरती सूद व नारायण ठाकूर यांच्या खंडपीठाने तक्रारदाराचा पुरावा बिनविरोध राहिला आहे आणि त्यावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण नाही, असे नमूद केले.

कायदेशीररीत्या नोटीस मिळूनही तक्रारीला विरोध करण्याचे कष्ट घेतले नाहीत आणि एकतर्फी (गैरहजर) राहणे पसंत केले. त्यामुळे, तक्रारदाराने सादर केलेला पुरावा खंडित न झालेला आणि बिनविरोध राहिला आहे. तक्रारदाराने सादर केलेल्या ठोस आणि पटण्यासारख्या पुराव्यावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण नाही, असे निरीक्षण आयोगाने नोंदवले. (वृत्तसंस्था)

### सेवेतील गंभीर त्रुटी

ऑपरेटरने चार हजार रुपये आगाऊ रक्कम घेतली होती, परंतु ठरल्याप्रमाणे बॅण्ड पथक पाठवण्यात तो अपयशी ठरला. यामुळे लग्नाचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी कुटुंबाला अत्यंत कमी वेळेत पर्यायी व्यवस्था करावी लागली. विरोधी पक्षाने प्रत्यक्ष उपस्थित न राहणे आणि तक्रारदाराच्या मुलाच्या विवाह सोहळ्यासारख्या शुभप्रसंगी वचन दिल्याप्रमाणे ब्रास बॅण्डची सेवा पुरवण्यात अपयशी ठरणे, ही सेवेतील गंभीर त्रुटी आणि अनुचित व्यापार पद्धती ठरते, असे निरीक्षण आयोगाने नोंदवले.

## गुरुग्राममध्ये १३ बांगलादेशींना अटक

**गुरुग्राम, १६ जुलै**

राष्ट्रीय सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गुरुग्राम पोलिसांनी अवैध स्थलांतरितांविरुद्ध एक प्रभावी कारवाई सुरू केली आहे. पोलिसांनी सायबर सिटीमध्ये अवैधपणे राहणाऱ्या १३ बांगलादेशी नागरिकांना अटक केली असून त्यांना त्यांच्या देशात परत पाठवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. गुरुवारी गुरुग्राम पोलिसांचे एक विशेष पथक या नागरिकांसह नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरून रवाना झाले.

गुरुग्राम पोलिसांनुसार, गुन्हे शाखेच्या (सेक्टर ३९) पथकाने शहरातील अवैध स्थलांतरितांना पकडण्यासाठी एक विशेष तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान, पथकाने गुप्त माहितीच्या आधारे या १३ बांगलादेशी नागरिकांची ओळख पटवली. कायदेशीर वास्तव्याचा कोणताही वैध पुरावा किंवा कागदपत्रे ते सादर करू शकले नाही. (वृत्तसंस्था)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, १७ जुलै २०२६

## विचारपुष्प



भारतात प्रत्येक संप्रदायाची पूजा पद्धती, आराध्य दैवते, सण, उत्सव थोड्याफार फरकाने भिन्न असल्याने, येथे प्रत्येक पंथाचे वेगळेपण असले तरी परदेशात गेल्यावर सार्वजनिक व सामाजिक जीवनात आपल्याला एकच चित्र ठळकपणे उमटविणे आवश्यक आहे. अखिल मानवमात्राच्या एकत्रित विकासासाठी 'हिंदू' नाव धारण करणारी ही विशेष जीवनपद्धती सुगम आहे आणि सक्षमही आहे.

**– स्व. लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# नववीत तिसरी भाषा नकोच

## विद्यार्थ्यांवर अतिरिक्त शैक्षणिक तणाव येऊ शकतो : सर्वोच्च न्यायालय



**नवी दिल्ली, १६ जुलै**

सीबीएसई अंतर्गत इयत्ता नववीत तिसरी भाषा सुरू करण्यावर चिंता व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी सांगितले की, नववीत नवीन भाषा सुरू केल्यास विद्यार्थ्यांवर अतिरिक्त शैक्षणिक दबाव येऊ शकतो. त्यामुळे तिसऱ्या भाषेचे शिक्षण इयत्ता पाचवी किंवा सहावीपासून सुरू करावे, जेणेकरून विद्यार्थ्यांना ती सहजपणे शिकता येईल, असे न्यायालयाने सुचवले. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि आर. महादेवन यांच्या न्यायासनाने केंद्र सरकारला इयत्ता नववीत तिसरी भाषा सुरू करू नका, अशी तोंडी सूचनाही दिली.

न्यायमूर्ती नागरत्ना पुढे म्हणाल्या, भारत सरकारने इयत्ता नववीत तिसरी भाषा सुरू केल्यास विद्यार्थ्यांवर अनावश्यक ताण येईल. जर तुम्हाला नवीन भाषा सुरू करायची असेल, तर ती पाचवी किंवा सहावी इयत्तेत सुरू करावी, नववीत नाही. इयत्ता नववी तणावपूर्ण असते. तो ताण आठवीपासूनच सुरू होतो. न्यायालयाचे हे निरीक्षण केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांनी सरकारपर्यंत पोहोचवावे, असेही न्यायालयाने सुनावणीदरम्यान सांगितले.

**न्यायालयाची चिंता केंद्र सरकारपर्यंत पोहोचवा**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांना सुनावणीदरम्यान न्यायालयाची चिंता केंद्र सरकारपर्यंत पोहोचवण्यास सांगितले. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालये (जेएनव्ही) स्थापन करण्याची प्रक्रिया सुलभ करण्याचे निर्देश देणाऱ्या मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या तामिळनाडू सरकारच्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान ही टिप्पणी करण्यात आली. (वृत्तसंस्था)

### त्रिभाषा धोरणाला तामिळनाडू सरकारचा विरोध?

तामिळनाडू सरकारने जवाहर नवोदय विद्यालयांना दीर्घकाळापासून विरोध केला आहे. राज्य सरकारचे म्हणणे आहे की, या शाळांमध्ये लागू केलेले त्रिभाषा धोरण त्यांच्या शैक्षणिक दृष्टिकोनाशी विसंगत आहे. या मुद्याशी संबंधित एका सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने शाळांमध्ये तिसरी भाषा सुरू करण्याच्या योग्य वेळेबाबत आपले मत व्यक्त केले. तथापि, न्यायासन सीबीएसईच्या नवीन भाषा धोरणाच्या वैधतेवर थेट सुनावणी घेत नव्हते. या धोरणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाचे दुसरे न्यायासन विचार करत आहे. अलिकडेच, त्या न्यायासनाने सीबीएसईच्या अधिसूचनेवर अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला आहे.

## महाराष्ट्रासह पाच राज्यात ईडीचे छापे

**नवी दिल्ली, १६ जुलै**

दहशतवादी निधीपुरवठा आणि घुसखोरांना मदत करण्याच्या प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) गुरुवारी पश्चिम बंगाल, दिल्ली, उत्तर प्रदेश, हरयाणा आणि महाराष्ट्रात १३ ठिकाणी छापे टाकले. मनी लॉड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली.

ईडीच्या लखनौ विभागीय कार्यालयाच्या पथकांनी राज्य पोलिसांच्या सहकार्याने राजधानी दिल्लीतील बाटला हाऊस आणि मदनपूर खादर, उत्तर प्रदेशातील सहारनपूर, महाराष्ट्रातील रायगड आणि पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा, उत्तर २४ परगणा, कोलकाता आणि मुर्शिदाबाद या ठिकाणी संशयितांच्या घरावर छापे टाकले. ईडी अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, हे प्रकरण उत्तर प्रदेश दहशतवादविरोधी पथकाने दाखल केलेल्या एफआयआरशी संबंधित आहे. (वृत्तसंस्था)

# पोलिसांची गर्दीवर '३६० अंश' नजर



**ताफ्यात ३६० अत्याधुनिक निगराणी वाहने दाखल**

**पुणे, १६ जुलै**

गर्दीच्या प्रत्येक हालचालीवर आता पोलिसांची '३६० अंश' नजर राहणार आहे. आंदोलने, सण-उत्सव, मिरवणुका आणि निवडणुकांतील गर्दीचे व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पोलिसांच्या ताफ्यात ३६० अत्याधुनिक निगराणी वाहने दाखल करण्यात आल्या आहेत. या वाहनांमधील सीसीटीव्ही प्रणालीमुळे घटनास्थळाचे थेट प्रक्षेपण वरिष्ठ अधिकाऱ्यांना मोबाईलवरून पाहता येणार असून, नियंत्रण कक्षातूनही परिस्थितीवर रिअल-टाइम लक्ष ठेवले जाईल. गर्दीचे आणि अरुंद रस्ते लक्षात घेऊन या वाहनांची विशेष रचना करण्यात आली आहे. अधिक ग्राउंड क्लियरन्स आणि कमी जागेत वळण घेता येत असल्याने ही वाहने दाट वाहतूक तसेच अवघड भागात सहज पोहोचू शकतात. वाहनाच्या छतावर चार पोलिस कर्मचारी उभे राहून किंवा बसून परिसरावर थेट लक्ष ठेवू शकतील, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रत्येक वाहनामध्ये चारही बाजूंना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, त्यामुळे ३६० अंश परिसरावर सातत्याने नजर ठेवता येते. डीव्हीआरमध्ये सिमकार्ड बसविल्यानंतर संबंधित पोलिस युनिटचे प्रमुख तसेच वरिष्ठ अधिकारी आपल्या मोबाईलवरून घटनास्थळाचे थेट प्रक्षेपण पाहू शकतात. त्यामुळे नियंत्रण कक्षातूनही परिस्थितीचे रिअल-टाइम निरीक्षण शक्य होणार आहे. राज्य पोलिस मोटार परिवहन विभागाचे पोलिस महानिरीक्षक अशोक मोराळे यांनी सांगितले की, अतिरिक्त पोलिस महासंचालक दीपक पांडे यांच्या संकल्पनेतून हा प्रकल्प साकारण्यात आला आहे. प्रत्येक पोलिस युनिटला सहा ते दहा व्हॅन देण्यात आल्या असून, त्या हाताळण्यासाठी प्रत्येक युनिटमधील सहा पोलिस कर्मचारी आणि दोन अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षणही देण्यात आले आहे.

गर्दी नियंत्रणाबरोबरच या व्हॅनचा वापर अपघात किंवा इतर वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत जखमींना स्ट्रेचरद्वारे हलविण्यासाठी, संशयितांना ताब्यात घेण्यासाठी तसेच अटक कारवाईसाठीही करता येणार आहे. याशिवाय लेखनासाठी टेबल, ढाली, लाठ्या आणि इतर आवश्यक साहित्य ठेवण्यासाठीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. (तभा वृत्तसेवा)

### वारीत यशस्वी चाचणी

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यादरम्यान या वाहनांपैकी १९ वाहनांचा वापर करण्यात आला होता. ज्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उपलब्ध नव्हते, त्या ठिकाणी ही वाहने तैनात करण्यात आल्यामुळे गर्दीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यास आणि परिस्थितीवर सातत्याने नजर ठेवण्यास पोलिसांना मोठी मदत झाली.

## महत्त्वाचे

### विजेचा शॉक बसल्याने टमटम चालकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १६ जुलै-**



मालाची डिलिव्हरी करण्यासाठी गेलेल्या एका टम टम चालकाचा टम टम मधील साहित्य कारखान्यात घेऊन जात असताना पाण्याच्या विद्युत मोटारीचा शॉक लागून जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना चिंचोली एमआयडीसी येथील जी.पी. इंडस्ट्रीज येथे आज गुरुवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली. निजामुद्दीन रसूलसाब नदाफ (वय ४0 वर्ष, रा.सिद्धेश्वरनगर भाग ४, नई जिंदगी, सोलापूर) असे त्या मयत व्यक्तीच नाव आहे. ते गुरुवारी आपल्या टमटम वाहनातून मालाची डिलिव्हरी करण्यासाठी दुपारी एक वाजेच्या सुमारास चिंचोली एमआयडीसी येथील जीपी इंडस्ट्रीज येथे गेले होते. टमटम मधून साहित्य काढून पायी गोडाऊनमध्ये ठेवण्यासाठी जात होते.त्यावेळी पाणी भरण्याच्या विद्युत मोटारीचा जोरदार शॉक हाताला बसल्याने ते जागीच कोसळून मृत्युमुखी पडले. दरम्यान त्यांना भाऊ पिरसाब नदाफ यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

### पोलिसाने केला महिला पोलिसचा विनयभंग

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

एका २६ वर्षीय महिला पोलिस अंमलदाराचा प्रत्यक्षपणे आणि मोबाईलद्वारे पाठलाग करून, अश्लील मेसेज पाठवून विनयभंग केल्याप्रकरणी एका पोलिस नाईक विरुद्ध जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनायक सुर्यवंशी (नेमणूक- पोलिस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण) असे गुन्हा दाखल झालेल्या पोलिस नाईक आरोपीचे नाव असून याबाबत खुद्द पीडित महिला पोलीस अंमलदाराने तक्रार दिली आहे. यातील फिर्यादी महिला पोलिस अंमलदार या सोलापूर ग्रामीण पोलिस मुख्यालय वस्तीगृह येथे राहतात. २१ डिसेंबर २०२५ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत, महिला पोलिस अंमलदार या कर्तव्यावर असताना तसेच त्यांच्या राहत्या घरी असताना, आरोपी पोलिस नाईक विनायक सुर्यवंशी याने त्यांचा प्रत्यक्ष आणि मोबाईलद्वारे सातत्याने पाठलाग केला. एवढेच नव्हे तर, आरोपीने त्यांना मोबाईलवर अत्यंत अश्लील मेसेज पाठवून त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# सरकारला घेरण्याची काँग्रेसची तयारी

**नवी दिल्ली, १६ जुलै**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनातील व्यूहरचना ठरवण्यासाठी काँग्रेस नेत्यांची गुरुवारी बैठक झाली. यात विविध मुद्यांवर दोन्ही सभागृहांत सरकारला घेरण्याचा निर्णय घेण्यात आला.

काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांच्या निवासस्थानी त्यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या या बैठकीला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस महासचिव के. सी. वेणुगोपाल, पी. चिदंबरम, जयराम रमेश यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

बैठकीत झालेल्या चर्चेची माहिती नंतर काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी दिली. सरकार जी विधेयके आणणार असल्याची चर्चा आहे, त्यावर आम्हाला आताच कोणताही निर्णय घेता येणार नाही, असे जयराम रमेश यांनी सांगितले. मतदारसंघाच्या परिसीमनाबाबतचे विधेयक सरकार आणणार असल्याची चर्चा आहे, काँग्रेस या विधेयकाला जोरदार विरोध करेल, असे रमेश म्हणाले. पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांच्या शिक्षेबाबतच्या विधेयकालाही काँग्रेसचा विरोध राहणार आहे, असे ते म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

# इराणी बंदरांवर अमेरिकेचा वार

## अब्बास, अहवाज, चाबहार स्फोटाने हादरले, दोन जहाज नष्ट



इराणच्या अब्बास बंदर परिसरात लागलेली आग

**दुबई, १६ जुलै**

अमेरिकेने इराणविरुद्धच्या कारवाईच्या सलग पाचव्या दिवशी इराणी बंदरांना लक्ष्य करत जोरदार हल्ले चढवले. अब्बास, अहवाज, चाबहार बंदरावर झालेल्या स्फोटात पायाभूत सुविधांचे नुकसान झाले, तर दोन जहाजे उद्ध्वस्त झाली. प्रत्युत्तरात इराणने आखाती देशातील अमेरिकेच्या लष्करी तळावर क्षेपणास्त्रांचा मारा केला.

यूएस सेंट्रल कमांडने समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, अमेरिकेच्या वायुदलाने इराणच्या बंदरांवर

हेलफायर क्षेपणास्त्राचा मारा केला. इराणच्या अनेक भागांमध्ये स्फोट झाले, ज्यात दक्षिणेकडील बंदर अब्बास, अहवाज व चाबहारचा समावेश आहे. दुसरीकडे इराणने अमेरिकेच्या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत आखाती देशातील लष्करी पायाभूत सुविधांवर हल्ले केले. दोन्ही देशांनी केलेल्या हल्ल्यात जीवितहानीची माहिती समोर आलेली नाही.

**कराराचे पालन करावेच लागेल : अकरमिनिया**

होर्मुझची सामुद्रधुनी उघडण्यासाठी अमेरिकेला सामंजस्य कराराचे पालन करावे लागेल. या जलमार्गासाठी इराणचे नियम स्वीकारावे लागतील. दुसरा कोणताही मार्ग नाही, असे इराणचे लष्करी प्रवक्ते ब्रिगेडियर जनरल मोहम्मद अकरमिनिया यांनी एका निवेदनात म्हटले आहे. अमेरिका इराणी कायदेशीर प्रणाली स्वीकारत नाही, इराणच्या इच्छेनुसार आधारित यंत्रणेअंतर्गत काम करत नाही, तोपर्यंत होर्मुझ बंद राहील. (वृत्तसंस्था)

# लवासा प्रकरणात पवार कुटुंबीयांना दिलासा

## सीबीआय चौकशी, एफआयआरची मागणी सुप्रीम कोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली, १६ जुलै**

बहुचर्चित 'लवासा हिल स्टेशन' कथित गैरव्यवहार प्रकरणाची सीबीआय चौकशी आणि एफआयआर दाखलची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी फेटाळली. न्यायालयाच्या निर्णयाने राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळाला आहे.

या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी आणि शरद पवार, सुप्रिया सुळे व दिवंगत नेते अजित पवार यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या हेतूवरच आक्षेप घेतला. याचिकाकर्त्याच्या हेतूबद्दल शंका आहे, आम्ही या प्रकरणात अजिबात हस्तक्षेप करणार नाही, असे स्पष्ट व महत्त्वपूर्ण निरीक्षण सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी नोंदवले. या निकालामुळे लवासा प्रकल्पावरून पवारांवर होणाऱ्या आरोपांच्या प्रकरणाला आता पूर्णविराम मिळाला आहे. नाशिकमधील वकील नानासाहेब जाधव यांनी ही याचिका दाखल केली होती. यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली होती. याचिकेत लवासा प्रकल्पाच्या उभारणीदरम्यान पदाचा गैरवापर केल्याचा आरोप होता. (वृत्तसंस्था)

### सरकारचे दहा हजार कोटींचे नुकसान

सुप्रिया सुळे आणि त्यांचे पती सदानंद सुळे हे प्रमुख भागधारक असलेल्या लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीला विशेष सवलती देण्यात आल्या. राज्य शासनाची ३४१.१५ हेक्टर जमीन नाममात्र दराने भाडेपट्टीवर देण्यात आली. लवासा प्रकल्पाची अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच आणि आवश्यक शासकीय परवानग्या पूर्ण न करताच सुमारे ५ हजार एकर जमीन खरेदी करण्यात आल्याचा दावा कॅग आणि लोकायुक्तांच्या अहवालांचा दाखला देत करण्यात आला. यामुळे सरकारचे १० हजार कोटींचे नुकसान झाल्याचे याचिकेत नमूद होते.

# जगन्नाथ रथयात्रेदरम्यान चेंगराचेंगरी

## दोघांचा मृत्यू | १५० हून अधिक जखमी रुग्णालयात दाखल | भाविकांची गर्दी



ओडिशामधील पुरी येथील जगन्नाथ धाममध्ये वार्षिक रथयात्रेदरम्यान, पुजारी आणि सेवक देवी सुभद्रेची मूर्ती ''दर्पदलन रथा''कडे नेण्यासाठी ''धाडी पहंडी'' हा विधी करताना

**पुरी, १६ जुलै**

जगन्नाथ रथयात्रेच्या पहिल्या दिवशी गुरुवारी पुरीच्या ग्रँड रोडवर भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली. गर्दीमुळे बेशुद्ध झाल्याने दोन जणांचा मृत्यू झाला तर १५० हून अधिक भाविक जखमी झाल्याचे वृत्त आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप कळलेले नाही.

ओडिशा पोलिसांनी सांगितले की, ओडिशा अग्निशमन आणि आपत्कालीन सेवेच्या विशेष बचाव पथकाने गुरुवारी सकाळपासून प्रचंड गर्दीतून ३३ भाविकांना वाचवले आहे. बचावलेल्या भाविकांना तात्काळ प्रथमोपचार आणि ऑक्सिजनचा पुरवठा करण्यात आला. त्यानंतर त्यांना पुढील उपचारांसाठी जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. सायंकाळपर्यंत रथयात्रेदरम्यान विविध आरोग्य तक्रारींमुळे सुमारे १५० जणांना पुरी जिल्हा मुख्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सूत्रांनुसार, दुपारी २ वाजताच्या सुमारास चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली.

या चेंगराचेंगरीदरम्यान आपत्कालीन बचाव पथकांनी अनेक लोकांना स्ट्रेचरवरून बाहेर काढले. वार्षिक रथयात्रेसाठी पुरी जगन्नाथ मंदिराच्या सिंहद्वारात भाविकांची प्रचंड गर्दी जमली होती. पवित्र रथांभोवती प्रचंड गर्दी जमल्याने सुरक्षा कर्मचारी आणि आपत्कालीन बचाव पथकांनी गर्दीत अडकलेल्यांना मदत करण्यासाठी आणि वैद्यकीय साहाय्य पुरवण्यासाठी तात्काळ हस्तक्षेप केला.

ओडिशातील पुरी येथे नऊ दिवसांची वार्षिक रथयात्रा सततच्या पावसात आणि लाखो भाविकांच्या उपस्थितीत 'पहांडी' विधीने गुरुवारी सुरू झाली. (वृत्तसंस्था)

# नीट : रसायनशास्त्राच्या पेपरची पाच लाखांत विक्री

## मोटेगावकरने दिले पैसे, सीबीआयचा खुलासा

**नवी दिल्ली, १६ जुलै**

'नीट' पेपरफूट प्रकरणात लातूर येथील कोचिंग सेंटरचे मालक शिवराज मोटेगावकर यांनी पी. व्ही. कुलकर्णी यांच्याकडून रसायनशास्त्राचा पेपर मिळवण्यासाठी ५ लाख रुपये दिले. कुलकर्णी हे परीक्षेचे प्रश्न तयार करणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)च्या पॅनेलवर होते, अशी माहिती सीबीआयने बुधवारी एका विशेष न्यायालयाला दिली.

एजन्सीने आरोप केला की, मोटेगावकर यांचा मुलगा कुलकर्णी यांच्या कोचिंग क्लासमध्ये शिकत होता. तिथे त्याला हे प्रश्न पुरवण्यात आले होते. मोटेगावकर यांच्या जामीन अर्जाला दिलेल्या उत्तरात एजन्सीने आरोप केला आहे की, त्यांनी एका सह-आरोपीसोबत मिळून परीक्षेपूर्वी फुटलेले नीट (यूजी) रसायनशास्त्राची प्रश्नपत्रिका मिळवण्यासाठी कट रचला आणि त्यासाठी ५ लाख रुपये दिले होते. मोटेगावकर यांनी कुलकर्णी यांच्या केमिस्ट्री ट्युटोरिअल क्लासमध्ये दिलेल्या प्रश्नांवरून हाताने नोट्स तयार केल्या होत्या, असेही सीबीआयने सांगितले. मोटेगावकरच्या मोबाईलमध्ये रसायनशास्त्राचे प्रश्न होते. (वृत्तसंस्था)

# अमली पदार्थांची काळी अर्थव्यवस्था मुळासकट उखडून टाका!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पोलिसांना सक्त निर्देश | शालेय अभ्यासक्रमात होणार व्यसनमुक्ती धड्यांचा समावेश

विशेष प्रतिनिधी

**मुंबई, १६ जुलै**

सशक्त आणि निरोगी महाराष्ट्राच्या उभारणीसाठी व्यसनमुक्तीची चळवळ अत्यंत महत्त्वाची असून, राज्यात फोफावलेल्या अमली पदार्थांच्या काळ्या अर्थव्यवस्थेला मुळासकट उखडून टाका, असे सक्त निर्देश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सह्याद्री अतिथिगृह येथे 'अमली पदार्थमुक्त महाराष्ट्र' या विषयावरील व्यूहरचना आणि कृती योजनेबाबत आयोजित उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी शालेय अभ्यासक्रमात अमली पदार्थांच्या दुष्परिणामांचा समावेश करण्यासह, पोलिसांसाठी विशेष बक्षीस योजना आणि राज्यभरात नशामुक्ती केंद्रांची साखळी उभारण्याचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

या बैठकीला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह राज्याचे मुख्य सचिव आणि पोलिस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



**शालेय अभ्यासक्रमात होणार बदल**

शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या भयंकर दुष्परिणामांबाबत जागृती निर्माण व्हावी, यासाठी इयत्ता सातवी ते दहावीच्या अभ्यासक्रमामध्ये याविषयीच्या विशेष घटकांचा समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

याशिवाय, शाळा आणि महाविद्यालयांचे परिसर 'अमली पदार्थमुक्त' घोषित करण्यासाठी मुख्याध्यापक व प्राचार्यांनी विशेष नियमावली तयार करावी, असेही त्यांनी सुचवले आहे.

**नशामुक्ती केंद्रांचे जाळे उभारणार**

नशेच्या दुर्दैवी चक्रव्यूहातून बाहेर पडू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी राज्यात नशामुक्ती केंद्रांची साखळी उभारण्यात येणार आहे. स्वयंसेवी संस्था, वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि अमली पदार्थ विरोधी कक्ष यांच्या समन्वयातून ही केंद्रे चालवली जातील.

मुंबईत महापालिकेने स्वतंत्र बहुशाखीय नशा मुक्ती केंद्र सुरू करावे, तसेच राज्यातील मोठ्या आणि सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये काही खाटा या उपचारांसाठी राखीव ठेवाव्यात, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

### तस्करांवर कठोर कारवाई; पोलिसांना प्रोत्साहन

अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या तस्करांना शोधून त्यांची संपूर्ण साखळी उद्ध्वस्त करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. या गुन्ह्यांमध्ये 'एनडीपीएस' कायद्याचा प्रभावी वापर करून खटले वेगाने चालवण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन केली जातील. तसेच, सरकारी वकिलांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# दिवस 'कृती'चे...

राज्यातील महायुती सरकारने विधिमंडळ अधिवेशनात केलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल भाजपाच्या किसान मोर्चाने बुधवारी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार आयोजित करून कृतज्ञता व्यक्त केली. राजकीय पक्ष म्हणून भाजपाने या निर्णयाचा गाजावाजा करण्यात काहीच गैर नाही. किंबहुना, या सोहळ्यामुळेच महाराष्ट्रातील शेती क्षेत्राच्या शाश्वत विकासाचा एक व्यापक आराखडा मुख्यमंत्र्यांच्या भाषणातून महाराष्ट्रासमोर आला. महाराष्ट्राच्या भावी पिढीला दुष्काळ हा शब्द माहीतदेखील असणार नाही अशा विकासाची अनेक कामे हाती घेतल्याची ग्वाही देऊन मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या संकल्पांचे वेगवेगळे बिंदू जोडले, तर 'सुजलाम् सुफलाम्' महाराष्ट्राचे एक सुंदर रांगोळी चित्र तयार होईल, अशा अपेक्षा मुख्यमंत्र्यांच्या या पैलूदार भाषणामुळे उंचावल्या आहेत. पण शेतीच्या शाश्वत विकासाचे मुख्यमंत्र्यांचे संकल्प चित्र काही आजचे नाही. मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या टप्प्यातील कारकीर्दीच्या अखेरच्या काळातही त्यांनी हेच चित्र रंगविले होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राजकीय उलथापालथ झाली नसती, तर त्यांचे संकल्प सिद्ध झालेले महाराष्ट्रास पाहावयास मिळाले असते, असे आता म्हणता येईल. कारण २०१९ मध्ये महाराष्ट्रात भाजपाची सत्ता गेली तरीही त्यांनी या संकल्पांचा संपूर्ण आराखडा जसाच्या तसा मनात जपून ठेवला होता, हे बुधवारच्या त्यांच्या त्या भाषणातून स्पष्ट दिसते. राज्यातील शेतकऱ्यांच्या गरजा समजावून घेऊन त्यावर काम करण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांत राज्यातील शेतकऱ्यांसमोर संकटांची आणि समस्यांची मालिका उभी राहिली आहे. शेतकऱ्यास आर्थिक हातभार लागावा यासाठी केंद्र सरकारने फेब्रुवारी २०१९ मध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान योजना जाहीर केली. या योजनेतून पात्र लाभार्थी शेतकऱ्यास आर्थिक मदतीचा हात केंद्र सरकारने पुढे केला. महाराष्ट्रात याच योजनेत तितक्याच मदतीची भर घालून राज्य सरकारने शेतकऱ्याच्या मदतीचे हात अधिक बळकट केले, तरीही शेतकरी समस्यामुक्त झालाच नाही. त्यामुळे कर्जमाफी किंवा आर्थिक मदत देणे हा शेतकऱ्याच्या कायमच्या समस्यामुक्तीचा मार्ग नाही, हे मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेले वक्तव्य कालातीत सत्य ठरले आहे. समस्यांची ही मालिका अखंडपणे सुरूच असल्याने समस्याग्रस्त शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी केवळ कर्जमुक्ती हा कायमस्वरूपी उपाय नाही, हे स्पष्ट होत असताना आता अनियमित पावसामुळे संकटाचे नवे सावट दाटताना दिसत आहे. राज्यातील ४२ टक्के भागात पावसाचे पाणी विनावापर वाहून वाया जाते आणि ५८ टक्के भाग पाण्यासाठी वणवण करतो, हे मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडलेले वास्तव आणि ही परिस्थिती बदलण्याच्या त्यांच्या संकल्पनेतील उपाययोजना हे या रांगोळीचे महत्त्वाचे बिंदू आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रासमोर उभे केलेले भविष्यातील आनंददायी घडामोडींचे चित्र आश्वासक वाटते. अर्थात, या चित्राला भावनिक किनार आहेच; अशा आनंददायी क्षणांचे साक्षीदार होण्याच्या आनंदात वर्तमानातील समस्यांचा विसर पडून चालणार नाही. असे आनंदाचे क्षण मागे गेले की पुन्हा समस्या डोकी वर काढतात, हा जुना अनुभव आहे. आनंद आणि वेदनांचा अनुभव एकाच वेळी घेता येणे ही मोठी कसरत असते. ती सावधगिरीने पार पाडावी लागते, आणि हीच सावधगिरी मुख्यमंत्र्यांच्या भविष्यचित्रात उमटलेली दिसते. मुख्यमंत्र्यांनी बुधवारी मांडलेली महाराष्ट्राच्या विकासाची रूपरेषा ही केवळ काही योजनांची घोषणा नव्हती. राज्याच्या विकासाच्या पुढील टप्प्याची दिशा दर्शविणारा तो कृती कार्यक्रम होता. कृषी क्षेत्रातील गुंतवणूक हा विकासाच्या कृतीचा केंद्रबिंदू राहील, हा त्यांचा संदेश लक्षवेधी ठरतो. अनेक दशकांपासून महाराष्ट्राच्या विकासाची चर्चा उद्योग, सेवा क्षेत्र, नागरीकरण आणि पायाभूत सुविधांभोवती फिरत होती. आता त्यामध्ये शेती, कृषी प्रक्रिया, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि मूल्यसाखळी या संकल्पना मध्यवर्ती ठिकाणी येत असल्याचे या भाषणातून स्पष्ट झाले. राज्याच्या जवळपास निम्म्याहून अधिक लोकसंख्येचा उदरनिर्वाह आजही शेतीवर अवलंबून आहे. मात्र शेतीतील उत्पन्नातील अस्थिरता, हवामान बदल, पाण्याची टंचाई, बाजारपेठेतील चढ-उतार आणि वाढते उत्पादन खर्च यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सातत्याने दबाव वाढत आहे. अशा वेळी कृषी क्षेत्राकडे केवळ अनुदान देण्याच्या दृष्टीने नव्हे, तर गुंतवणुकीच्या दृष्टीने पाहण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केली. हा दृष्टिकोन दीर्घकालीन परिणाम करणारा ठरू शकतो.

गुंतवणूक म्हणजे केवळ सिंचन प्रकल्प नव्हे. आधुनिक शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान, अचूक शेती, शीतसाखळी, वेअरहाऊस, अन्नप्रक्रिया उद्योग, निर्यातक्षम उत्पादन, जैविक शेती आणि कृषी संशोधन यांचा एकात्मिक विचार केल्याशिवाय ग्रामीण समृद्धी शक्य होणार नाही. या सर्व घटकांमध्ये नियोजनबद्ध गुंतवणूक केली, तर शेती ही केवळ उपजीविकेचे साधन न राहता ती नफ्याचा उद्योग बनू शकते, हा मुख्यमंत्र्यांचा विश्वास शेतकऱ्यासाठी आश्वासक आहेच, पण या भाषणातून ग्रामीण आणि नागरी विकास यांचा समतोल साधण्याचे एक भानदेखील दिसून येत आहे. आतापर्यंत मोठ्या शहरांमध्ये उद्योग आणि रोजगार केंद्रित झाल्याने ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर झालेल्या स्थलांतरामुळे महानगरांवर लोकसंख्येचा प्रचंड ताण निर्माण होऊन सुविधांची चणचण भासू लागली आहे. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रात कृषी प्रक्रिया उद्योग, ग्रामीण औद्योगिक क्लस्टर आणि स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळाली, तर हा असमतोल कमी होऊ शकतो. ग्रामीण महाराष्ट्राचा शेतीकेंद्रित विकास ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची संधी या धोरणातून निर्माण होत आहे. उद्योग, सेवा आणि शेती हे तीनही स्तंभ राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी परस्परपूरक आहेत. शेती मजबूत झाली तर ग्रामीण खरेदीशक्ती वाढते. ग्रामीण खरेदीशक्ती वाढली की उद्योगांना मोठी बाजारपेठ मिळते. उद्योग वाढले की रोजगार वाढतो आणि राज्याचा महसूल वाढतो. त्यामुळे कृषी गुंतवणूक ही केवळ शेतकऱ्यांच्या हिताची नसून संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचा पाया ठरू शकते. त्यामुळे शेतीमधील गुंतवणुकीतून राज्याच्या तिजोरीची ताकद वाढविण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे पूरक प्रयत्न येत्या काळात महाराष्ट्रात पाहावयास मिळतील, अशी अपेक्षा आहे. द्रुतगती मार्ग, बंदरे, विमानतळ, लॉजिस्टिक पार्क, जलसंपदा आणि डिजिटल पायाभूत सुविधा या सर्वांचा शेतीशी थेट संबंध जोडण्याचा मुख्यमंत्र्यांचा प्रयत्न दिसतो. उत्पादनापासून बाजारपेठेपर्यंतचा खर्च कमी झाला, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न नैसर्गिकरीत्या वाढू शकते. हवामान बदलासारख्या समस्यांच्या पृष्ठभूमीवर शाश्वत शेती विकासाचा महत्त्वाचा घटक ठरणार आहे. पाण्याचा कार्यक्षम वापर, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण, पीक विविधीकरण आणि हवामानस्नेही शेती तंत्रज्ञानाचा प्रसार यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली, तर महाराष्ट्र भविष्यातील कृषी संकटांना अधिक सक्षमपणे तोंड देऊ शकेल. भविष्यात महाराष्ट्राची स्पर्धा इतर राज्यांबरोबरच जागतिक गुंतवणूक, निर्यात आणि तंत्रज्ञानाच्या पातळीवरही असेल. त्यासाठी उद्योगस्नेही वातावरणाबरोबरच कृषिस्नेही राज्याची प्रतिमा निर्माण करणे ही महाराष्ट्राची गरजच आहे. त्यासाठी शेतकरी सक्षम व्हायला हवा. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, ग्रामीण भागात रोजगार निर्माण करणे आणि कृषी मूल्यसाखळी मजबूत करणे या तीन उद्दिष्टांची सांगड घातली, तर महाराष्ट्र देशातील सर्वाधिक संतुलित अर्थव्यवस्था असलेले राज्य बनू शकते. आज महाराष्ट्र एका नव्या वळणावर उभा आहे. या वळणावर घेतलेले निर्णय पुढील पिढ्यांचे आर्थिक भविष्य ठरवतील. त्यामुळे कृषी क्षेत्रातील गुंतवणूक ही राज्याच्या सर्वांगीण विकासाची नवी विचारधारा ठरावी आणि मुख्यमंत्र्यांच्या संकल्पातील कृतीचे दिवस तातडीने सुरू व्हावेत, हीच महाराष्ट्राची अपेक्षा आहे. ■

## अर्थविशेष

**ॲड. हितेश पारसे**

# वरिष्ठ नागरिक आणि नवीन करप्रणाली

भारतातील करव्यवस्था दिवसेंदिवस अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित होत आहे. आयकर विभागाकडून वार्षिक माहिती विवरणपत्र, करदात्याची माहिती सारांश, ऑनलाईन पडताळणी आणि डिजिटल व्यवहारांच्या माध्यमातून करदात्यांच्या आर्थिक व्यवहारांवर अधिक प्रभावी देखरेख ठेवली जात आहे. अशा परिस्थितीत, विशेषतः वरिष्ठ नागरिकांनी आयकर नियमांची योग्य माहिती असणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

सेवानिवृत्तीनंतर बहुतांश नागरिकांचे उत्पन्नाचे स्वरूप बदलते. नियमित पगाराऐवजी पेन्शन, मुदत ठेवींवरील व्याज, ज्येष्ठ नागरिक बचत योजना, पोस्ट ऑफिस बचत योजना, घरभाडे, लाभांश किंवा इतर गुंतवणुकीतून मिळणारे उत्पन्न हे त्यांच्या आर्थिक जीवनाचा मुख्य आधार बनते. त्यामुळे करप्रणालीची योग्य निवड आणि करनियोजन अधिक महत्त्वाचे ठरते.

दरवर्षी आयकर रिटर्न भरण्याच्या कालावधीत वरिष्ठ नागरिकांमध्ये एकच प्रश्न वारंवार विचारला जातो ' ''जुनी करप्रणाली निवडावी की नवीन?'' सोशल मीडियावरील संदेश, अपूर्ण माहिती आणि ऐकीव सल्ल्यांमुळे अनेक गैरसमज निर्माण होतात. परिणामी, अनेक ज्येष्ठ नागरिक अनावश्यक कर भरतात किंवा चुकीच्या माहितीमुळे भविष्यात आयकर विभागाच्या नोटिसांना सामोरे जातात.

करप्रणालीची निवड ही फक्त कराचे दर पाहून केली जाऊ नये. प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न, खर्च, गुंतवणूक, आरोग्यविषयक खर्च, गृहकर्ज, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि भविष्यातील आर्थिक नियोजन वेगळे असते. त्यामुळे प्रत्येक करदात्यासाठी एकच करप्रणाली योग्य असेल असे नाही.

**गैरसमज क्रमांक १** – नवीन करप्रणाली प्रत्येक वरिष्ठ नागरिकासाठी फायदेशीर आहे. हा सर्वांत सामान्य गैरसमज आहे. नवीन करप्रणालीमध्ये कराचे दर तुलनेने कमी असले तरी अनेक महत्त्वाच्या करसवलती आणि वजावटी उपलब्ध नसतात. दुसरीकडे, जुनी करप्रणालीमध्ये कायद्यानुसार विविध गुंतवणुकी, आरोग्य विमा, गृहकर्जावरील व्याज, दान आणि इतर खर्चांवर वजावट मिळू शकते. त्यामुळे ज्या वरिष्ठ नागरिकांकडे अशा वजावटींचा लाभ घेण्याची संधी आहे, त्यांच्यासाठी जुनी करप्रणाली अधिक फायदेशीर ठरू शकते. म्हणूनच, कोणतीही करप्रणाली निवडण्यापूर्वी दोन्ही पद्धतींनुसार कराची गणना करूनच अंतिम निर्णय घेणे हितावह ठरते.

**गैरसमज क्रमांक २** – नवीन करप्रणालीमध्ये वरिष्ठ नागरिकांना स्वतंत्र करसवलत आहे. अनेकांना वाटते की वयाच्या आधारावर नवीन करप्रणालीमध्ये वरिष्ठ किंवा अति वरिष्ठ नागरिकांना स्वतंत्र मूलभूत करमुक्त मर्यादा मिळते. प्रत्यक्षात तसे नाही. नवीन करप्रणालीमध्ये सर्व करदात्यांसाठी समान कररचना लागू होते. त्यामुळे केवळ वयाच्या आधारावर नवीन करप्रणाली अधिक फायदेशीर आहे, असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरू शकते.

**गैरसमज क्रमांक ३** – पेन्शनवर आयकर लागत नाही. सेवानिवृत्तीनंतर मिळणारी नियमित पेन्शन ही आयकराच्या दृष्टीने करपात्र उत्पन्न मानली जाते. अनेक ज्येष्ठ नागरिक केवळ पेन्शनवर आयकर लागत नाही असा समज करून घेतात. प्रत्यक्षात पेन्शनबरोबरच एफडीवरील व्याज, घरभाडे, लाभांश, भांडवली नफा किंवा इतर उत्पन्न असल्यास त्यावर कर लागू होऊ शकतो. त्यामुळे एकूण वार्षिक उत्पन्नाचा विचार करूनच कराची गणना केली जाते.

**गैरसमज क्रमांक ४** – बँकेने टी.डी.एस. कापला म्हणजे कराची जबाबदारी संपली. टी.डी.एस. म्हणजे अंतिम कर नव्हे. बँक किंवा इतर संस्था फक्त कायद्यानुसार ठरावीक प्रमाणात कर कपात करतात. प्रत्यक्ष कराची गणना एकूण उत्पन्नाच्या आधारे केली जाते. काही वेळा अतिरिक्त कर भरावा लागू शकतो, तर काही वेळा जास्त टी.डी.एस. कापल्यामुळे करपरतावा मिळू शकतो. त्यामुळे टी.डी.एस. कापला गेला म्हणून आयकर रिटर्न भरण्याची गरज नाही, हा समज चुकीचा आहे.

**गैरसमज क्रमांक ५** – फॉर्म १५एच भरला म्हणजे आयकर भरावा लागत नाही. फॉर्म १५एच हा करमुक्तीचा दस्तावेज नसून फक्त ठरावीक परिस्थितीत टी.डी.एस. टाळण्यासाठी दिले जाणारे घोषणापत्र आहे. जर प्रत्यक्ष उत्पन्न करपात्र असेल, तर फॉर्म १५एच भरला असला तरी आयकर भरण्याची जबाबदारी कायम राहते. अनेक वरिष्ठ नागरिक या दोन्ही बाबींमध्ये गोंधळ करतात.

**गैरसमज क्रमांक ६** – एफडीवरील व्याज बँकेने दाखवले नाही तर कर लागत नाही

आजच्या डिजिटल युगात आयकर विभागाकडे एआयएस, टीआयएस आणि फॉर्म २६एएस च्या माध्यमातून बहुतांश आर्थिक व्यवहारांची माहिती उपलब्ध असते. त्यामुळे मुदत ठेवींवरील संपूर्ण व्याज उत्पन्न आयकर विवरणपत्रात दाखवणे आवश्यक आहे. टी.डी.एस झाला अथवा झाला नाही, यावर करपात्रता अवलंबून नसते.

**गैरसमज क्रमांक ७** – मुलांनी परदेशातून पाठवलेले सर्व पैसे करपात्र असतात परदेशात राहणाऱ्या मुलांनी आपल्या आई-वडिलांना आर्थिक मदत म्हणून पाठविलेली रक्कम सामान्यतः प्राप्तिकराच्या कक्षेत येत नाही. मात्र त्या रकमेची पुढील गुंतवणूक करून मिळणारे व्याज किंवा इतर उत्पन्न करपात्र असू शकते. त्यामुळे मूळ रक्कम आणि त्या रकमेवर मिळणारे उत्पन्न यामधील फरक समजून घेणे आवश्यक आहे.

**गैरसमज क्रमांक ८** – निवृत्त झाल्यावर आयकर रिटर्न भरण्याची गरज नसते. सेवानिवृत्ती म्हणजे आयकरातून सूट नव्हे. जर कायद्यानुसार रिटर्न भरण्याची अट लागू होत असेल, तर निवृत्त व्यक्तीनेही वेळेत आयकर विवरणपत्र भरले पाहिजे. नियमित रिटर्न भरणे भविष्यात बँक कर्ज, व्हिसा, आर्थिक व्यवहार, करपरतावा तसेच आयकर विभागाच्या पडताळणीसाठी उपयुक्त ठरते.

**वरिष्ठ नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी?**

करनियोजन करताना खालील बाबींचा विशेष विचार करावा-

- प्रत्येक वर्षी जुनी आणि नवीन करप्रणालीची तुलना करूनच पर्याय निवडावा.
- एआयएस, टीआयएस आणि फॉर्म २६एएस मधील माहिती तपासून आयकर विवरणपत्र भरावे.
- सर्व बँकांमधील व्याज, पेन्शन, भाडे, लाभांश आणि इतर उत्पन्नाची अचूक नोंद ठेवावी.
- आरोग्य विमा, गुंतवणूक, वैद्यकीय खर्च आणि इतर आवश्यक कागदपत्रे व्यवस्थित जतन करावीत.
- सोशल मीडियावरील अपूर्ण माहितीवर विश्वास न ठेवता तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

**निष्कर्ष :** करबचत म्हणजे केवळ कमी कर भरणे नव्हे, तर कायद्याच्या चौकटीत राहून उपलब्ध असलेल्या सवलतींचा योग्य लाभ घेणे होय. प्रत्येक वरिष्ठ नागरिकाची आर्थिक परिस्थिती वेगळी असल्याने करप्रणालीची निवडही वैयक्तिक स्वरूपाची असते. चुकीची माहिती, अपूर्ण मार्गदर्शन किंवा ऐकीव सल्ल्यावर अवलंबून राहिल्यास अनावश्यक कर, व्याज, दंड किंवा आयकर विभागाच्या नोटिसांचा सामना करावा लागू शकतो.

म्हणूनच, आयकर रिटर्न भरण्यापूर्वी आपल्या उत्पन्नाचे स्वरूप, उपलब्ध करसवलती आणि दोन्ही करप्रणालींचा तुलनात्मक अभ्यास करूनच अंतिम निर्णय घ्यावा. योग्य करनियोजन हे केवळ करबचतीचे साधन नसून आर्थिक सुरक्षिततेचा महत्त्वाचा पाया आहे. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# सेवेतून दरवळतो भक्तीचा सुगंध!

जिव्हाळा कमी होतो आहे आणि देखावा वाढतो आहे. कृत्रिमतेचा भाव दिवसेंदिवस 'वधारत' असताना दुसरीकडे सेवाभाव तेवढाच 'खोल रुजतो' आहे. देशात सध्या दोन मोठ्या यात्रा सुरू आहेत. जगन्नाथपुरीतील महायात्रेसोबत नागपूर, वर्धेसह सर्वत्र जगन्नाथाची उप-शोभायात्रा निघाली आहे. महाराष्ट्रात विठू माउलीच्या दर्शनाची ओढ वारकऱ्यांना अजून जवळ घेऊन जाते आहे. आषाढ जवळ आला की महाराष्ट्राच्या मातीत चैतन्य संचारते. गावागावांतून टाळ-मृदंगाचा नाद घुमू लागतो आणि लाखो पावलं पंढरीच्या दिशेने निघतात. प्रत्येक पावलात भक्ती, प्रत्येक श्वासात नाम आणि प्रत्येकाच्या नजरेत विठ्ठलाच्या दर्शनाची आस असते. पण या लाखो पावलांबरोबर आणखी एक प्रवास सुरू असतो तो म्हणजे सेवेचा! वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला एक मोठा संदेश दिला आहे. 'भक्ती आणि सेवा' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. विठ्ठलाच्या भेटीला जाणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करणे म्हणजे प्रत्यक्ष विठ्ठलाची सेवा असा भाव असतो. म्हणूनच या मार्गावर कोणी पिण्याचे पाणी देतो, गरम चहा, फराळ, अन्नदान, आरोग्य तपासणी, औषधं तर कोणी मुक्कामाची व्यवस्था करतो. या सेवेच्या परंपरेत एक अत्यंत हृदयस्पर्शी चित्र दिसते आहे. पालखी मार्गावर अनेक ठिकाणी नाभिक बांधव वारकऱ्यांची मोफत दाढी आणि केस कापून देत आहेत. अनेक दिवस चालत आलेल्या वारकऱ्यांना दाढी करून देणे, केस नीट करणे, त्यांना ताजेतवाने करणे म्हणजे त्यांच्या पुढील प्रवासाला नवचैतन्य देण्यासारखे नव्हे काय? पालखी मार्गावर अन्नछत्रही मोठ्या प्रमाणात उभारले जातात. तो प्रत्येक वारकऱ्यात माउली शोधत असतो. कुणी नाव विचारत नाही, जात विचारत नाही, धर्म विचारत नाही. तिथे फक्त एकच ओळख असते ती म्हणजे वारकरी! आज अनेक स्वयंसेवी संस्था आरोग्य शिबिरे भरवत आहेत. वैद्यकीय कर्मचारी दिवसरात्र सेवा करीत आहेत. काल-परवा तर एका पोलिस महिलेनेही वारकऱ्यांच्या दिंडीत घेर धरला. पोलिस प्रशासन लाखो वारकऱ्यांच्या संरक्षणासाठी पालखी सोबत आहेत. पण, सोबत असलेल्या महिला पोलिसाने 'राम कृष्ण हरी' म्हणत माउलीची सेवा केली. पोलिस इतरही दिंड्या-पालख्यांमध्ये संरक्षणासाठी असतात. त्यांच्या मनात भाव राहतही असेल. पण, तो प्रकट करता आला नाही. त्या भावाला प्रकट करण्याची संधी 'वारी'ने दिली. काय महानता आहे ना त्या वारीत आणि त्या सेवेत! वारीत जवळपास ३० लाख भाविक असतात. २०१४ मध्ये आयटीच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास करत वारीत स्वच्छतेची वाट पकडली. २०१५ मध्ये 'निरामय वारी'ची संकल्पना मांडली. आता वारीमध्ये जवळपास ३६०० फिरते शौचालय आहेत. त्यामुळे वारीमध्ये अस्वच्छतेत ८० टक्के घट झाल्याचा दावा केला जातो आहे. यातून 'निर्मल वारी ते शाश्वत शेती' असा प्रयोग केला जातो आहे. यातून पांडुरंग, वारकरी आणि सोबत निसर्गाचीही सेवा होते आहे. पावसाळा लागतो. शेतीत पेरणी होते. बियाणी अंकुरतात आणि हा गावचा पाटील आणि गावकरी वारकरी होत सारी शेती त्या माउलीच्या भरोश्यावर सोडून विठुरायाच्या दर्शनासाठी निघून जातो. मग, तो विठुरायाच्या नामस्मरणात दंग होतो. त्याला देहभान नसते. अशावेळी त्याची दाढी-कटिंगही वाढलेली असते. त्यावेळी सेवेचा भाव जागृत ठेवत वारकऱ्यांची दाढी करतो. केस कापून देतो. त्यातून नाभिक पैसे कमावत नाही तर पुण्य कमावतात. डॉक्टर फी घेत नाही, तो समाधान मिळवतो. पंढरपूरचा विठ्ठल वारकऱ्यांच्या चेहऱ्यात, तो त्यांच्या धुळीने माखलेल्या पायांत, तो नामस्मरणात आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो सेवा करणाऱ्या प्रत्येक हातात आहे. आज समाजाला या सेवेच्या संस्काराची अधिक गरज आहे. लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी निघाले आहेत. त्यांच्या पावलांबरोबर लाखो सेवाभावी हातही चालत आहेत. नवीन पिढीला सेवेचा भाव याच माध्यमातून आपोआप शिकवला जात आहे. अशीच सेवा प्रत्येक घरात लेक-सुनांच्या हातून मायबापाची घडावी... तेव्हा वृद्धाश्रमांची गरज निर्माण होणार नाही. मायबापाला घराबाहेर काढण्याची कुबुद्धी कोणाची होणार नाही. माउली त्यावेळी तुमच्या डोक्यावर हात ठेवल्याशिवाय राहणार नाही... माउलीचा प्रसाद आणि आशीर्वाद सर्व एकत्रच असेल... सेवेचा मेवा दीर्घकाळ टिकतो. मग वारीतील माउली असो, पंढरपुराच्या राऊळातील माउली असो की घरातील माउली; तिची सेवा नित्य घडत राहो... भक्तीचा गंध दरवळावा... सेवेचा आनंद असाच घेता यावा... वारी असो घरी! ■

९८८१९०३७६५

## डिजिटल जागृती

**सीए अभय सगदेव**

# वैयक्तिक माहिती म्हणजे नेमके काय?

**डीपीडीपी कायद्याची भाषा समजून घेऊया**

कल्पना करा की तुम्ही प्रथमच एका रुग्णालयात जाता. स्वागत कक्षावर तुमचे नाव, वय, मोबाईल क्रमांक, पत्ता, ई-मेल आणि आपात्कालीन संपर्क क्रमांक विचारला जातो. काही वेळाने प्रयोगशाळा तुमच्या रक्ताच्या नमुन्याची नोंद करते आणि बिलिंग विभाग तुमच्या पेमेंटची माहिती नोंदवतो. ही प्रत्येक माहिती स्वतंत्रपणे साधी वाटते, परंतु ती एकत्र आली की ती तुमची ओळख निर्माण करते. यालाच वैयक्तिक माहिती (पर्सनल डाटा) म्हणतात.

अनेकांना वाटते की वैयक्तिक माहिती म्हणजे फक्त आधार किंवा पॅन क्रमांक. प्रत्यक्षात डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ (डीपीडीपी ॲक्ट) यापेक्षा खूप व्यापक संकल्पना स्वीकारतो. वैयक्तिक माहिती (ओळख पटू शकणाऱ्या व्यक्तीबद्दलची कोणतीही माहिती) मध्ये नाव, छायाचित्र, मोबाईल क्रमांक, ई-मेल, पत्ता, आरोग्यविषयक माहिती, आर्थिक माहिती आणि व्यक्तीची थेट किंवा अप्रत्यक्ष ओळख पटवू शकणारी इतर माहिती यांचा समावेश होतो.

हा कायदा मुख्यतः डिजिटल पर्सनल डाटा (डिजिटल स्वरूपातील किंवा कागदावरून नंतर डिजिटल स्वरूपात रूपांतरित केलेली वैयक्तिक माहिती) यास लागू होतो. शाळा विद्यार्थ्यांची माहिती सॉफ्टवेअरमध्ये ठेवते, डॉक्टर इलेक्ट्रॉनिक वैद्यकीय नोंदी ठेवतात किंवा एखादा व्यापारी ग्राहकांची माहिती संगणकात जतन करतो, तेव्हा डिजिटल वैयक्तिक माहितीची प्रक्रिया होत असते.

प्रोसेसिंग (वैयक्तिक माहितीवर केली जाणारी कोणतीही कृती) हा आणखी एक महत्त्वाचा शब्द आहे. माहिती गोळा करणे, नोंद करणे, साठवणे, वापरणे, शोधणे, बदल करणे, इतरांना देणे किंवा हटविणे-हे सर्व



प्रोसेसिंगमध्ये येते.

डाटा प्रिंसिपल (ज्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती प्रक्रिया केली जाते ती व्यक्ती) हा या कायद्याचा केंद्रबिंदू आहे. माहिती तुमची असेल तर तुम्ही डाटा प्रिंसिपल आहात. अल्पवयीन मुलाच्या बाबतीत त्याचे हक्क सामान्यतः पालक किंवा कायदेशीर पालक वापरतात.

डाटा फिड्युशिअरी (वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशाप्रकारे वापरायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था) ही माहिती हाताळण्याबाबत जबाबदार असते. बँक, रुग्णालय, शाळा, नियोक्ता, ऑनलाईन विक्रेता किंवा व्यावसायिक हे परिस्थितीनुसार डाटा फिड्युशिअरी असू शकतात.

कधी कधी डाटा फिड्युशिअरी दुसऱ्या संस्थेकडून माहितीवर प्रक्रिया करून घेतो. अशा संस्थेला डाटा प्रोसेसर (डाटा फिड्युशिअरीच्या वतीने माहितीवर प्रक्रिया करणारी व्यक्ती किंवा संस्था) म्हणतात. उदाहरणार्थ, क्लाऊड सेवा पुरवठादार किंवा सॉफ्टवेअर सेवा देणारी संस्था.

कन्सेंट (योग्य त्या परिस्थितीत माहिती प्रक्रिया करण्यासाठी दिलेली संमती) आणि नोटीस (माहिती का व कशी वापरली जाणार आहे याची पूर्वसूचना) या दोन संकल्पना नंतर पाहू.

या संज्ञा समजल्या की, उर्वरित कायदा समजणे खूप सोपे होते. व्याख्या पाठ करण्यापेक्षा त्या आपल्या दैनंदिन जीवनात ओळखण्याचा प्रयत्न करा.

**दैनंदिन जीवनातील डीपीडीपी :** पुढच्या वेळी तुम्ही एखादे मोबाईल ॲप डाऊनलोड कराल, ते कोणकोणत्या परवानग्या मागते ते पाहा. टॉर्च ॲपला तुमचे संपर्क का हवेत? खरेदीच्या ॲपला कायम तुमचे स्थान का हवे? असे प्रश्न विचारण्यापासूनच जागरूक डिजिटल नागरिकाची सुरुवात होते.

**तुम्हाला माहिती आहे का? :** एका डिजिटल व्यवहारात तुमची माहिती बँक, पेमेंट गेटवे, व्यापारी आणि सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्म अशा अनेक संस्थांकडून प्रक्रिया केली जाऊ शकते. डीपीडीपी कायदा ही प्रक्रिया जबाबदारीने व्हावी यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरवतो.

**लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे :** पर्सनल डाटा म्हणजे फक्त आधार किंवा पॅन नव्हे. कायदा मुख्यतः डिजिटल पर्सनल डाटावर लागू होतो.

प्रोसेसिंगमध्ये माहिती गोळा करणे, वापरणे, शेअर करणे आणि हटविणे यांचाही समावेश होतो. डाटा प्रिंसिपल, डाटा फिड्युशिअरी आणि डाटा प्रोसेसर या संकल्पना समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**विचार करा :** आज दिवसभरात किती संस्थांनी तुमच्या वैयक्तिक माहितीचा काही ना काही भाग गोळा केला? एकदा लक्ष देऊन पाहा-उत्तर तुम्हालाच आश्चर्यचकित करेल. ■

sagdeo1@gmail.com

## वाचक पत्रे

### ऐकावं ते नवलच!

संपूर्ण अधिक ज्येष्ठ, निज ज्येष्ठ महिना गेला; आषाढही सुरू झाला, परंतु पावसाने म्हणावी तशी हजेरी अजून लावली नाही. मध्ये पश्चिम महाराष्ट्रात पूर येण्याइतका पाऊस दोन दिवस कोसळला; आता परत दडी मारल्याने शेतीविषयक आणि आरोग्यविषयक अनेक समस्या उद्भवू लागल्या आहेत. दमट हवामानामुळे प्रचंड उकाडा वाढला आहे. कुठे अत्यल्प पाऊस पडूनही सिमेंट रस्ते असल्यामुळे पाणी लगेच साचलेले दिसून येत आहे. सर्वजण पावसासाठी साकडे घालत आहेत. परवा तर वाचनात आले, मौदा तालुक्यातील एका गावात पावसासाठी चक्क बाहुला-बाहुलीचे लग्न लावण्यात आले. वरुण राजाला पावसासाठी साकडे घालून पावसाची प्रतीक्षा संपावी म्हणून हे स्वयंवर रचण्यात आले आणि १०० पेक्षा अधिक वऱ्हाडी वरातीत सामील झाले. आता मात्र या सोहळ्यानंतर सगळ्यांना पावसाची चातकासारखी प्रतीक्षा आहे. वरुण राजा लवकर प्रसन्न होवो.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### वारी : मानवी मूल्यांची अन् संस्कृतीची शाळा



महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा म्हणजे वारी, महाराष्ट्राचे वैभव म्हणजे वारी. संतांची शिकवण म्हणजे वारी. वारीची परंपरा साधारणतः ८०० वर्षांहून अधिक काळापासून आहे. वारीची पद्धत काही संतांचे मते पुंडलिकामुळे विठ्ठल पंढरपूरमध्ये आले, त्यानंतर सुरू झाली तर काहींच्या मते आदिशंकराचार्यांपासून सुरू झाली. संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांनी आषाढ महिन्यात पंढरपूरला जाण्यासाठी वारी सुरू केली. दरवर्षी आषाढ महिना जवळ येताच महाराष्ट्रातील वातावरणात नामघोष, मृदंगाचा ताल आणि हजारो वारकऱ्यांच्या पावलांचा आवाज घुमू लागतो. आळंदी आणि देहूपासून पवित्र पंढरपूर शहरापर्यंत चालत जाणाऱ्या २१ दिवसांच्या आध्यात्मिक वारीत माणुसकीची ताकद अनुभवायला येते. या वाटेवर जात, वर्ग, किंवा अहंकाराला स्थान नसते. समाजपरिवर्तनाचा खरा बोध वारीतूनच शिकायला मिळतो. प्रत्येक वारकरी हा विठ्ठलाच्या पायी शरण आलेल्या भावात प्रकट होत असतो. वारीतील वारकरी म्हणजे चालत्या-फिरत्या उत्सवाचा भाग तर टाळ-मृदंगाच्या गजरात चालणारी निष्काम भक्तीचा आणि कष्टाचा असा प्रवास करीत असल्याचे दिसून येते. वारकरी हा पावसाची तमा न बाळगता, गावातील घरांमध्ये स्थानिक रहिवाशांच्या घरी, ज्याला यजमान कृत्य असे म्हणतात अथवा दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणी (पालखी तळावर) तंबूत राहणे, साधे जेवणे आणि भक्तिरसात दंग झाल्याचे दिसून येतात. वारीतील रात्रीचा मुक्काम लोककलांच्या सादरीकरणाने आणि उत्साहामुळे एकतेचा उत्सव बनतो. वारी ही केवळ एक यात्रा नसून आत्माची शुद्धी आणि समाज जोडणारा एक मोठा सोहळा आहे. थोडक्यात सांगायचे तर वारी म्हणजे मानवाला माणुसकीचे धडे देणारी आणि एकमेकांशी जोडणारी तर मानवी मूल्यांची आणि संस्कृतीची जपणूक करणारी अनमोल जीवन शाळा आहे.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

■■

### 'जावे त्याच्या वंशा'

काही वाक्यांचा अर्थ शब्दकोशात सापडत नाही. तो आयुष्याच्या अनुभवातून उलगडतो. 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' ही म्हण त्यापैकीच एक. आयुष्याच्या प्रवासात अनेकदा आपण इतरांच्या वागण्याचा, निर्णयाचा किंवा भावनांचा न्याय करतो, पण जेव्हा तीच वेळ आपल्यावर येते तेव्हा आपल्या विचारांना एक नवी दिशा मिळते. लहानपणी वडीलधारी मंडळी काही गोष्टी सांगायचे, शिस्त लावायचे किंवा एखादा निर्णय घ्यायचे त्यावेळी तो अन्याय वाटायचा; पण जेव्हा स्वतःवर जबाबदाऱ्या स्वीकारण्याची वेळ आली तेव्हा त्यांच्या प्रत्येक निर्णयामागची काळजी, दूरदृष्टी, प्रेम समजून आले. तेव्हा मनात अनेक प्रश्न असायचे- असेच का? तसेच का? जसजसा काळ पुढे सरकत जातो तसे आयुष्य वेगवेगळे अनुभव देऊन जातात आणि तेव्हा त्या गोष्टी आठवतात आणि त्या प्रत्येक शब्दाची आठवण होते आणि कळतं किती खरं होतं ते सांगायचे ते. दुसऱ्याच्या आयुष्याकडे पाहून मत मांडणे खूप सोपे असते, पण तीच परिस्थिती स्वतःवर आली की प्रत्येक निर्णयाची विवशता आणि संघर्ष समजू लागतो. एखादा मित्र अडचणीत असताना आपण सहज सल्ला देतो पण तशीच अडचण स्वतःच्या आयुष्यात आली की लक्षात येतं सल्ला देणे सोपे असते, पण त्या परिस्थितीत टिकून राहणे कठीण असते. म्हणूनच अनुभव माणसाला नम्र बनवतो, तो इतरांविषयीचा दृष्टिकोन बदलतो आणि संवेदनशीलता वाढवतो. म्हणूनच 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' ही म्हण आजही तितकीच जिवंत आणि सत्य आहे. काही गोष्टी ऐकून समजत नाहीत, त्या जगाव्या लागतात, अनुभवाव्या लागतात तेव्हाच इतरांच्या शब्दाचं आणि अनुभवाच मोल उमगत. दुसऱ्याचा न्याय करण्यापेक्षा त्याला समजून घेण्याचा प्रयत्न केला तर नाती अधिक सुंदर आणि समृद्ध होतील. ■

**सरिता पुराडभट**/नागपूर

■■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





# पद्मशाली समाजातील पहिले न्यायाधीश विष्णू दासरी यांचा सन्मान

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

पद्मशाली समाजातील पहिले न्यायाधीश म्हणून विष्णू दासरी यांचे नुकतेच सेवानिवृत्ती झाल्याबद्दल त्यांचा सोलापूरातील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशनच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते म्हणून परिचित असलेल्या माजी नगरसेवक विठ्ठल कोटा यांच्या हस्ते शाल, बुके देउन आणि पेढे भरवून गुरुवारी सकाळी सत्कार करण्यात आला आहे. न्यायाधीश म्हणून विष्णू दासरी हे सन २००५ साली कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुका येथे पहिल्यांदा सेवेत रुजू झाले. एमपीएससी परिक्षेच्या माध्यमातून त्यांची निवड झाली होती. महाराष्ट्रातील जवळपास ७ तालुक्यात न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. २१ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. फाउंडेशनचे संस्थापक गौरीशंकर कोंडा यांच्या पुढाकारातून हा सन्मान कार्यक्रम करण्यात आला. यावेळी फाउंडेशनचे समन्वयक किशोर व्यंकटगिरी, प्रशांत येमूल, ओमसी पल्ली आदी उपस्थित होते.

# समाजसेवक डॉ. अशोक लांबतुरे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आज सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

समाजसेवक व दलितमित्र मा. डॉ. अशोक लांबतुरे यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त येत्या शुक्रवार, १७ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विजापूर रोडवरील कोणार्क नगर येथील जगदीशश्री लॉन्स अँड बँक्वेट हॉल येथे भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अमृत महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्ती, संस्था, गुणवंत विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांचा गौरव करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे सचिव डॉ. श्रीकांत येळेगांवकर यांनी दिली.

या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते विशेष 'गौरव अंकाचे' प्रकाशन करण्यात येणार असून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील अनेक दिग्गजांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमास जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार भाऊसाहेब वाघचवरे, खासदार ज्योती वाघमारे, माजी मंत्री बबनराव घोलप यांच्यासह आमदार डॉ. सुरेशभाऊ खाडे, डॉ. अशोकराव माने, किसनराव वानखेडे, समाधान आवताडे, सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, सचिन कल्याणशेट्टी आणि देवेंद्र कोठे उपस्थित राहणार आहेत. समितीचे अध्यक्ष बिपीनभाई पटेल कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. या प्रसंगी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) परीक्षेत देशात आठवा क्रमांक मिळवणारे मयूरेश वाघमारे यांचा विशेष नागरी



सत्कार करण्यात येणार आहे. तसेच उद्योजक राम रेड्डी, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे सचिव व अश्विनी रुग्णालयाचे संचालक जयेश पटेल, 'जीवनगौरव' पुरस्कार प्राप्त बापूसाहेब आडसूळ, ए.एल. प्रतिष्ठानचे अंबाण्णा काळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव होणार आहे.

अश्विनी सहकारी रुग्णालयातील रक्तदान शिबिरात २०३ रक्तपिशव्यांचे विक्रमी संकलन केल्याबद्दल डॉ. प्रशांत औरंगाबादकर, सचिन बिज्जरगी, एम.बी. जमादार, अशोक कांबळे व किरण व्हनकोरे यांचा सन्मान करण्यात येईल. पर्यावरण संवर्धनासाठी रेल्वे परिसरात सुमारे १४ ते १५ हजार झाडे लावणारे परशुराम लांबतुरे तसेच वृक्षारोपणासाठी योगदान देणारे मधुकर गवळी व नानासाहेब लोखंडे यांचाही विशेष गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि ज्येष्ठ नागरिकांचा प्रातिनिधिक सत्कार होणार असून कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन होईल. डॉ. अशोक लांबतुरे यांच्या समाजकार्याचा गौरव करणाऱ्या या अमृत महोत्सव सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष बिपीनभाई पटेल, सचिव डॉ. श्रीकांत येळेगांवकर व अमृत महोत्सव समितीने केले आहे.

# कासेगावची संघमित्रा गायकवाड प्रथम

## सुयोग फाऊंडेशनची आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा; गुणवंतांचाही सत्कार

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

येथील सुयोग फाऊंडेशन व धनश्री मल्टीस्टेट यांचे वतीने १२व्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत कासेगावची संघमित्रा गायकवाड प्रथम आली.

यात ११ शाळांतील ३८ स्पर्धक होते. स्पर्धेनंतर विजेत्यांसह पंचक्रोषीतील गुणवंतांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.जयसुधा कोठा व श्रध्दा पवार यांनी परिक्षण केले. डॉ.रविराज गायकवाड यांनी सुत्रसंचालन केले. यावेळी धनश्री मल्टी स्टेटच्या संचालिका डॉ. राजलक्ष्मी गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेचे धपाटे, पटेल, रमिजा, राधा गायकवाड, धनंजय बुरकुल, प्रविण शिंदे, एजाज कोतवाल यांनी आयोजन केले होते.




उत्कृष्ठ शाळा म्हणून जि.प.प्रशाला माळुंब्रा यांना व ए. आय. आर. रँक ३०९१ आणि एथड रँक ३५७ मिळवणारा वास्तवसिंह नारायणराव वडणे याचा विशेष गौरव करण्यात आला. यावेळी जयमाला वडणे, उमेश जगताप, क्षिरसागर, सिताफळे, साळुंखे, शिंगारे व विविध शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

**अंतिम निकाल (प्रथम तीन व उत्तेजणार्थ) :** संघमित्रा गायकवाड (कासेगाव), कार्तिकी हेडे (तामलवाडी), स्वरांजली तुळसे (माळुंब्रा), इंद्रजित तिवारी (तामलवाडी, श्रावणी जाधव (राळेरास).

**सत्कारमूर्ती दहावीतील गुणवंत विद्यार्थी :** दुर्गा वडणे, श्रावणी डोंगरे, समिक्षा डोके, समृध्दी गवळी, समृध्दी कदम.

## हरवले आहे

एलसी आणि मार्कलिस्ट हरवले आहे. दिनांक ०१ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वा. वळसंग ते सोलापूर प्रवास दरम्यान समर्थ राजशेखर बिराजदार नावे असलेले विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी आलमाल,तालु. औसा ,जिल्हा लातूर येथून सन २०२२-२३ सालीचे डिप्लोमा इलेक्ट्रिक इंजिनिअरिंग फर्स्ट इयर शाळेचा दाखला असून रजिस्टर नंबर - २२१०९५०३४६ असा व दहावी पुणे बोर्ड चे मार्कशीट या दोन्ही बस मध्ये गहाळ झाले आहे. ज्यांना सापडला असेल त्यांनी खालील पत्त्यावर आणून द्यावी त्यांना योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**समर्थ राजशेखर बिराजदार**
**सुरेश संबण्णा वागदरी**
(आजोबा) ९८२२८५१६८१
मु.पो. वळसंग,
तालुका दक्षिण सोलापूर,
जिल्हा सोलापूर.

## मध्य रेल्वे
### सोलापूर मंडळ
**विद्युत काम**

निविदा क्र. SUR/L/T/2026/12

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामांसाठी नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट संकेतस्थळावर www.ireps.gov.in ऑनलाईन ई-निविदा मागवत आहेत. कामाचे नाव: खालील कामांच्या संदर्भातील विद्युत सामान्य सेवा भाग: १) ADEN/W/SUR च्या अंतर्गत (सोलापूर) येथे जुन्या क्वार्टर्सच्या जागी नवीन क्वार्टर्सचे बांधकाम (Type-II-६ युनिट्स, Type-III-४ युनिट्स आणि Type-IV- २ युनिट्स). २) ADEN/LUR च्या अंतर्गत (लातूर) येथे नवीन क्वार्टर्सचे बांधकाम (type-III- ४ युनिट्स), (औसा) (type-II- ४ युनिट्स), (ढोकी) (type-II- २ युनिट्स). ३) ADEN/KWV(BG) च्या अंतर्गत KWV (कुर्डूवाडी) येथे जुन्या क्वार्टर्सच्या जागी नवीन क्वार्टर्सचे बांधकाम (Type-II- ४ युनिट्स), (माळशिरस) (Type-III- ४ युनिट्स) आणि च्या अंतर्गत (Type-II- ४ युनिट्स, Type-III- ४ युनिट्स) संपूर्ण सोलापूर विभागात. निविदेचा संक्षिप्त तपशील: अंदाजित खर्च : रु. ५८,९७,८९३.८७/-, बयाणा रक्कम/सुरक्षा ठेव : रु. १,१८,०००.००/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी : ०८ महिने, देकाराची वैधता : ६० दिवस संकेतस्थळावर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: ११/०८/२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजता बयाणा रक्कम शुल्क भरण्याची पद्धत: www.ireps.gov.in या संकेतस्थळावर ई-पेमेंटद्वारे भरावे लागेल.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता,**
**DE/35 मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा,
फुटबोर्डवरून प्रवास करणे टाळा

## महाळुंग श्रीपूर नगरपंचायत, महाळुंग श्रीपूर.
### जाहीर प्रसिध्दीकरण

जा.क्र पा.पु. २६/२०२६ दिनांक १६/०७/२०२६

या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे सर्व पुरवठादार यांना कळविण्यात येते की, महाळुंग श्रीपूर नगरपंचायतीच्या विविध विभागाकडील कामाबाबतचे / साहित्याबाबतचे दरपत्रक मागविणेत येत आहेत. दरपत्रकाची माहिती व निविदा नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत दिनांक १७/०७/२०२६ ते २३/०७/२०२६ रोजी पर्यंत उपलब्ध राहील व स्वीकारल्या जातील मुदती नंतर आलेले दरपत्रके विचारात घेतल्या जाणार नाहीत. निविदेबाबतचे सर्व अधिकार मुख्याधिकारी महाळुंग श्रीपूर नगरपंचायत यांनी राखून ठेवलेले आहेत.

शिक्का

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**महाळुंग श्रीपूर नगरपंचायत**

## CHANGE IN NAME

I hereby declare that my old name **SHAIKH ARABAJ BABA** has been changed to New Name **ARBAJ BABASAHEB SHAIKH** and residing at Gadegoan, Tal. Barshi, Dist. Solapur Kindly note the same.

**Gazzete No.**
(P-25114643)
Date - 29/01/2026

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 155083070 | मालमत्तेवर कर्ज | १. स्नेहलता नंदकुमार गायकवाड<br>२. नंदकुमार पोपट गायकवाड<br>३. पोपट विठ्ठल गायकवाड | 20/06/2026 | INR 7,62,110.81/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिळकत नं. ३११, एकूण मोजमाप क्षेत्र ३०६.८८ चौ. मीटर, गाव: वाटंबरे, ग्रामपंचायत वाटंबरे हद्दीत, तालुका: सांगोला, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०७ मधील मालमत्तेचा संपूर्ण हिस्सा आणि भाग, ज्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व: ग्रामपंचायत रस्ता, पश्चिम: मिळकत नं. ३१० महादेव कृष्णा निकम, उत्तर: पि.डब्ल्यु.डी. रस्ता, दक्षिण: ग्रामपंचायत क्षेत्र

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 17/07/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

## बार्शी नगरपरिषद बार्शी
### स्थापत्य विभाग

ई- निविदा सुचना क्र.४ सन-२०२६/२७
Main Portal : http://mahatenders.gov.in

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गाचे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून बार्शी नगरपरिषदेकडील खालील अ.नं.१ ते २ कामांकरिता ई-नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे(ऑनलाईन) मागवित आहेत.

### ई- निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १) | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांक:- १६/७/२६ वेळ दुपारी १६:०० पासून<br>दिनांक:- २३/७/२६ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| २) | निविदा ऑनलाईन अपलोड करण्याचा कालावधी | दिनांक:- १६/७/२६ वेळ दुपारी १६:०० पासून<br>दिनांक:- २३/७/२६ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| ३) | बयाणा रकमेची ऑनलाईन पे स्लीप आणि ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलोड करण्यासाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे स्लीप व्यक्तिशः स्वतः चे नावाची गोपनियता बाळगुन सिलबंद लखोट्यात तांत्रिक लिफाफ्यास सह सादर करणेचा दिनांक | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयामध्ये दिनांक २३/७/२६ रोजी दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| ४) | तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक वेळ | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयात दिनांक २४/७/२६ रोजी दु. १६:०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील (शक्य झाल्यास) |

**टिप :-**

१. सर्व पात्र / इच्छुक निविदाधारकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई- निविदा प्रणालीच्या Main portal - "http://mahatenders.gov.in व याच "http://mahatenders.gov.in साईटवर enrolled करणे आवश्यक आहे.
२. निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/ अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनीवर संपर्क साधावा. टोल फ्री नंबर (१८००-२३३-७३१५).
३. निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्त ऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच बयाणा रकमेची ऑनलाईन पे स्लीप व ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलोड करणेसाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे स्लीप स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगुन ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांक वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडणेत येणार नाही. याची नोंद घ्यावी.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पाहण्यास मिळतील सदर कामाची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
५. ई-निविदेमध्ये तांत्रिक लिफाफा क्र. १ मधिल अपलोड केलेल्या कागदपत्राची हार्ड कॉपीची प्रमाणित प्रत दि.२३/७/२०२६ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात जमा करणेची आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**बार्शी नगरपरिषद**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, माढा यांचे कार्यालय
### संकलन जन्म-मृत्यू

रयत शिक्षण संस्थेचे जुने कला व वाणिज्य महाविद्यालयाची जुनी इमारत माढा. ता. माढा जि- सोलापूर

दुरध्वनी क्रमांक- ०२१८३ २३४०३१ ई-मेल-tahmadha@gmail.com

जा.क्र.२०२६/जन्म/मृत्यू/एसआर/३३४१/१०/२०२६ दिनांक- १३/०७/२०२६

### जाहिर प्रसिध्दीकरण

१. श्री दत्तात्रय विठ्ठल इंगळे रा. कुर्डू ता. माढा जि- सोलापूर --अर्जदार
विरुद्ध
२. ग्रामपंचायत अधिकारी कुर्डू ता. माढा जि- सोलापूर --सामनेवाला

ज्या अर्थी अर्जदार श्री दत्तात्रय विठ्ठल इंगळे रा. कुर्डू ता. माढा जि- सोलापूर यांनी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व जन्म-मृत्यू नोंदणी कायदा सुधारणा २०२३ चे कलम १३ (३) प्रमाणे या कार्यालयाकडे अर्ज सादर करून, त्यांचे पत्नी सुवर्णा दत्तात्रय इंगळे यांचे निधन हे मौजे कुर्डू येथे दिनांक ०१/०४/१९२१ रोजी झाले असून सदर मृत्यूची नोंद निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालय, ग्रामपंचायत कुर्डू ता. माढा येथे करणेबाबत आदेश मिळणेबाबत विनंती केली आहे.

त्या अर्थी मी तमाम जनतेस या जाहिर प्रसिध्दीकरणाव्दारे सुचित करतो की, अर्जदार यांचे वरील अर्जानुसार या कार्यालयाकडून चौकशीचे कामकाज सुरू असून, सुवर्णा दत्तात्रय इंगळे यांचे निधन हे मौजे कुर्डू येथे दिनांक ०१/०४/१९२१ रोजी झाले असून, ग्रामपंचायत कुर्डू ता. माढा यांचे मार्फत स्थानिक चौकशी करण्यात आली असून, पोलीस प्रशासनाकडून देखील तपास अहवाल मागविण्यात आला आहे.

सदर जन्माची नोंद दाखल करणेबाबत या कार्यालयाकडून आदेश पारित करण्याकरिता कोणाची लेखी अथवा तोंडी हरकत असल्यास अथवा कोणाचा काही सदर नोंदशी संबंध असल्यास सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण स्थानिक दैनिकात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५(पंधरा) दिवसात आपली लेखी अथवा तोंडी हरकत समक्ष उपस्थित राहून तहसील कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत/तक्रार प्राप्त न झाल्यास वरील प्राप्त चौकशी अहवालावरून व पुराव्यावरून अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेनुसार जन्म नोंद करणेबाबत देणेबाबत योग्य ते आदेश निबंधक जन्म-मृत्यू माढा यांना देण्यात येतील. तद्नंतर कोणाची काही एक तक्रार विचारत घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(संजय भोसले)**
**तहसीलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, माढा यांचे कार्यालय
### संकलन जन्म-मृत्यू

रयत शिक्षण संस्थेचे जुने कला व वाणिज्य महाविद्यालयाची जुनी इमारत माढा. ता. माढा जि- सोलापूर

दुरध्वनी क्रमांक- ०२१८३ २३४०३१ ई-मेल-tahmadha@gmail.com

जा.क्र.२०२६/जन्म/मृत्यू/एसआर/३८३४/२२/२०२६ दिनांक- १३/०७/२०२६

### जाहिर प्रसिध्दीकरण

१. मुमताज सिराज शेख रा. कुर्डू ता. माढा जि- सोलापूर --अर्जदार
विरुद्ध
२. ग्रामपंचायत अधिकारी कुर्डू ता. माढा जि- सोलापूर --सामनेवाला

ज्या अर्थी अर्जदार मुमताज सिराज शेख रा. कुर्डू ता. माढा जि- सोलापूर यांनी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व जन्म-मृत्यू नोंदणी कायदा सुधारणा २०२३ चे कलम १३ (३) प्रमाणे या कार्यालयाकडे अर्ज सादर करून, त्यांचे स्वतःचा यांचे जन्म हा मौजे कुर्डू येथे दिनांक ०५/०६/१९७५ रोजी झाले असून सदर जन्माची नोंद निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालय, ग्रामपंचायत कुर्डू ता. माढा येथे करणेबाबत आदेश मिळणेबाबत विनंती केली आहे.

त्या अर्थी मी तमाम जनतेस या जाहिर प्रसिध्दीकरणाव्दारे सुचित करतो की, अर्जदार यांचे वरील अर्जानुसार या कार्यालयाकडून चौकशीचे कामकाज सुरू असून, मुमताज सिराज शेख जन्म हा मौजे कुर्डू येथे दिनांक ०५/०६/१९७५ रोजी झाले असून, ग्रामपंचायत कुर्डू ता. माढा यांचे मार्फत स्थानिक चौकशी करण्यात आली असून, पोलीस प्रशासनाकडून देखील तपास अहवाल मागविण्यात आला आहे.

सदर जन्माची नोंद दाखल करणेबाबत या कार्यालयाकडून आदेश पारित करण्याकरिता कोणाची लेखी अथवा तोंडी हरकत असल्यास अथवा कोणाचा काही सदर नोंदशी संबंध असल्यास सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण स्थानिक दैनिकात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५(पंधरा) दिवसात आपली लेखी अथवा तोंडी हरकत समक्ष उपस्थित राहून तहसील कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत/तक्रार प्राप्त न झाल्यास वरील प्राप्त चौकशी अहवालावरून व पुराव्यावरून अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेनुसार जन्म नोंद करणेबाबत देणेबाबत योग्य ते आदेश निबंधक जन्म-मृत्यू माढा यांना देण्यात येतील. तद्नंतर कोणाची काही एक तक्रार विचारत घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(संजय भोसले)**
**तहसीलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा**

## बँक ऑफ महाराष्ट्र
### आंचलिक कार्यालय, सोलापूर

पहिला मजला, अग्रवाल पॅलेस, भारती विद्यापीठ रोड, जुळे सोलापूर, पिन - ४१३००४

### कब्जा नोटीस - अचालेर शाखा

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, त्यांनी सदर कायद्याच्या कलम १३ (२) अंतर्गत दिनांक ०७.०५.२०२६ रोजी मागणी नोटीस बजावली होती. याद्वारे कर्जदार श्री. प्रकाश हेमासिंग पवार आणि श्रीमती. निलम प्रकाश पवार यांना नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम रु. १७,३४,९३६/- (अक्षरी रुपये सतरा लाख चौतीस हजार नऊशे छत्तीस फक्त) आणि त्यासोबतच गृहकर्ज सुविधेसाठी मासिक विश्रांतीवर न लागलेले व्याज, तसेच करारातील दरानुसार वरील रकमेवरील पुढील व्याज आणि दिनांक ०७.०५.२०२६ पासून प्रत्यक्ष पेमेंटच्या तारखेपर्यंत उद्भवलेला/उद्भवणारा आनुषंगिक खर्च, किंमत, शुल्क इत्यादींची परतफेड सदर नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यास सांगितले होते.

कर्जदार आणि वर नमूद केलेले इतर संबंधित ही रक्कम परत करण्यात अपयशी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि विशेषतः वर नमूद केलेल्या इतरांना आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सदर नियमांच्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक कब्जा दिनांक १४.०७.२०२६ रोजी घेतला आहे.

कर्जदार आणि विशेषतः वर नमूद केलेल्या इतरांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये. या मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार हा बँक ऑफ महाराष्ट्र, अचालेर शाखा यांच्याकडे असणाऱ्या रु. १७,३४,९३६/- (अक्षरी रुपये सतरा लाख चौतीस हजार नऊशे छत्तीस फक्त) या रकमेच्या भाराच्या अधीन राहील; तसेच यावर दिनांक ०७.०५.२०२६ पासून करारातील दरानुसार पुढील व्याज आणि आनुषंगिक खर्च, किंमत, शुल्क इत्यादी लागू राहील.

**मालमत्तेचे वर्णन**

मिळकत नं. ८४०, मोजमाप २५५.४२५ चौ. मीटर, फ्लॅट/घर नं. ८४०, बिल्डिंग विंग - पहिला मजला, आळूर उमरगा, जि. उस्मानाबाद, परिसर/गाव आळूर तांडा, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद - ४१३६०५ मधील मालमत्तेचा संपूर्ण हिस्सा आणि भाग, ज्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत:

**चतुःसीमा :-**
**पूर्व** : १० फूट रुंद रस्ता — **पश्चिम** : खुली जागा
**दक्षिण** : मंदिर रस्ता — **उत्तर** : सतीश शिवाजी पवार

**दिनांक: १४.०७.२०२६**
**स्थळ: अचालेर-धाराशिव**

शिक्का

**सही/-**
**अधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ महाराष्ट्र**

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः शहर बार्शी तालुका बार्शी पैकी बार्शी म्यु.पल हद्दीतील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अ) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे अलिपूर येथील जमीन गट नं. २० यापैकी क्षेत्र हे ००-२० आर, आकार रु. ००-५७ पैसे, यासी चतुसिमा पुर्वेस- बायपास रस्ता, दक्षिणेस- १० फुटी रस्ता, पश्चिमेस- उर्वरीत गट नंबर पैकी जागा, उत्तरेस- उर्वरीत गट नंबर पैकी नामदेव वायकर यांची जागा, येणेप्रमाणे चतुसिमापुर्वक वर्णनाची मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह

ब) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे बार्शी येथील जमीन गट नं. ७७४ यापैकी क्षेत्र हे ००-०४.६५ आर, आकार रु. ००-०० पैसे, यासी चतुसिमा पुर्वेस- सदर गट नंबर पैकी उर्वरीत जमिन, दक्षिणेस- सदर गटापैकी उर्वरीत जमिन, पश्चिमेस- गाडीरस्ता, उत्तरेस- बार्शी कुर्डूवाडी रस्ता, येणेप्रमाणे चतुसिमापुर्वक वर्णनाची मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह

क) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे बार्शी येथील जमीन गट नं. ७९८ यापैकी क्षेत्र हे ०-०३.८१ आर, आकार रु. ००-०३ पैसे, यासी चतुसिमा पुर्वेस- कुर्डूवाडी रस्ता, दक्षिणेस- ३० फुटी रस्ता, पश्चिमेस- उर्वरीत गट नंबर पैकी जागा, उत्तरेस- उर्वरीत गट नंबर पैकी जागा, येणेप्रमाणे चतुसिमापुर्वक वर्णनाची मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह

वर कलम अ, ब, क मध्ये वर्णन केलेल्या मिळकती ह्या आमचे पक्षकार वैजीनाथ किसन जाधव यांनी त्यांच्या स्वकष्टांर्जित कमाई मधून सदर मिळकती खरेदी केलेल्या आहेत. तसेच सदर मिळकती ह्या यातील त्यांनी त्यांचे लहान भाऊ यांचे प्रेमाखातर नवनाथ किसन जाधव, जगन्नाथ किसन जाधव यांचे नावावर खरेदी केलेली आहेत. त्यामुळे यातील नवनाथ किसन जाधव व जगन्नाथ हे त्यांची सदर मिळकतींच्या ७/१२ हक्कपत्री नाम असलेल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकतीची बेकायदेशीरपणे विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात आहेत. अशी आमचे पक्षकारास माहिती मिळालेली आहे. सदर मिळकतीची विक्री केल्यास आमचे पक्षकाराचे अतोनात नुकसान होणार आहे व त्यांचे हक्क हिस्सावर गदा येणार आहे त्यामुळे सदर मिळकतीची विक्री वा हस्तांतर करण्यास आमचे पक्षकाराची हरकत आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

तरी सदर मिळतीबाबत नवनाथ किसन जाधव, जगन्नाथ किसन जाधव यांचेशी कोणीही गहाण, दान, लिज, लिन, कुळ, भाडेपट्टा, साठेखत, खरेदीखत, फेडपत्र, बँकलोन, वाटप, करार, मदार या अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा हस्तांतराचा व्यवहार करु नयेत, याउपर केल्यास संबंधीत हस्तांतरीत व्यक्ती मालमत्ता हस्तांतरण कायद्यानुसार प्रामाणीक खरेदीदार असणार नाही तथा संबंधितावर सदर बेकायदेशीर व्यवहाराबाबत आमचे पक्षकार दिवाणी व फौजदारी कारवाई करतील, कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. दि. १६/०७/२०२६

**सही/-**
**अशिल वैजीनाथ किसन जाधव तर्फे**
**अँड. गणेश किसन हांडे**
**ऑफीस पत्ता-** हांडे गल्ली, कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ७७७५०३७८८६

## जाहीर प्रगटन
### परंडा येथील जिल्हा न्यायाधिश-१ यांचे न्यायालयात

निशानी नं. १५
कि.दि.अर्ज क्र. ४/२०२६
संतोष वि. शासन

**अर्जदार -** १. संतोष श्रावण माने, वय ३४ वर्षे धंदा शेती रा.कौडगांव ता.परंडा
२. संगीता श्रावण माने, वय ६० वर्षे धंदा शेती रा.कौडगांव ता.परंडा

**वि.**

महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी साहेब, उस्मानाबाद

**प्रगटन -** मौ. कौडगांव ता.परंडा येथील जमीन भूमापन क्रमांक ६४/२/अ पैकी पैकी सामाईक क्षेत्र ०हे.९७ आर आकार १रु ४६ पैसे ही जमीन विक्री करण्यास परवानगी मिळणेबाबत...
**गार्डीयन अन्ड वार्डस अक्टप्रमाणे...**

उपरोक्त विषयी याद्वारे जाहीर प्रगटन देण्यात येते की, अर्जदार नं.१ चा मुलगा व अर्जदार नं.२ चा अज्ञान नातु नामे शुभम संतोष माने वय १७ वर्षे धंदा शिक्षण व अर्जदार नं.१ ची मुलगी व अर्जदार नं.२ ची अज्ञान नात नामे दिया संतोष माने, व १५ वर्षे धंदा शिक्षण दोघे रा. कौडगांव ता.परंडा येथील जमिन भूमापन क्रमांक ६४/२/अ पैकी पैकी सामाईक क्षेत्र ०हे.९७ आर आकार १रु ४६ पैसे असून सदर जमिनीच्या चतुर्सिमा पुर्वेस कुशाबाई संतोष माने यांची जमीन, पश्चिमेस फुलचंद मुरलीधर माने यांची जमीन, दक्षिणेस कोळेकर यांची जमीन, उत्तरेस माधव निवृत्ती ठवरे यांची जमीन असून अर्जदार नं.१ संतोष श्रावण माने अर्जदार नं.२ संगीता श्रावण माने श्रावण श्रीहरी माने व फुलचंद मुरलीधर माने (परचेसर) यांच्यामध्ये तडजोड होवून अज्ञान शुभम व दिया यांच्या वतीने अपाक होवून अर्जदार नं.२ संगीता श्रावण माने यांनी कोर्टाचे परवानगी तडजोड केली असून सदर तडजोडीनुसार ही जमीन मिळकत अज्ञान शुभम संतोष माने व अज्ञान दिया संतोष माने यांच्या वडीलांजीत इस्टेटीतुन कोर्ट तडजोडीनुसार वाटुन आलेली मिळकत असून त्यावर अज्ञानाची कब्जेवहिवाट चालु आहे. सदरील जमीन ही हलकी व माळरानाची आहे शिवाय अज्ञानाच्या शैक्षणिक खर्चासाठी अर्जदारांना रकमेची गरज आहे आणि अर्जदार हे सदरील अज्ञानाच्या नावे असणारी मौ.कौडगांव येथील जमीन ६४/२/अ पैकी पैकी सामाईक क्षेत्र ०हे.९७ आर आकार १रु ४६ पैसे विक्री करून मौ.तांदुळवाडी ता.बारामती जि.पुणे येथील नगर पालिकेच्या वाढीव हद्दीतील जागा जमीन गट नं.१२७/१५/१ चे क्षेत्र २ हे ६७.५० आर + पो.ख. ०० हे ०७.५० आर घेवू इच्छीत आहे. कौडगांव येथील जमीन बाबत श्री कालीदास बाबा ठवरे रा.कौडगांव ता.परंडा यांना रक्कम रु.८००००० अक्षरी आठ लाख रुपये फक्त विक्री करण्याचा ठराव केला असून पैकी रु ४५०००० हे अर्जदार नं २ च्या बँक खात्यात जमा केले आहेत व उर्वरीत रक्कम रु ३५०००० ही खरेदीखतावर घेण्याचे ठरलेले आहे.

सदरचा अर्ज हा अज्ञान अर्जदार यांच्या हितासाठी व फायद्यासाठी केलेला आहे. तरी दिया संतोष माने व शुभम संतोष माने यांच्या मालकीची उपरोक्त नमुद जमिन विक्री बाबत जर कोणास या विक्री बाबत हरकत असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः अथवा वकिलामार्फत किंवा प्राधिकृत (विधीद्वारे) केलेल्या व्यक्तीमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. नसता कोणाचीही हरकत नाही असे समजून कायद्याप्रमाणे पुढील योग्य तो आदेश केला जाईल. सदर प्रकरण दिनांक २०.८.२०२६ हि तारीख नेमण्यात आली आहे.

आज दि. १६/०७/२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सही/-**
**(ए.एम.मोमीन)**
**क.लिपीक**
**जिल्हा न्यायालय - १ परंडा**

**सही/-**
**(एस.बी.दळवे)**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय - १ परंडा**



# मेस्सीचा अर्जेंटिना संघ अंतिम फेरीत

## अखेरच्या क्षणी इंग्लंडचा स्वप्नभंग • रविवारी अंतिम गाठ स्पेनशी

**अटलांटा, १६ जुलै**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत नाट्यमय उपांत्य सामन्यात गतविजेत्या अर्जेंटिनाच्या अखेरच्या क्षणी केलेल्या दोन गोलांनी इंग्लंडच्या चाहत्यांची मने तोडली. एका गोलने पिछाडीवर राहिल्यानंतर अर्जेंटिनाने इंग्लंडवर २-१ असा विजय नोंदवून स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. अता रविवारी अर्जेंटिना संघ आपले विश्वविजेतेपद कायम राखण्यासाठी रविवारी स्पेनविरुद्ध अंतिम सामना खेळेल.



पूर्वार्धातील खेळ अतिशय संघर्षपूर्ण राहिला, पण कोणालाही गोल करण्यात यश मिळाले नाही. मध्यंतरापर्यंतचा उत्कंठावर्धक खेळ गोलशून्यने बरोबरीत राहिला. मध्यंतरानंतर लगेचच ५५ व्या मिनिटाला अँथनी गॉर्डनने इंग्लंडला आघाडी मिळवून दिली व १९६६ नंतर प्रथमच विश्वचषक अंतिम सामन्यात पोहोचण्याचे संकेत मिळत होते.

अर्जेंटिनाचे आव्हान अजून संपले नव्हते. या सामन्यादरम्यान अर्जेंटिनाला हरवणे शक्य आहे अशी भावना निर्माण झाली होती, तरीही कोणीही त्यांना हरवू शकले नाही. सामन्याच्या अंतिम टप्प्यात अर्जेंटिनाने विश्वविजेपदाला साजेसा जिद्दीने खेळाचे प्रदर्शन केले व त्याच जिद्दीच्या जोरावर जबरदस्त लढा देत अविस्मरणीय पुनरागमन केले. सामन्याच्या ८५ व्या मिनिटाला एन्झो फर्नांडिसने गोल करून अर्जेंटिनाला बरोबरी मिळवून दिली, तर सामन्याच्या ९२ व्या मिनिटाला लॉटारो मार्टिनेझने गोल करून अर्जेंटिनाला जुना प्रतिस्पर्धी असलेल्या इंग्लंडविरुद्धचा विजय सुनिश्चित केला.



अटलांटा येथे इंग्लंडविरुद्धच्या फुटबॉल विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यादरम्यान दुसरा गोल करताना अर्जेंटिनाचा लोटारो मार्टिनेझ (२२)

अर्जेंटिनाने सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात वर्चस्व गाजवले. या विजयामुळे अर्जेंटिनाचा संघ आनंदी झाला, मात्र इंग्लंडच्या वाट्याला निराशा आली.

लिओनेल मेस्सीच्या माध्यमातून अर्जेंटिनाने शॉर्ट कॉर्नर मिळविल्यानंतर एन्झो फर्नांडेझने जोरदार फटका मारून गोल केला आणि इंग्लंडला अतिरिक्त वेळेत प्रवेश करण्यापूर्वीच मोठा धक्का बसला. जेव्हा ॲलेक्सिस मॅक ॲलिस्टरने मारलेला खालच्या दिशेचा फटका पोस्टला लागला, तेव्हा त्यांना वाटले की ते बचावले. त्याने दुसऱ्यांदा गोलपोस्टला चेंडू मारला होता. पण मेस्सीने उजव्या बाजूने तोच डाव पुन्हा सुरू केला, चेंडूला चकवून खोलवर क्रॉस दिला. लॉटारो मार्टिनेझवर कोणीही लक्ष ठेवून नव्हते आणि जेव्हा अर्जेंटिनाच्या या बदली खेळाडूने हेडरद्वारे गोल केला. ◂ (वृत्तसंस्था)

# कोहली, अय्यरची अर्धशतके

## भारत ४४ षटकांत सर्वबाद २३३

**कार्डिफ, १६ जुलै**

अनुभवी विराट कोहली (६५) व श्रेयस अय्यरच्या (६६) दमदार फलंदाजीच्या बळावर भारताने इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात प्रथम फलंदाजी करीत ४४ षटकांत सर्वबाद २३३ धावा उभारल्या आणि यजमान इंग्लंड संघासमोर विजयासाठी २३४ धावांचे लक्ष्य ठेवले.

इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुकने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. रोहित शर्मा व कर्णधार शुभमन गिलने ४४ धावांची सलामी भागीदारी करीत भारताच्या डावाची चांगली सुरुवात केली. गस अटकिन्सनने डकेटकडून गिलला झेलबाद केले. गिलने ३० चेंडूंत ६ चौकारांसह ३१ धावांची भर घातली. पुढे रोहित व विराट कोहली या अनुभवी फलंदाजांनी इंग्लंडच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत भारताची धावसंख्या वाढविली. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी ६० धावांची भागीदारी केली आणि संघाला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला. विल जॅक्सच्या फिरकीला बळी पडण्यापूर्वी रोहितने ४७ चेंडूंत २६ धावा केल्या. वेगवान डावखुरा गोलंदाज सॅम करनने आपल्या गोलंदाजीत ईशान किशनला (१) झेलबाद केले. पुढे विराट कोहली व श्रेयर अय्यर ही जोडी खेळपट्टीवर चांगलीच जमली, या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ६७ धावांची भागीदारी करून संघाला दोनशे धावांच्या दिशेने नेले. मात्र याचवेळी कोहली जोफ्रा आर्चरच्या वेगवान माऱ्याला बळी पडला. कोहलीने ६६ चेंडूंत ८ चौकारांसह ६५ धावांची खेळी केली. त्यावेळी भारताची स्थिती ३१.४ षटकांत ४ बाद १७८ धावा अशी होती. त्यानंतर श्रेयर अय्यरने एक टोक उत्तमपणे सांभाळले, परंतु दुसऱ्या टोकावरून भारताची घसरगुंडी झाली. वॉशिंग्टन सुंदर (२), अक्षर पटेल (१), शिवम दुबे (०) व गुरनूर ब्रार (७) नियमित अंतराने बाद होत गेले. भारताने ४० षटकांत ८ बाद २१० धावांपर्यंत मजल मारली. श्रेयस अय्यरची फटकेबाजी सुरूच होती, मात्र त्याला तळाच्या फळीतील फलंदाजांची पुरेशी साथ मिळाली नाही, मात्र याचदरम्यान श्रेयसही गस ॲटकिन्सनच्या गोलंदाजीत बटलरकडून झेलबाद झाला. भारताचा डाव ४४ षटकांत २३३ धावांवर आटोपला. श्रेयस अय्यरने ७१ चेंडूंचा सामना करत ५ चौकार व २ षटकारांच्या मदतीने ६६ धावांचे योगदान दिले.

◂ (वृत्तसंस्था)



विराट कोहली (६५)



श्रेयर अय्यर (६६)



## राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत सोलापूरचे तिकीट लिपिक ओम अवस्थी 'कांस्य'चे मानकरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

चेन्नई येथे झालेल्या ७९व्या वरिष्ठ राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत ३-मीटर स्प्रिंगबोर्ड सिंक्रोनाइज्ड डायव्हिंग प्रकारात येथील वरिष्ठ मुख्य वाणिज्यिक तिकीट लिपिक ओम अवस्थी यांनी कांस्य पदक संपादिले.

त्यांना रेल्वेचे प्रशिक्षक हरीष अन्नलदास यांचे मार्गदर्शन लाभले. सोलापूरचे मंडल रेल प्रबंधक यांनी अवस्थी यांचे अभिनंदन केले आणि आपल्या क्रीडा नैपुण्याद्वारे रेल्वेची प्रतिष्ठा वाढवण्याच्या त्यांच्या निष्ठेचे कौतुक केले.

रेल्वेने आपल्या कर्मचाऱ्यांना व्यावसायिक जबाबदाऱ्यांसोबतच क्रीडा क्षेत्रातही उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. ओम अवस्थी यांचे यश हे संस्थेमध्ये जोपासल्या जाणाऱ्या दृढनिश्चय आणि उत्कृष्टतेच्या भावनेचे उत्तम उदाहरण आहे आणि ते इतर रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य मिळवण्याच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रेरणादायी ठरते.

# राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत सोलापूरच्या जलतरणपटूंची पाच पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

वरिष्ठ गटाच्या ७९ व्या राष्ट्रीय जलतरण अजिंक्यपद स्पर्धेतील डायव्हिंग प्रकारात येथील डायव्हर्सनी एक सुवर्ण, तीन रौप्य व एक कास्य अशी पाच पदकांची कमाई केली.

चेन्नई येथील डॉ. टी. के. पारिवेदार ॲक्वाटिक कॉम्प्लेक्स, एसआरएम आयएसटी, कट्टनकुलाथुर येथे या स्पर्धा पार पडल्या. यामध्ये सोलापूरच्या श्रावणी सूर्यवंशी, श्रीगणेश उडता, संकेत लिगाडे आणि मनस्वी माने यांनी ही कामगिरी केली.

या राष्ट्रीय स्पर्धेत श्रावणी सूर्यवंशी हिने ३ मीटर स्प्रिंगबोर्ड डायव्हिंग प्रकारात सुवर्णपदक आणि हायबोर्ड डायव्हिंग प्रकारात रौप्यपदकाची कमाई केली. श्रीगणेश उडता याने हायबोर्ड सिंक्रोनाईज्ड डायव्हिंग प्रकारात रौप्यपदक पटकावले, तर संकेत लिगाडे याने हायबोर्ड डायव्हिंग प्रकारात कांस्यपदक मिळवले. या स्पर्धेत अवघ्या १४ वर्षांची मनस्वी माने हिने सर्वांत लहान वयाची स्पर्धक असूनही अत्यंत आत्मविश्वासाने आणि जिद्दीने खेळ केला. तिने ३ मीटर स्प्रिंगबोर्ड प्रकारात उत्कृष्ट कौशल्याचा ठसा उमटवत रौप्यपदक पदरात पाडून घेतले. तिच्या या कौतुकास्पद कामगिरीचे सर्व स्तरांतून विशेष कौतुक होत आहे.

या सर्व विजेत्या खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शक मनीष भावसार आणि श्रीकांत शेटे यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या या दैदीप्यमान यशाबद्दल सोलापूर जिल्हा जलतरण संघटनेचे अध्यक्ष सुदेश देशमुख, सचिव संतोष कोल्हापुरे व संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी खेळाडूंसह दोन्ही प्रशिक्षकांचे अभिनंदन केले. या खेळाडूंना सोलापूर महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी नझीर शेख यांचे सहकार्य लाभले.



# खेळाडूंच्या क्रीडा गुणांसाठी संघटना मैदानात

### राज्यभर थाळी वाजवा आंदोलन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**कल्याण, दि. १६ जुलै-**

शासनाच्या शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर समाविष्ट केलेल्या ४४ क्रीडा प्रकारांमधील खेळाडूंना क्रीडा गुण देण्यास शासन टाळाटाळ करत असल्याचा आरोप क्रीडा संघटनांनी केला आहे. या प्रलंबित निर्णयामुळे राज्यातील लाखो खेळाडूंचे शैक्षणिक व क्रीडा भवितव्य टांगणीला लागले आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील ४४ क्रीडा संघटनांनी एकत्र येत क्रीडा अधिकारी कार्यालयांसमोर थाळी वाजवा आंदोलन करण्याची घोषणा केली आहे.

शालेय खेळ-क्रीडा संस्था, महाराष्ट्र राज्य या संघटनेने याबाबत अत्यंत आक्रमक पाऊल उचलले असून, येत्या १० दिवसांत सकारात्मक निर्णय न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन आणि त्यानंतर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भातील मागण्यांचे निवेदन संघटनेचे अध्यक्ष शाम भोसले यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री व क्रीडामंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांना सादर केले आहे.

**१३ वर्षांपासून प्रश्न प्रलंबित**

सन २०१३ मध्ये तत्कालीन क्रीडामंत्री पद्माकर



वळवी आणि क्रीडा आयुक्तांच्या मान्यतेने ४४ क्रीडा प्रकारांना शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये विनाअनुदान व विनागुणांकन प्रायोगिक तत्त्वावर स्थान देण्यात आले होते.

भविष्यात या खेळाडूंना क्रीडा गुणांकन व इतर सवलती देण्याचे आश्वासनही देण्यात आले होते. त्यानुसार गेल्या १३ वर्षांपासून सर्व क्रीडा संघटना शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत न घेता, जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांचे यशस्वी आयोजन करत आहेत. मात्र, अद्यापही या खेळाडूंना गुणांचा लाभ मिळालेला नाही.

**आदेशानंतरही अंमलबजावणी शून्य!**

या ४४ क्रीडा प्रकारांमधील खेळाडूंना गुण व सवलती मिळाव्यात म्हणून उपमुख्यमंत्री (स्व.) अजितदादा पवार, माजी क्रीडामंत्री सुनील केदार, संजय बनसोडे, दत्तामामा भरणे, तसेच विद्यमान शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांनीही वेळोवेळी शिफारस केली आहे. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबईतील मंत्रालयात तत्कालीन क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्या उपस्थितीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत अधिकाऱ्यांना गुणांकन देण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, त्यावर अद्याप कोणतीही ठोस अंमलबजावणी झालेली नाही. या प्रलंबित निर्णयामुळे महाराष्ट्रातील तब्बल ४ लाख खेळाडू, प्रशिक्षक आणि पालकांमध्ये तीव्र संताप आहे.

पुढील १० दिवसांत निर्णय न झाल्यास राज्यातील सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये आणि शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी (पुणे) येथील मुख्य कार्यालयासमोर खेळाडू व पालकांसह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेचे अध्यक्ष शाम भोसले व सचिव शिवाजी साळुंखे यांनी दिला आहे.

**न्याय मिळेपर्यंत माघार घेणार नाही**

गेली अनेक वर्षे आम्ही राज्यातील लाखो खेळाडूंना क्रीडा गुण मिळावेत म्हणून पाठपुरावा करत आहोत. मात्र, शासन याकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहे. क्रीडामंत्री, उपमुख्यमंत्री आणि क्रीडा अधिकाऱ्यांना निवेदने देऊन चर्चा झाली, तरीही ठोस निर्णय झालेला नाही, हे दुर्दैवी आहे. यावर्षी खेळाडूंना गुण मिळाले नाहीत, तर संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल. न्याय मिळेपर्यंत आम्ही माघार घेणार नाही.''

**-शाम भोसले,**
अध्यक्ष, शालेय खेळ आणि क्रीडा संस्था, महाराष्ट्र राज्य

**खेळाडूंवरील अन्याय दूर करावा**

राज्य शासनाने शालेय स्पर्धांमध्ये नवीन खेळांचा समावेश करून क्रीडा संस्कृतीला नक्कीच चालना दिली आहे. परंतु, या खेळाडूंना क्रीडा गुण, सवलती आणि आवश्यक सुविधा मिळाल्या तरच खेळाडू खऱ्या अर्थाने प्रवाहात टिकून राहतील. शासनाने राज्यातील या ४४ क्रीडा संघटनांच्या शालेय गुणांचा प्रश्न तातडीने सोडून खेळाडूंवरील अन्याय दूर करावा.''

**-तुकाराम ठोंबरे,**
अध्यक्ष, म्युझिकल चेअर स्केटिंग असोसिएशन.

## भारतीय शुडोकान कराटेच्या उपाध्यक्षपदी सोलापूरचे भीमराव बाळगे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै -**



जागतिक कराटे महासंघाशी संलग्न असलेल्या जपान कराटे-डो शुडोकान आंतरराष्ट्रीय मुख्यालय (जपान) मान्यताप्राप्त भारतीय शुडोकान कराटेच्या उपाध्यक्षपदी महाराष्ट्राचे प्रमुख भीमराव बाळगे यांची निवड करण्यात आली.

भारतीय शुडोकान कराटेचे प्रमुख मजहर खान (दिल्ली) यांनी या निवडीची घोषणा केली आहे. बाळगे हे गेल्या ३५ वर्षांपासून सोलापूर शहर, जिल्हा आणि महाराष्ट्राच्या विविध भागांत कराटे, किकबॉक्सिंग, सिकई, बुडो मार्शल आर्ट, युनिफाईट आणि बॉक्सिंग या क्रीडा प्रकारांचे मुला-मुलींना दर्जेदार प्रशिक्षण देत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक खेळाडूंनी जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदकांसह प्राविण्य मिळविले आहे. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे सोलापुरात यशस्वी आयोजनही करण्यात आले आहे. क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या याच बहुमूल्य योगदानाची दखल घेऊन राष्ट्रीय पातळीवरील या प्रतिष्ठेच्या पदावर त्यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल सोलापूर जिल्हा ॲमेचुअर स्पोर्ट्स कराटे असोसिएशनचे अध्यक्ष महादेव चाकोते, आमदार सचिन कल्याणशेट्टी, डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, राज्य किकबॉक्सिंग उपाध्यक्ष मनीष सुरवसे, उद्योजक मुकुंदराव जाधव, मनपा क्रीडा अधिकारी नजीर शेख, माजी क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, सुधीर लांडे, सागर कत्ते, सुरेश माळगे, अनुजा कुलकर्णी, शिवकुमार पाटील, सुरेश पवार, रमेश बसाटे, गुरुराज कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पालकमंत्र्यांच्या नावाने धमकी देणाऱ्यांवर गुन्हा

### पालकमंत्र्यांच्या नावाचा गैरवापर करून ठेका मिळविण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १६ जुलै -**

महावितरणच्या कामाचा ठेका मिळवून देण्यासाठी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नावाचा आणि आवाजाचा कथित गैरवापर करुन कार्यकारी अभियंत्यावर दबाव टाकल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात शिरीष ताटे (रा. बार्शी) व त्याच्या अज्ञात साथीदाराविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

याबाबत महावितरणचे कार्यकारी अभियंता राकेश ज्ञानदेव मगर (वय ४३, रा. अलीपूर रोड, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यांच्या अखत्यारित बार्शी, माढा व करमाळा तालुक्यांतील वीजपुरवठा, दुरुस्तीची कामे तसेच एक लाख रुपयांपर्यंतच्या कामांचे कोटेशन पद्धतीने वाटप करण्याची जबाबदारी आहे. फिर्यादीनुसार, २३ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजता त्यांच्या मोबाईलवर एका क्रमांकावरुन फोन आला. संबंधित व्यक्तीने स्वत:चे नाव नवनाथ वळसे असल्याचे सांगून, ''पालकमंत्री महोदय बोलणार आहेत,'' असे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या व्यक्तीने स्वत:ला ''मी जयकुमार गोरे बोलतोय'' अशी ओळख देत माढा उपविभागातील बाह्यस्त्रोताचे काम कोणाला दिले आहे, अशी विचारणा केली. संबंधित काम विद्यमान ठेकेदाराकडून काढून शिरीष ताटे यांना देण्याच्या सूचना दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

यानंतर सुमारे दोन तासांनी व्हॉट्सअॅप व्हॉइस कॉलद्वारे स्वतः ला शिरीष ताटे म्हणून ओळख देणाऱ्या व्यक्तीने संपर्क साधत, ''पालकमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे ते काम मला द्या, अशी मागणी केली. मात्र, पालकमंत्री अशा प्रकारे कोणत्याही शासकीय कामासाठी शिफारस करत नसल्याची खात्री असल्याने मगर यांनी संबंधित ठेक्यात कोणताही बदल केला नाही. त्यानंतरही शिरीष ताटे याच्याकडून वारंवार व्हॉट्सअॅप कॉल करुन, ''पालकमंत्र्यांनी सांगूनही काम दिले नाही तर तुमची पालकमंत्र्यांकडे तक्रार करचन नोकरी घालवीन,'' अशी धमकी देण्यात आली.

या प्रकाराबाबत संशय आल्याने राकेश मगर यांनी खातरजमा केली असता, शिरीष ताटे व त्याच्या अज्ञात साथीदाराने संगनमत करुन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नावाचा, पदाचा व आवाजाचा गैरवापर करत लोकसेवक असल्याची खोटी बतावणी केली. तसेच धमकी देऊन शासकीय काम स्वतःकडे वळवून आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाल्याचा दावा फिर्यादीत केला आहे. २३ जून ते २ जुलै २०२६ या कालावधीत घडलेल्या घटनांवरुन बार्शी शहर पोलीस ठाण्यात शिरीष ताटे व त्याच्या अज्ञात साथीदाराविरुद्ध विवि. कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात केला आहे.

# अंकोलीत ५० किलो हिरवा गांजा जप्त

### सुमारे साडे एकवीस लाखांचा माल; एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १६ जुलै -**

अंकोली (ता.मोहोळ) येथे पोलिसांनी भैरवनाथ भोसले याच्या वस्तीवर छापा टाकून तीन प्लॅस्टीकच्या पोत्यात ५० किलो गांजा (किंमत २० लाख १९ हजार २५० रुपये) जप्त केला.

ही कारवाई गुरुवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास केली. मोहोळ पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक शंकर पाटील यांना अंकोली येथील भैरवनाथ भोसले यांच्या वस्तीवर पत्रा शेडमध्ये गांजा ठेवल्याची गोपनीय बातमी मिळाली. त्यानंतर वरिष्ठांच्या परवानगीने पंच व पोलिस पथकासह छापा टाकला. भैरवनाथ नरहरी भोसले याच्या शेतातील गोठ्याजवळ असलेल्या पत्राशेडमध्ये विविध पाकिटात ४० किलो ३८५ ग्रॅम हिरवा गांजा सापडला. त्याची किंमत अंदाजे प्रति किलो ५० हजार प्रमाणे २० लाख १९ हजार २५० रुपये एवढी आहे. याप्रकरणी भैरवनाथ नरहरी भोसले (वय ५१ रा. अंकोली ता. मोहोळ) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. मोहोळ पोलिसांकडून तपास सुरु आहे.

## महत्वाचे...



### शेळकेवाडी जि.प.शाळेच्या यशाचा 'आपुलकी'कडून गौरव

**सांगोला,दि.१६ जुलै -**

सांगोला तालुक्यातील शिवणे अंतर्गत असलेल्या जि.प.प्रा. शाळा, शेळकेवाडीला केंद्र सरकारचा स्वच्छ विद्यालय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला यांच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक भागवत भाटेकर व शिक्षिका शीतल पोळ यांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रतिष्ठानच्या वतीने शाळेतील ७२ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. कार्यक्रमास आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सदस्य अमर कुलकर्णी, सुरेश चौगुले, प्रा.डॉ.राजेंद्र सूर्यवंशी, चंद्रशेखर कवडे, बाळकृष्ण चांडोले, दादा खडतरे, प्रा.बाळासाहेब वाघमारे, प्रा.नारायण विसापूरे, अरविंद डोंबे, हणमंत बोत्रे, उमेश महाजन उपस्थित होते.

### शेकापच्या राज्य सोशल मिडीया कोअर कमिटीवर सरतापे, बंडगर

**सांगोला, दि. १६ जुलै -**



शेतकरी कामगार पक्षाचे राज्याचे सरचिटणिस माजी आ.जयंत पाटील यांच्या आदेशानुसार व आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याच्या सोशल मिडीया प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी शेकापच्या राज्य सोशल मिडीया कोअर कमिटीवर सांगोला तालुका प्रसिध्दी प्रमुख चंद्रकांत सरतापे, प्रा.एन.डी बंडगर यांची निवड केली. निवडीचे पत्र सम्या कोरडे यांनी दिले. माजी आमदार गणपतराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रकांत सरतापे यांनी अनेक वर्ष काम केले आहे. निवडीबद्दल आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, डॉ.निकिता देशमुख, दादा बाबर, दिपक गोडसे, विजय राऊत यांनी दोघांचे अभिनंदन केले.

### संत गजानन महाराज पालखी मार्गावरील मद्यविक्री दुकाने तात्पुरती बंद

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

संत गजानन महाराज पालखीचे आगमन व मुक्कामाच्या ठिकाणी सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी संबंधित भागातील देशी-विदेशी मद्यविक्री व ताडी दुकाने तात्पुरती बंद ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत. आदेशानुसार, १७ जुलै रोजी उळे गावातील सर्व देशी-विदेशी मद्यविक्री दुकाने सायंकाळी ६.०० वाजल्यापासून पालखी प्रस्थान होईपर्यंत बंद राहतील. १८ जुलै रोजी सोलापूर शहरातील कुचन प्रशाला परिसरातील सर्व देशी-विदेशी मद्यविक्री व ताडी दुकाने सायंकाळी ६.०० वाजल्यापासून पालखी प्रस्थान होईपर्यंत बंद राहतील. १९ जुलै रोजी सातरस्ता जवळील उपलप मंगल कार्यालय परिसरातील सर्व देशी-विदेशी मद्यविक्री दुकाने संपूर्ण दिवस बंद राहतील. २० जुलै रोजी तिऱ्हे गावातील सर्व देशी-विदेशी मद्यविक्री दुकाने सायंकाळी ६.०० वाजल्यापासून पालखी प्रस्थान होईपर्यंत बंद राहतील. जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अनुज्ञप्तीधारकांनी आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यचे आदेश दिले असून उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाईचा इशारा दिला आहे.

### दहिगाव उपसा आवर्तन प्रकरणी शनिवारी पाटबंधारे, महावितरणची बैठक

**जेऊर दि.१६ जुलै -**

दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या पावसाळी आवर्तनाबाबत तसेच मतदार संघातील वीजेच्या समस्येबाबत आमदार नारायण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पाटबंधारे व महावितरणच्या अधिकाऱ्याची एक बैठक शनिवार दि. १८ जूलै रोजी दुपारी १२ वाजता जेऊर येथील आमदार कार्यालयात होत असल्याची माहिती आमदार नारायण पाटील गटाचे प्रवक्ते सूनील तळेकर यांनी दिली आहे. करमाळा तालुक्यातील पुर्व भागातील सिंचना साठी पावसाळ्यात ओव्हर फ्लोचे आवर्तन देण्यापूर्वी दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या यांत्रिक, इलेक्ट्रिक, स्थापत्य आदी विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या कामाची पुर्व तयारी आढावा घेण्यासाठी ही बैठक घेतली जाणार आहे. तसेच महावितरण विभागाच्या करमाळा व जेऊर विभागाचे अधिकारी तसेच सर्व शाखा अभियंता आणि वीजेची कामे करणारे ठेकेदार यांची एक बैठक याच दिवशी जेऊर येथे आमदार पाटील यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.. शनिवारी आमदार नारायण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आदिनाथ, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सर्व आजी माजी पदाधिकारी तसेच पाटील गटातील प्रमुख कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत दोन बैठका होणार आहेत.



# बोरगांव पालखी तळाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १६ जुलै-**

बोरगांव (ता. माळशिरस) येथे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळा मंगळवार दि. २१ जुलै रोजी मुक्कामी येत आहे. त्या पार्श्वभुमीवर पालखी तळावर प्रशासनाकडून केलेल्या सुविधांची पाहणी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केली. तसेच राहिलेल्या कामाबाबत सुचना दिल्या.

उपजिल्हाधिकारी शमा पवार, प्रशासनिक अधिकारी तसेच भाजप राज्य कार्यकारणी सदस्य राजकुमार पाटील, माजी पंचायत समिती उपसभापती प्रताप पाटील यावेळी उपस्थित होते. पालखी सोहळा महाळुंग, श्रीपूर, बोरगांव व माळखांबी या मार्गावरून मार्गस्थ होत आहे. रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली काटेरी झुडपे व डांबरी रस्त्यालगतच्या साईड पटट्याचे समतलीकरण केले आहे. पालखी तळावर हायमास्ट दिवे अंतर्गत रस्ते, स्वच्छतेचे काम जोरात सुरु आहे.

पालखी तळाची जागा वाढवून देण्याची मागणी राजकुमार पाटीत व प्रताप पाटील यांनी याप्रसंगी पालखी तळाची जागा वाढवून देण्याची मागणी केली. सध्याचा पालखी तळ १० एकराचा आहे. परंतू यात पालखीसाठी मोठा सभामंडप असतो, तसेच अन्य सुविधांमुळे याठिकाणी मोठ्या प्रम ाणावर दिंड्या व वारकरी मुक्कामासाठी हे ठिकाण पसंत करतात. शेती महामंडळाची अजून जागा शिल्लक असल्याने तळालगत असलेल्या १० एकर जागेतील काटेरी झाडे-झुडपे तोडून जागा स्वच्छ करून मिळावी, अशी विनंती केली. जिल्हाधिकाऱ्यांनी यास अनुकुलता दर्शवली.

# आमदार सोपल यांच्या बंगला परिसरात आग लावण्याचा प्रयत्न; आरोपींचा जामीन नामंजूर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १६ जुलै -**

माजी मंत्री तथा आमदार दिलीप सोपल यांच्या बंगला परिसरात स्फोटक जळते फटाके फेकून आग लावण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणातील अटक तीन आरोपींचा जामीन अर्ज बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश सुरज व्ही. केंद्रे यांनी गुरुवार दि. १६ जुलै रोजी फेटाळला.

प्रशांत उर्फ पेशा रणझुंजारे, निखिल उर्फ अंबादास भरत रणझुंजारे आणि नागेश बाळू म ोहिते अशी आरोपींची नावे आहेत. या प्रकरणात यापूर्वी न्यायिक दंडाधिकारी पी. व्ही. राऊत यांनी आरोपींना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. त्यानंतर आरोपींनी नियमित जामिनासाठी अतिरिक्त सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता.

सुनावणीदरम्यान आरोपींच्या वतीने अॅड. महेश जगताप यांनी बाजू मांडली. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अॅड. दिनेश देशमुख यांनी युक्तिवाद केला. फिर्यादीतर्फे अॅड. विकास जाधव



आणि अॅड. प्रशांत घोडके यांनी भूमिका मांडली. तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक बाळासाहेब जाधव यांनी तपासासंदर्भातील माहिती न्यायालयासमोर सादर केली.

न्यायालयाने उपलब्ध कागदपत्रे, तपासातील नोंदी आणि दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर केला. २३ जून २०२६ रोजी पहाटे फिर्यादीच्या घरावर जळते फटाके फेकून आग लावण्याचा प्रयत्न केला होता. घटनेत आंबा, जांभूळ आणि बांबूची झाडे तसेच सोलर पॅनेलचे मिळून सुमारे १.५० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

तसेच आरोपींनी जामीन अर्जात न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचेही म्हटले आहे. गुन्ह्याचे गांभीर्य, तपास अद्याप सुरू असणे, काही आरोपी अद्याप फरार असणे तसेच जामिनावर मुक्त झाल्यास आरोपींकडून साक्षीदारांवर दबाव टाकणे, पुराव्यांमध्ये छेडछाड करणे किंवा तपासात अडथळा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन न्यायालयाने तिन्ही आरोपींचा नियमित जामीन अर्ज फेटाळला.

# बेकायदा गावठी पिस्तुल, ५ काडतुसे बाळगली; तरुणास अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने एका बेकायदेशीरपणे गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या २० वर्षीय तरुणाला अटक करून एक देशी बनावटीचे गावठी पिस्तुल, ५ जिवंत काडतुसे आणि ५.५ लाखाची रक्कम असा एकूण ५ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी गुरुवारी सकाळी पत्रकार परिषदेत दिली. रोहित रघुनाथ अहिरे (वय २०, रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी, सोलापूर,मूळ रा. पंढरपूर अर्बन बँकेजवळ, पंढरपूर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख फौजदार अल्फाज शेख आणि पोलीस अंमलदार सुहास अर्जुन यांना गोपनीय माहिती मिळाली की, नितीन नगर येथील कोंडयाल शाळेच्या पाठीमागे एक इसम निळसर रंगाच्या स्पोर्ट्स बॅगमध्ये गावठी पिस्तूल घेऊन येणार आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी.एस. बिराजदार व पोलिस निरीक्षक संगीता पाटील यांना तात्काळ याची माहिती देऊन पथकाने पंचांसह रात्रीच्या सुमारास बंद फरसाण कारखान्याजवळ सापळा रचून रोहित अहिरे याला ताब्यात घेतले. त्याच्या बॅगची झडती घेतली असता सदर मुद्देम ाल मिळून आला. शस्त्र बाळगण्याबाबत त्याच्याकडे कोणताही परवाना नव्हता.

पोलीस तपासात निष्पन्न झाले की, हा मुद्देमाल त्याचा मित्र प्रदीप हुसेनी गायकवाड (रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी नं.६) याने १० दिवसांपूर्वी त्याच्याकडे ठेवण्यास दिला होता. प्रदीपच्या वडिलांना (हुसेनी शिवाजी गायकवाड) कर्नाटक पोलिसांनी घरफोडीच्या गुन्ह्यात अटक केली आहे. पोलीस घरी झडती घेण्यासाठी येण्याच्या भीतीने प्रदीपने ही रोकड आणि शस्त्र रोहितकडे लपवण्यासाठी दिले होते. याप्रकरणी रोहित अहिरे व प्रदीप गायकवाड यांच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखवलं करण्यात आला आहे. आरोपी रोहितला अटक करण्यात आली असून फरार प्रदीपचा शोध सुरू आहे. आरोपी रोहितवर शहरात शरीराविषयी दोन गंभीर गुन्हे दाखल आहेत, तर प्रदीपच्या वडिलांवर महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेश राज्यांत गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलीस आयुक्तांनी यावेळी बोलताना दिली.



# जिल्हाधिकाऱ्यांकडून भंडीशेगाव येथील पालखी मार्ग, तळांची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ जुलै -**

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज भंडीशेगाव येथील पालखी मार्ग, पालखी तळांची पाहणी केली. वारकऱ्यांना कोणत्याही अडचणी येवू नयेत, याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या.

आषाढी यात्रा पालखी सोहळा निर्विघ्न पार पाडावा यासाठी शासनाकडून वारकऱ्यांच्या सोयी व पालखी तळांच्या विकासासाठी मुबलक निधी दिला आहे. त्याचा योग्य वापर करुन ा पालखी तळावर पायाभूत सुविधांसह अधिक सोयी द्याव्यात. भंडीशेगाव येथे सोपान काका पालखी तळाच्या विकासासाठी ५४ लाख रुपये निधी दिला आहे. जलसंपदा विभागाच्या वापरात नसलेल्या इमारती पाडून सपाटीकरण व मुरमीकरण करत आहेत. पालखी कट्ट्याचे काम, हायमास्ट दिवे आदी कामे प्रगतीपथावर आहेत. ती कामे दर्जेदार करुन, पालखी सोहळा दाखल होण्याआधीच पुर्ण करा. पालखी तळाच्या कट्ट्याशेजारील जुनी इमारत पाडावी. वाखरी पुलाशेजारी मुरमीकरण करून उतार करावा, वाखरी पालखी शेजारी तात्पुरते ड्रेनेज करून घ्यावे, आदी सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

शहरातील सरगम चौक वाखरी पूल-वाखरी पालखी तळ, भंडीशेगाव येथील सोपान काका महाराज पालखीतळ, ज्ञानेश्वर महाराज पालखी तळ, गुरसाळे, करकंब येथील पालखी तळ व मुक्काम ाच्या ठिकाणाची पाहणी केली. याप्रसंगी प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी उपस्थित होते.

# एसएनएफ व फॅटच्या वादामुळे दूध उत्पादक अडचणीत

### शासनाने तातडीने स्पष्ट धोरण जाहीर करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१६ जुलै -**

करमाळा तालुक्यातील केम पंचक्रोशीतील दूध उत्पादक शेतकरी, दूध डेअरी संचालक व संकलन केंद्र चालक यांच्या संयुक्त बैठकीत दुधातील एसएनएफ आणि फॅट या निकषांबाबत निर्माण झालेल्या संभ्रमाविषयी तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. शासनाने याबाबत स्पष्ट धोरण व अधिकृत परिपत्रक तातडीने जारी करून दूध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली.

सध्या अनेक दूध संकलन केंद्रांवर दुधाची प्रत तपासताना एसएनएफ कमी असल्याचे सांगत दूध उत्पादकांना



कमी दर मिळतो. काही ठिकाणी दूध स्वीकारलेही जात नाही. एसएनएफचे निकष, तपासणीची प्रमाणित पद्धत आणि त्यासंदर्भातील शासनाचे स्पष्ट परिपत्रक उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठा संभ्रम आहे. त्याचा आर्थिक फटका त्यांना बसत आहे.

बैठकीत दुध उत्पादकांनी दुधातील भेसळीचे समर्थन करत नाही. भेसळमुक्त दूध हा ग्राहकांचा हक्क असून त्यासाठी कठोर कारवाई व्हावी. मात्र, एसएनएफच्या नावाखाली प्रामाणिक दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये. शासनाने स्पष्ट नियमावली जाहीर करून सर्व दूध संघ व संकलन केंद्रांसाठी समान निकष लागू करावेत, असे सांगितले. दूध संकलन केंद्र चालकांनीही दूध संघाकडून कमी एसएनएफचे कारण देऊन दूध नाकारले किंवा कमी दर देत असल्याने त्याचा आर्थिक भार संकलन केंद्रांवर येतो, असे सांगितले. यावेळी दूध डेअरी मालक अरुण लोंढे, कालिदास तळेकर, प्रहार संघटना करमाळा तालुकाध्यक्ष संदीप तळेकर, दूध उत्पादक शेतकरी सतीश खानट, चंद्रकांत बीचीतकर, सतीश देवकर, दत्ता चव्हाण, सुनील तळेकर, सुनील चव्हाण, सोमनाथ तळेकर, माधव गुटाळ, निलेश गुटाळ, अक्षय पाटील, अरुण डोंगरे, बापू पळसकर, गलांडे तळेकर आदी उपस्थित होते

**बैठकीतील प्रमुख मागण्या**

- राज्यभर सर्व दूध संघांसाठी समान निकष लागू करावेत.
- नैसर्गिक कारणांमुळे होणाऱ्या एसएनएफमधील बदलांचा वैज्ञानिक अभ्यास करून धोरण निश्चित करावे.
- भेसळ प्रकरणी कारवाईने प्रामाणिक दूध उत्पादकांवर अन्याय होणार नाही याची हमी द्यावी.
- दूध उत्पादक, संकलन केंद्र चालक व दूध संघ यांच्यात समन्वय साधून कायमस्वरूपी तोडगा काढावा.

## निधन वृत्त...

### धानम्मा नंदर्गी



**सोलापूर, दि. १६ जुलै-**

७० फूट रोड, इंदिरानगर येथील रहिवासी धानम्मा रमेश नंदर्गी (वय-४५) यांचे दि. १६ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले असा परिवार आहे. विजयकुमार नंदर्गी यांच्या त्या वहिनी होत.

### राजू जक्कन



**सोलापूर, दि. १६ जुलै-**

पूर्वभागातील दाजी पेठ येथील श्री व्यंकटेश्वर देवस्थानम्चे विश्वस्त राजू भगवानराव जक्कन (वय-५३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, चार बहिणी, दोन मुले असा परिवार आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### स्व.अजितदादा पवार यांची जयंती अधिकृतपणे साजरी होणार



**मुंबई दि.१५ जुलै -**

राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्याचे नेते स्व. अजित अनंतराव पवार (दादा) यांच्या जयंतीचा समावेश सन २०२६ मधील राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत जयंती कार्यक्रमांमध्ये केला आहे. सामान्य प्रशासन विभागाने १५ जुलै, २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी केले असून, यामुळे दादांच्या लोकसेवेचा आणि महाराष्ट्राच्या विकासातील त्यांच्या योगदानाचा राज्य शासनाकडून गौरव करण्यात आला आहे.

**शासकीय कार्यक्रमांच्या यादीत समावेश**

२२ जुलै रोजी राज्यभर होणार भरगच्च कार्यक्रम परिपत्रकात दिलेल्या माहितीनुसार, स्व. अजित अनंतराव पवार यांची जयंती २२ जुलै, २०२६ (बुधवार) रोजी राज्यभरात साजरी केली जाणार आहे. या दिवशी मंत्रालयासह राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले जाईल. सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्येही होणार आयोजन हा आदेश केवळ मंत्रालयापुरता मर्यादित नसून, राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांसह सर्व शाळा व महाविद्यालयांनाही लागू करण्यात आला आहे. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना आपापल्या भागातील सर्व यंत्रणांमध्ये या कार्यक्रमाचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. योगदानाचा आणि लोकसेवेचा सन्मान स्व. अजित दादांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत प्रशासनावर ठेवलेली मजबूत पकड, पायाभूत सुविधांचा विकास आणि लोककल्याणकारी योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी घेतलेले परिश्रम यांमुळे त्यांना जनमानसात हक्काचे 'दादा' म्हणून स्थान मिळाले. शासनाचा हा निर्णय म्हणजे त्यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी दिलेल्या अभूतपूर्व योगदानाला आणि त्यांच्या अविरत कार्यपद्धतीला दिलेली ही एक मोठी आदरांजली मानली जात आहे.यामुळे आता दरवर्षी २२ जुलै रोजी शासकीय स्तरावर दादांच्या लोकसेवेचा वारसा अधिकृतपणे आठवला जाईल.

### शेत-पाणंद रस्ते योजना समितीच्या सहअध्यक्षपदी अजिंक्यराणा पाटील



**मोहोळ, दि. १६ जुलै-**

मुख्यमंत्री बळीराजा शेत -पाणंद रस्ते योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी स्थानिकांचा अधिक सहभाग असावा म्हणून निर्माण केलेल्या विधानसभा समितीच्या सह अध्यक्षपदी भाजपाचे युवानेते अजिंक्यराणा राजन पाटील यांची निवड करण्यात आली आहे. राज्यातील शेतकरी व ग्रामीण भागाला दर्जेदार शेत व पाणंद रस्त्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे.या समितीमध्ये महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने मोहोळ तालुका समितीच्या सहअध्यक्षपदी मोहोळचे युवा नेते अजिंक्यराणा राजन पाटील यांची नियुक्ती केली आहे.त्यांच्या नेतृत्वातून मोहोळ तालुक्यातील शेतकरी बांधवांना अधिक सक्षम व दर्जेदार पायाभूत सुविधा मिळतील आणि मुख्यमंत्री बळीराजा शेत -पाणंद रस्ते योजना अधिक प्रभावीपणे राबविली जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे

# सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी साधला सोलापुरातील प्रमुख कार्यकर्त्यांशी संवाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत गुरुवार, दि.१६ जुलै २०२६ रोजी कर्नाटक राज्यातील निंबाळ (ता.इंडी, जि.विजयपूर) या गावी जाण्यापुर्वी सोलापुरात सुमारे एक तासभर थांबले होते. यावेळी त्यांनी सोलापुरातील प्रमुख कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

गुरुवारी दुपारी २.३० वाजता त्यांचे सोलापुरात आगमन झाले. नवी पेठ येथील शिवस्मारक अर्थात छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारक मंडळ येथे ते एक तासभर थांबले होते. याठिकाणी प्रमुख कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर मुंबई-बंगळुरु उद्यान एक्सप्रेसने ते बंगळुरुच्या दिशेने रवाना झाले.

सरसंघचालक डॉ.मोहन भागवत हे गेल्या अनेक वर्षांपासून विजयपूर जिल्ह्यातील इंडी तालुक्यातील निंबाळ या गावी असलेल्या श्री गुरुदेव रानडे यांच्या आश्रमात ध्यानासाठी नियमितपणे दरवर्षी येतात.

त्याप्रमाणे ते १४ आणि १५ जुलै रोजी निंबाळ येथील श्री गुरुदेव रानडे आश्रमात मुक्कामी होते.

# टोलचे पैसे भरण्याच्या कारणावरुन दोघांना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जुलै-**

टोलचे पैसे भरण्याच्या कारणावरुन वळसंग टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी दोघा जणांना मारहाण केल्याची घटना सोलापूर-अक्कलकोट रस्त्यावरील वळसंग टोल नाक्यावर गुरुवारी घडली.

वैभव शशिकांत कांबळे (वय-३१), भाऊसाहेब रामदास ढोणे (वय-३१,दोघेही रा.लक्ष्मी टाकळी, ता.पंढरपूर) असे मारहाण झालेल्यांची नावे आहेत.

ते दोघे वळसंग टोल नाक्यावरुन निघाले असताना टोलचे पैसे भरण्याच्या कारणावरुन टोल नाक्यावरील १५ कर्मचाऱ्यांनी त्यांना मारहाण केली. त्यामुळे ते दोघे उपचारासाठी शासकीय रुग्णालयात स्वतः दाखल झाले.

# शहर-जिल्ह्यातील ४०.७८ टक्के मतदारांची ऑनलाईन नोंदणी पूर्ण

## मयत, दुबार, स्थलांतरांची नावे करण्यात आली कमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै -**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार देशभरासह महाराष्ट्रात मतदार यादींच्या अचूकतेसाठी विशेष सखोल पुनर्रिक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणे, चुकीच्या नोंदी दुरुस्त करणे तसेच अपात्र नावे वगळणे यावर भर दिला जात आहे. ही मोहीम सुरू केल्यापासून आजतागायत ८९.४० टक्के लोकांना फॉर्म भरण्यासाठी घरोघरी दिले आहेत. त्यापैकी शहर-जिल्ह्यातील ४० टक्के नागरिकांचे ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, उर्वरित लोकांचे जसजसे फॉर्म मिळतील, तसतसे ऑनलाईन पोर्टलवर नोंदविण्याचे काम गतीने चालू असल्याची माहिती प्रभारी उप जिल्हा निवडणूक अधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना दिली.

जिल्ह्यातील कोणत्याही पात्र मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही, याची खबरदारी आमचे बीएलओ घेत आहेत. यासाठी ३ हजार ७२३ बीएलओंची नियुक्ती करण्यात आली आहे. बीएलओ आणि सुपरवायझर यांना योग्य प्रशिक्षणही दिले आहे. मतदार यादीत एकाच पत्त्यावर अनेक मतदार नोंद असल्याच्या तक्रारी लक्षात घेऊन प्रत्येक घराचे क्रमांक निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. इतकेच नाहीतर आमचे बीएलओ प्रत्येकाच्या घरी ३ वेळा जात आहेत. लग्न होवून गेलेल्या मुली, मयत नागरिक, स्थलांतरीत नागरिक, दुबार नोंदणी झालेल्या नागरिकांची नावेही वगळण्यात येत आहेत. ही मोहीम गतीने राबविण्यासाठी जिल्ह्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचेही सहकार्य मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात ११ विधानसभा आणि २ लोकसभा मतदारसंघ असून, एकूण मतदारसंख्या ३९ लाख ४१ हजार ९५ इतकी आहे. तर जिल्ह्यात एकूण ३७२३ मतदान केंद्रे कार्यरत आहेत. आतापर्यंत ३५ लाख २३ हजार ४४४ मतदारांचे सखोल पुनरिक्षण पूर्ण करण्यासाठी फॉर्म दिले असून, हे प्रमाण ८९.४० टक्के आहे. तर यातील १६ लाख ०७ हजार २६२ मतदारांची म्हणजेच ४०.७८ टक्के ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.



# सोलापूरच्या सर्वांगीण विकासाबरोबरच निधीसंदर्भात पाठपुरावा : खा.डॉ.वाघमारे

## महापालिकेत घेतली आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जुलै-**

सोलापूरचा सर्वांगीण विकास हेच आपले प्रमुख उद्दिष्ट आहे.शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबरच आवश्यक निधीसंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे प्रतिपादन खा.प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी केले.

सोलापूर महानगरपालिकेत विविध विभागांच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, सार्वजनिक सुविधा, पायाभूत विकास, केंद्र शासनाच्या विविध योजना आदींविषयी चर्चा करण्यात आली.

प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये प्रभावी समन्वय ठेवून विकासकामे वेळेत पूर्ण करावीत. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी प्राधान्याने सोडवून प्रत्येक विभागाने नियोजनबध्द आणि जबाबदारीने काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

यावेळी महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे, नगरसेवक प्रियदर्शन साठे, नगर अभियंता सारिका आकुलवार यांच्यासह महानगरपालिकेतील सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# खांबाला धडकून जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जुलै-**

रस्त्याकडेच्या लोखंडी खांबाला धडकून जखमी झालेल्या जांबोड गावच्या दुचाकीस्वाराचा उपचारा दरम्यान शासकीय रुग्णालयात गुरुवारी दुपारी ४.३० वाजता मृत्यू झाला.

सदाशिव सुदाम धुमाळ (वय-३५, रा.जांबोड, ता.माळशिरस) असे मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. दि.२२ जून रोजी रात्री तो पंढरपूर तालुक्यातील आवे येथून राहत्या घरी दुचाकीवरुन निघाला असताना वाटेत नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्त्याकडेच्या खांबाला धडकली होती.

त्याला एका खासगी दवाखान्यात उपचार करुन सोलापुरातील शासकीय रुग्णालयात मेव्हणा भारत पवार यांनी दि.१२ जुलै रोजी दाखल केले असता उपचारादरम्यान गुरुवारी त्याचा मृत्यू झाला.

# तेलंगणात जनसेना पक्षाच्या बैठकीत सोलापूरच्या कार्यकर्त्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जुलै-**

प्रख्यात तेलुगू अभिनेता तथा आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवनकल्याण यांच्या जनसेना पक्षाची महाराष्ट्रात स्थापना करण्यासंदर्भात हैदराबाद येथे एका बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीत सोलापुरातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविले होते, अशी माहिती श्रीनिवास यन्नम (कामटे) यांनी दिली.



जनसेना पक्षाचे जनरल सेक्रेटरी राम तल्लुरी, सुधाकर मच्छा, आर.के. सागर, प्रेम गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत पक्षसंघटनेचा विस्तार, युवक व महिलांना भेडसावणारे प्रश्न यांसह त्या-त्या ठिकाणची राजकीय पार्श्वभूमी व परिस्थिती आदींविषयी चर्चा करण्यात आली.

सोलापूरसह संपूर्ण महाराष्ट्रात जनसेवा पक्षाची पाळेमुळे रुजविण्याकामी सर्वतोपरी सहकार्य करु. लवकरच वार्ड, गाव, तालुका, शहरनिहाय बैठकांचे आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही पक्षाचे जनरल सेक्रेटरी राम तल्लुरी यांनी दिली. दरम्यान, सोलापूर शाखेचा प्राथमिक आराखडा मांडण्यात आला.

या बैठकीस श्रीनिवास यन्नम (कामटे) यांच्यासह सोलापुरातील श्रीनिवास बिटला, अनिल कोंडा, आनंद अवधूत, रोहन श्रीराम आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ.अशोक लांबतुरे : समाजाच्या भल्यासाठी आंतरिक तळमळ, ओढ यांचा सुंदर मिलाप

भरारी साठी शोधावं रोज नवा आकाश कर्तव्यासाठी तोडावेत भावनांचे पाश कितीही संकटे आली तरी देत रहावे अभंग कितीही दुःख आले तरी चेहऱ्यावर असावेत हस्यतरंग खूप दिवसांपासून वाटते असे एकदा तरी जगून पाहावं रोज अपयशाला हिनवत यशाला जिवंत करावं आणि अशीच यशाची उंच भरारी घेऊन ७५ वर्ष पूर्ण करत आहेत. सदैव समाजासाठी कार्य करण्यास तत्पर असणाऱ्या डॉ. लांबतुरे यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!! डॉ.लांबतुरे यांच्याकडे पाहता क्षणी नजरेसमोर उभे राहते ते त्यांचे उत्तुंग समाजकार्य आणि हिमालयाच्या उंचीलाही हिनवेल असा आत्मविश्वास समाजासाठी त्याच्या भल्यासाठी असणारी आंतरिक तळमळ, ओढ यांचा सुंदर मिलाप म्हणजे डॉ.लांबतुरे...

आम्हा स्त्रियांसाठी तर तुम्ही एक आदर्शच आहात तुमचे आधुनिक विचार तर खूपच मोलाचे आहेत अगदी स्त्रियांनी शिकले पाहिजे खंबीरपणे कोणत्याही संकटाचा सामना केला पाहिजे आणि हे करत असताना तिच्या कुटुंबाने सुद्धा खंबीरपणे तिच्यासोबत उभं राहिलं पाहिजे हे अगदी ठणकावून सांगणारे समाज सुधारक म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

डॉ.अशोक लांबतुरे यांचा जन्म १७ जुलै १९५९ रोजी झाला श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथून जनसंपर्क अधिकारी म्हणून ते तीस वर्षे सेवा करून ते सेवानिवृत्त झाले. आपण ज्या समाजात जन्मलो त्या समाजाचं देणं लागतो याची जाण ठेवून २०० अनाथ मुलांचा सांभाळ करत आश्रम शाळा काढली त्याचबरोबर सिद्धेश्वर बँक मर्यादित सोलापूर येथे पंधरा वर्ष संचालक म्हणूनही कार्य केले, त्यांच्या सामाजिक कार्याचे भान ठेवून महाराष्ट्र शासनाने २०१४ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्काराने त्यांचा गौरव केला. त्याचबरोबर सामाजिक कार्य करत असताना त्यांना अनेक पुरस्कारही देण्यात आले आहेत, त्यात अखिल भारतीय पत्रकार संघाकडून पुरस्कार त्याचबरोबर नेशन ऑफ प्राइड पुरस्कार त्याचबरोबर कोरोना सारख्या महामारीच्या काळातही त्यांनी अगदी नेत्र दीपक समाजकार्य केले, आणि त्याचेच कौतुक म्हणून काँग्रेस सेवा दल यंग ब्रिगेडतर्फे त्यांना कोरोना योद्धा म्हणून मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



सामाजिक कार्याबरोबरच समाजाचे आरोग्य ही तितकेच महत्त्वाचे आहे हे त्यांनी हेरले होते आरोग्यमब धनसंपदा या उक्तीप्रमाणे त्यांचे कुष्ठरोग्यांसाठी असणारे कार्य वेगवेगळे रक्तदान शिबिरे घेणे आणि आरोग्य हे किती महत्त्वाचे आहे हे समाजापर्यंत पोहोचवणे किती महत्त्वाचा आहे हे सांगण्यासाठी जनगण जनजागरण रॅली असेल त्याचबरोबर समाजाचा ऱ्हास हा व्यसनांमुळे होतो व्यसनामुळे आज कित्येक कुटुंब उध्वस्त झालेली आहेत आणि समाजामध्ये त्यामुळे व्यसनमुक्ती झाली पाहिजे हाच विचार समोर ठेवून त्यांनी अनेक व्यसनमुक्ती शिबिरे भरवली आणि मग म्हणावेसे वाटते.

आपल्या अनुभवाच्या मार्गातून सामाजिक कार्याचा ध्यास जडावा सदैव तुमच्या प्रेरणेने समाजाच्या हिताच्या तत्परतेने सोलापूर शहर व आसपासच्या शहरांमध्ये संत रविदास महाराज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्साहात पार पडण्यात तुमचा वाटा हा मोलाचा असतो ज्या समाजसुधारकांमुळे आज आपण आहोत त्यांचे विचार समाजामध्ये पर्यंत पोहोचवले पाहिजेत त्यांचा आदर्श हा तळागाळापर्यंत पोहोचला पाहिजे आणि त्यांच्यात आदर्श वरती समाज चालला पाहिजे हेच त्या पाठीमागचे ब्रीद असते, या सर्व सामाजिक कार्याबरोबरच घरातील लामतुरे साहेब हे एक दातृत्व संपन्न असे

व्यक्तिमत्व शंकर पार्वतीलाही लाजवेल असा सौ. लांबतुरे मॅडम व डॉ. लांबतुरे सरांचा एक आदर्श सर्वगुणसंपन्न असाच संसार जणू काही ते एकमेकांसाठीच जन्म घेतलेले दोघेही जण असे पाहताक्षणी वाटते त्यांच्या सानिध्यात राहणाऱ्या व्यक्तींना याची जाणीव क्षणोक्षणी झाल्याशिवाय राहत नाही नातवंडांसाठी तर ते त्यांचा एक लहान मित्र म्हणूनच राहतात त्याचबरोबर सुनांसाठी तर त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे वडीलच असतात त्यांनी शिकावं स्वतंत्र स्वतःच अस्तित्व निर्माण करावं स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करावी असाच त्यांचे मार्गदर्शन असतं आणि त्यांच्या पोटी जन्म घेतलेले त्यांची मुलं तर फारच नशीबवान असा पिता भेटायला नशीब लागतं आणि हे सर्व समाजापुढे एक आदर्श निर्माण करणारा प्रेमळ समाजाचं ऋण फेडणार सर्वगुणसंपन्न सर्वांचा लाडका व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. अशोकराव लांबतुरे साहेब सामाजिक कार्य म्हणजे केवळ दानधर्म करणे नव्हे तर समाजासाठी समाजातील उपेक्षित वंचित वर्गाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी प्रयत्न करणे व हे सर्व कार्य करत असताना आपल्या अधिकारांचा आणि कर्तव्यांचा समतोल समतोल साधत साधत त्यांनी हे सर्व कार्य केले आहे आपले ७५ वर्षाचे जीवन आम्हाला एक अद्वितीय दृष्टिकोन देते आपल्या अनुभवातून आम्ही शिकलो आहोत की सामाजिक कार्य म्हणजे केवळ संसाधने नव्हे तर आपला वेळ आपले ज्ञान आपले कौशल्य हे समाजातील तळागाळापर्यंत पोहोचवणे म्हणजेच समाजकार्य होय आपल्या अनुभवांचा लाभ घेऊन आम्ही आपल्या समाजातील तरुण पिढीला मार्गदर्शन करत आपण आपल्या कार्यातून आम्हालाही खूप मोठी प्रेरणा देत आहात समाजसेवेच्या महत्त्वाबद्दल नेहमी तुमच्याशी संवाद साधत असताना याची क्षणोक्षणी आठवण येते मग ते गटई कामगारांसाठी निवारा करणे असेल छत्र देणे असेल आपण ज्या समाजात जन्म घेतो त्यांचा आपण देणे लागतो याची जाणीव तुमच्या बोलण्यातून क्षणोक्षणी होत असते त्याची जाणीव तुम्ही आम्हालाही सतत करून देत असतात पुन्हा एकदा तुमच्या कार्याला तुमच्या दातृत्वाला तुमच्यासारख्या समजवून फिरणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याला ७५ वर्ष अविरतपणे कार्य करणाऱ्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला वाढदिवसाच्या वाढदिवसाच्या लक्ष लक्ष शुभेच्छा पुढील आयुष्यही आरोग्य संपन्न व उत्कर्षमय जावो व आम्हाला आणखीन नवे मार्गदर्शन तुमचे सतत मिळत राहो हीच तुळजाभवानीचे चरणी मनापासून प्रार्थना धन्यवाद.

**- सुरेखा लांबतुरे (पत्नी),**
**राष्ट्रीय महामंत्री,**
**संत शिरोमणी गुरु रविदास विश्व महापीठ.**
**माजी सदस्या,**
**राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग.**
**भारत सरकार नवी दिल्ली.**

# आज पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**



सोलापूर शहर-जिल्ह्यातील बेरोजगारांसाठी सोलापूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने शुक्रवार, दि.१७ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ यावेळेत पंढरपूर येथील स्टेशन रोड परिसरातील गुरुप्रसाद स्किल डेव्हलपमेंट सेंटर येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले, अशी माहिती सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी दिली.

मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, टेलिकॉलर, कॉम्प्युटर ट्रेनर, रिसेप्शनिस्ट, सेल्स एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, सेल्स गर्ल, हेल्पर, लॅब असिस्टंट, कॉम्प्युटर ऑपरेटर, फिल्ड इंजिनिअर, टीम लीडर, बिलिंग एक्झिक्युटिव्ह, रिलेशनशिप मॅनेजर, सर्व्हिस ॲडव्हायझर, वर्कशॉप मॅनेजर आदी पदांसाठी भरती केली जाणार आहे. दहावी, बारावी, डीएमएलटी, पदवी, संगणक, मेकॅनिकल डिप्लोमा आदी शैक्षणिक पात्रता आवश्यक राहणार आहे, असेही त्यांनी सांगितले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## विद्यमान मंत्री गुलाबराव पाटील थेट गाभाऱ्यात, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार मात्र ताटकळत

### जिल्हा प्रशासनाने केला आजी-माजी मंत्र्यांमध्ये भेदाभेद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ जुलै-**

'भेदाभेद अंमगळ' अशी संतांच्या मुखातून शिकवण देणाऱ्या साक्षात परब्रम्ह पांडुरंगाच्या नगरीतच विठुरायाच्या दर्शनासाठी आजी, माजी मंत्र्यांमध्ये भेदाभेद केल्याची घटना बुधवार, दि.१५ जुलै २०२६ रोजी घडली. विद्यमान मंत्री गुलाबराव पाटील हे थेट गाभाऱ्यात तर माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार हे मात्र रांगेत ताटकळत उभे राहिल्याचे 'याचि देहि, याचि डोळा' दिसून आले.

आषाढी यात्रेच्या अनुषंगाने यंदा व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या पहिल्याच दिवशी मंत्र्यांना सम थकांसह व्हीआयपी प्रवेश तर माजी मंत्री तथा विद्यमान आमदारांच्या कुटुंबाला देवाच्या दारात ताटकळत उभे राहावे लागले. विठ्ठल मंदिरात व्हीआयपी दर्शनावरुन सत्ताधारी भाजप आणि शिवसेना नेत्यांमध्येच दुजाभाव झाल्याची घटना घडली.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि शिवसेनेचे विद्यमान मंत्री गुलाबराव पाटील दोघेही विठ्ठल दर्शनासाठी पंढरीत आले होते. भाजप नेते सुधीर मुनगंटीवार हे कुटुंबासह विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरात आले होते. मात्र, मंदिर प्रशासनातील असमन्वयामुळे त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना दर्शनासाठी बराच वेळ रांगेत ताटकळत उभे राहावे लागले. दुसरीकडे, शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील हे मंदिरात पोहोचताच प्रशासनाने प्रचंड तत्परता दाखवत त्यांना आणि त्यांच्यासोबत आलेल्या कार्यकर्त्यांच्या मोठ्या गोतावळ्याला थेट मुख्य गाभाऱ्यात नेऊन व्हीआयपी दर्शन घडविले.

#### ढिसाळ नियोजनामुळे दर्शनासाठी मोठी अडचण



जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः दर्शनासाठी येण्याचे निमंत्रण दिले. म्हणूनच आम्ही सहकुटुंब आलो होतो. मात्र, अधिकाऱ्यांत ताळमेळ आणि समन्वय नव्हता. या ढिसाळ नियोजनामुळे दर्शनासाठी मोठी अडचण झाली, असे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

#### प्रवास करुन आलोय, दर्शन मिळायलाच हवे



आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. तब्बल अडीचशे किलोमीटर अंतरावरुन प्रवास करून विठ्ठलाच्या चरणी आलो आहोत. त्यामुळे आम्हाला दर्शन मिळायलाच हवे. माझ्यासोबत आलेल्या लोकांनाही थेट सोडण्यात आले होते, असे मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

## पंख्याला गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि.१६ जुलै-**

अज्ञात कारणावरून एका ३९ वर्षीय इसमाने राहत्या घरातील पंख्याला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना अशोक चौक परिसरातील साईबाबा चौक येथे उघडकीस आली. बालाजी शंकर कुरापाटी (रा.साईबाबा चौक, सोलापूर) असे त्यांचे नाव आहे. बुधवार, दि.१५ जुलै २०२६ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घरातील छताच्या पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. नातेवाईकांनी फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## जिल्हाधिकाऱ्यांचा मुक्काम पंढरपुरात

### आषाढी वारी : पालखी मार्गाची पाहणी; स्वच्छतेला द्या प्राधान्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**



आषाढी वारी २०२६ च्या अनुषंगाने दहा मानाच्या पालख्यांसोबत अन्य पालख्याही पंढरपूरकडे निघालेल्या आहेत. आषाढी वारी संपेपर्यंत जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. हे श्रीक्षेत्र पंढरपुरात मुक्कामी राहणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, श्री संत ज्ञानेश्वर महाराज, श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधांबाबतची कामे दिलेल्या सूचनांप्रमाणे होत आहेत की नाही, याची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी पाहणी केली. पालख्यांचे मुक्काम व विसाव्याचे ठिकाण, रिंगण या ठिकाणांनाही भेटी देऊन त्यांनी विविध सूचना दिल्या.

बोंडले येथे पाहणी करताना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी विसाव्याच्या ठिकाणी व रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, तसेच स्वच्छता व्यवस्था ठेवण्याबाबत निर्देश दिले. बोंडले येथे इमर्जन्सी ऑपरेटिंग सेंटरचे (एजउ) काम त्वरित पूर्ण करावे आणि पालख्या बाहेर पडण्याच्या मार्गावर मुरूम टाकावा. महामार्गावर आवश्यकतेनुसार रम्बलर व गतिरोधक बसवावेत, तसेच क्रॅश बॅरियर्स व इतर सुरक्षा उपाययोजना करण्याबाबतही त्यांनी निर्देशित केले.

वेळापूर येथे रस्त्याची पाहणी करताना जिल्हा परिषदेने मंजूर केलेल्या दोन्ही रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावीत, पालखीतळाचे मुरमीकरण व सपाटीकरण करावे, जर्मन हँगरचे काम लवकर पूर्ण करावे व जर्मन हँगरच्या बाजूला असलेला मोठा खड्डा तात्काळ बुजवण्याबाबतचे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

तसेच पाटबंधारे विभागाच्या जागेची पूर्ण स्वच्छता करावी व झाडांच्या फांद्या कापण्याबाबतही त्यांनी सांगितले. पुरंदावडे येथे होणाऱ्या गोल रिंगणाच्या अनुषंगाने मुरमीकरण व सपाटीकरण करावे, गवत काढून तात्काळ स्वच्छता करण्याबाबत त्यांनी सूचित केले.

माळशिरस येथे आपत्कालीन नियंत्रण केंद्राचे काम तात्काळ पूर्ण करावे. स्वच्छतागृहे व स्नानगृहांची उभारणी त्वरित झाली पाहिजे. वारकरी सुविधा केंद्राच्या जागेचे मुरमीकरण व सपाटीकरण करून स्वच्छता ठेवावी. बारिक स्वच्छतागृहापर्यंत जाण्यासाठी मुरमीकरण करून घ्यावे.

या सर्व कामांसाठी जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध केलेल्या निधीचा योग्य पद्धतीने विनियोग करावा व केलेल्या कामांचे जिओ टॅगिंग करून छायाचित्रे काढावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या. याच पद्धतीने नातेपुते, अकलूज, बोरगाव, सदाशिवनगर येथील पालखी मुक्काम, विसावा व रिंगण ठिकाणांची पाहणी करून जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कामे करून घेण्याबाबत सूचित केले.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या अनुक्रमे १९ व २० जुलै रोजी सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत आगमन करत आहेत. त्या दृष्टीने सर्व कामे त्वरित पूर्ण झाली पाहिजेत, यासाठी सर्व यंत्रणा प्रमुखांनी कामाचे नियोजन करावे. यावेळी येणाऱ्या पालख्यांमधील तसेच वारकरी भाविकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, या दृष्टीने सर्वांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे, असे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले.

आषाढी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक-वारकरी येणार आहेत. त्या दृष्टीने सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. भाविक-वारकऱ्यांना स्वच्छ पाणी, शौचालये आणि पालखी मार्गाबरोबरच पालखी मुक्काम, विसावा व रिंगण या सर्व ठिकाणी स्वच्छता योग्य पद्धतीने राखली जाईल, या दृष्टीने सर्व यंत्रणांनी परस्परांशी समन्वय ठेवावा व एकही वारकऱ्याची गैरसोय होणार नाही, या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे सांगून दिनांक १४ जुलै ते वारी संपेपर्यंत आपण पंढरपूर येथेच मुक्कामी असल्याचेही त्यांनी सांगितले.

या दरम्यान कोणालाही कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा माझ्याशी संपर्क करावा, असे त्यांनी स्पष्ट केले. या पाहणी दौऱ्यात माळशिरसच्या उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे नोडल अधिकारी अमित माळी, तहसीलदार सुरेश शेजुळ यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### ▶▶ महत्वाचे...

#### महसूल शाखेच्या बनावट आदेशाद्वारे जमीन लाटण्याचा प्रयत्न, चौघांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि.१६ जुलै-**

महसूल शाखेच्या बनावट आदेशाद्वारे जमीन लाटण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी चार जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात चौघा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. श्रीनिवास वाघमारे, शिवशंकर कोळी, खंडेराय व्हनमाने, रविंद्र कोनापुरे (सर्वजण रा.सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत. याबाबत नागनाथ नरसिंग पिचके (रा.वैराग, ता.बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १९ सप्टेंबर २०२४ आणि दि.१५ जुलै २०२६ रोजी वरील आरोपींनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश क्र.२०२०/महसूल शाखा/कार्या-३/न.भु.आय/आरआर/११८१४ दि.२२/०८/२०२० या संदर्भाचा बनावट आदेश तयार करुन तो आदेश शासकीय कार्यालयात जमा केला. त्याद्वारे श्रीकांत वाघमारे याने स्वतःचे नाव लावून घेण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले. सपोनि पाटील हे पुढील तपास करीत आहेत.

................................

#### स्वस्तात सोने देतो म्हणून दोघांची फसवणूक; सात जणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१६ जुलै-**

बाजारभावापेक्षा स्वस्तात सोने देतो, अशी थाप मारुन दोघांकडून २८ लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी ७ जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. लखन ठोबरे, रितेश कांबळे, ८३३२८०३४१८ हा मोबाईल क्रमांक असलेली महिला, एक अज्ञात इसम, रेल्वे स्टेशनजवळ भेटलेला एक मुलगा, स्वतःला पोलिस म्हणवून घेणारे २ व्यक्ती अशी त्यांची नावे आहेत. याबाबत अमर सुनील तुपे (वय-३०, रा.बलवडी भाळवणी, ता.खानापूर,जि. सांगली) यांनी फिर्याद दिली आहे. अमर तुपे, लखन ठोंबरे, रितेश कांबळे यांनी बाजार भावापेक्षा सोने प्रति तोळा ५००० रुपये कमी दराने बिलासह देतो, असे सांगून माझ्यासह माझा मित्र अर्जून चव्हाण यांच्याकडून दि.३जानेवारी २०२६ ते दि.२ एप्रिल २०२६ रोजी युपीआय व रोख स्वरुपात एकूण २८ लाख रुपये घेतले. पैसे घेऊन बराच कालावधी लोटला तरी सोने न दिल्याने आरोपींना फोन करुन पैसे किंवा सोने देणेबाबत विंनती केली. मात्र, आज देतो; उद्या देतो असे करत वेळोवेळी तारखा दिल्या. यादरम्यान स्थानिक लोकांकडून चौकशी केली असता अमर तुपे हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्याचे समजले. यावरुन आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले, असे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार मोरे हे पुढील तपास करीत आहेत.




## श्रीगुरु चन्नबसव प्रतिष्ठानच्या वतीने ६२ गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

अक्कलकोट तालुक्यातील आरळी येथील श्री स्वामी समर्थ प्रशाला येथे श्रीगुरु चन्नबसव प्रतिष्ठान व दुलंगे परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशालेतील गरीब, होतकरु व गरजू अशा ६२ विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप करण्यात आले. प्रथम लिं.ष.ब्र.तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजीच्या प्रतिमेचे पूजन दुलंगे परिवाराच्या वतीने करण्यात आले.

मुख्याध्यापक लक्ष्मण तेलुणगी यांनी मान्यवरांचे स्वागत व सत्कार केले. श्रीगुरु चन्नबसव प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल दुलंगे, उपाध्यक्ष दिलीप दुलंगे व सचिव आनंद दुलंगे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ संचालक गंगाधर दुलंगे याप्रसंगी बोलताना म्हणाले, गुरुसेवा केल्याने आमच्या कुटुंबावर महास्वामीजींचा आशीर्वाद आहे. गुरुकृपा असेल तर जीवनात काही कमी पडत नाही. आज संस्थेचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. बृहन्मठ होटगी मठाचा महाराष्ट्रात उल्लेखनीय कार्य आहे.

श्री बृहन्मठ होटगी संस्थेचे सचिव एस.जी. स्वामी अध्यक्षस्थानावरुन बोलताना म्हणाले, समाज ऋणातून मुक्त होण्यासाठी समाजाची सेवा अशा स्वरुपात करावी. दुलंगे परिवार हे श्री बृहन्मठ होटगी मठाची तन, मन, धनाने सेवा करतात. दुलंगे परिवार हे दानशूर परिवार आहे. दुलंगे यांच्यासारख्या परिवाराने शिक्षणासाठी पुढाकार घेतल्याने गरजू व गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत व समाजातील मुले शिक्षणापासून दूर जाणार नाहीत. याप्रसंगी प्रतिष्ठानचे संचालक शरद दुलंगे, जयराज दुलंगे, सचिव आनंद दुलंगे आदी उपस्थित होते. महेश कोरे यांनी सूत्रसंचालन केले. रुपाली रामशेट्टी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मधुकर जोशी, मुक्तेश्वर कबाडे, बिराजदार, घोंगडे, गुरव, देगावकर, भीमाशंकर धोत्रे आदींनी परिश्रम घेतले.

## श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरास ५७ लाख रुपयांच्या सोन्याचे पादुका दान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ जुलै-**



आषाढी यात्रा कालावधीत श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी देश-विदेशातून लाखो भाविक दाखल होत आहेत. मंदिर समितीकडे रोख देणगीबरोबरच सोने, चांदी व इतर मौल्यवान वस्तूंच्या स्वरुपात दान प्राप्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर एका भाविकाने नाव गोपनीय ठेवण्याच्या अटीवर ४४६ ग्रॅम वजनाचे, ५६ लाख ५९ हजार रुपये किंमतीचे सोने पादुका दान स्वरुपात अर्पण केल्या आहेत.

यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ॲड.माधवी निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा आदी उपस्थित होते. दरम्यान, मंदिरात स्वतंत्र दान कक्षची व्यवस्था करण्यात आली आहे. दानस्वरुपात प्राप्त होणाऱ्या मौल्यवान वस्तूंची तपासणी, शुध्दता पडताळणी, वजन, नोंदणी व सुरक्षित स्वीकार करण्यासाठी दोन सराफ, अनुभवी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

## विवाहित पण अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१६ जुलै-**

बार्शी तालुक्यातील पुरी येथील एका विवाहित पण अल्पवयीन (१५ वर्षीय) मुलीने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी मृत मुलीच्या आईने पांगरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन पती आणि सासऱ्याविरुध्द गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

माढा तालुक्यातील पारधी समाजातील एका १५ वर्षीय मुलीचा विवाह दि.१४ डिसेंबर २०२५ रोजी बार्शी तालुक्यातील एका गावातील मुलाशी झाला होता. विवाहानंतर सासरी तिचा मानसिक छळ सुरु झाला. मुलगी माहेरी आल्यानंतर तिने आईला सांगितले की, दि.२ जुलै २०२६ रोजी घरात कोणी नसताना सासऱ्याने तिच्या इच्छेविरुध्द शरीराला स्पर्श करुन गैरवर्तन केला. हा प्रकार पतीला सांगितल्यानंतरही त्याने कोणालाही याबाबत सांगू नको, असे सांगितले होते.

दि.४ जुलै रोजी वाढदिवसानिमित्त माहेरी आली होती. त्यानंतर तिला सासरी सोडताना आईने पती व सासऱ्यांना मुलीचा विनाकारण छळ करु नये, काही अडचण असल्यास स्वतःला सांगावे, अशी विनंती केली होती. दि.१५ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास त्या मुलीने आईला फोन करुन, सासऱ्याने पुन्हा जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. आणि काही वेळातच मुलीच्या पतीने फोन करुन तिने गळफास घेतल्याची माहिती दिली, असे फिर्यादीत नमूद आहे.

## आज श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे जिल्ह्यात आगमन

### उळेगावात होणार पहिला मुक्काम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**



श्रीक्षेत्र शेगाव येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे निघालेली श्री संत गजानन महाराजांची पालखी दि.१७ जुलै रोजी सोलापूर जिल्ह्यात दाखल होत आहे. दि.१७ जुलै रोजी उळेगाव आणि दि.१८ व १९ जुलै रोजी सोलापूर शहरात ही पालखी मुक्कामी असणार आहे. दि.२३ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपुरात पालखी पोहोचणार आहे. ही पालखी ७०० किलोमीटरचा पायी प्रवास करत परळी, आंबेजोगाई, धाराशिव मार्गे सोलापुरात दाखल होत आहे. टाळ-मृदंगाच्या गजरात, फुलांची उधळण करत आणि रांगोळ्या काढून जल्लोषात स्वागत केले जात आहे.

शुक्रवार, दि.१७ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता धाराशिवकडून तामलवाडीमार्गे या पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन होईल. यावेळी जिल्हा प्रशासनाकडून जंगी स्वागत होणार आहे. याप्रसंगी महापालिका, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रमुख अधिकारी, जिल्हा परिषदेचे अधिकारी-पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

याच दिवशी दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगाव येथे पहिला मुक्काम असेल. शनिवार, दि.१८ जुलै रोजी दुपारी १२ वाजता सोलापूर शहरातील सद्गुरु प्रभाकर महाराज मंदिरात पालखीचे आगमन व महाप्रसाद. त्यानंतर पद्मशाली शिक्षण संस्था संचलित रविवार पेठ येथील कुचन प्रशाला येथे पालखी मुक्कामासाठी रवाना होईल.

रविवार, दि. १९ जुलै रोजी सकाळी १० वाजता सोलापूर शहरातील सात रस्ता येथील उपलप मंगल कार्यालयात पालखीचे आगमन, महाप्रसाद वाटप आणि शहरातील दुसऱ्या दिवशीचा मुक्काम याठिकाणी राहणार आहे. दि. २० ते २२ जुलै यादरम्यान सोलापूर शहरातून पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होईल. मोहोळ आणि इतर गावांमधून प्रवास करत पालखी पंढरपूर तालुक्यात दाखल होईल. दि.२३ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पालखी दाखल होणार आहे.

#### उळेगाव येथे भाविकांसाठी महाप्रसादाची सोय

दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगाव येथे भाविकांची यंदा प्रतिवर्षीपेक्षा चांगली सोय करण्यात येत आहे. ६ ते ७ हजार भाविकांसाठी महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. वॉटरप्रुफ मंडप, शौचालयांची व्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य तपासणीसाठी डॉक्टरांची सोय केली आहे. पायी चालून थकलेल्या वारकऱ्यांच्या पायाच्या मसाजचीही सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे, अशी माहिती जि.प.सदस्य नेताजी खंडागळे यांनी दिली.

## ज्ञानामृत आनंदलहरी १५०४

हंबरोनी येती । वत्सा धेनू पान्हा देती।
तुम्ही करावा सांभाळ । माझा अवघा सकळ ।

प्रेम हे दोही बाजूंनी असावे. अर्थात, आपण ज्याच्यावर नि:स्वार्थ प्रेम करतो. तोही जर आपल्यावर तसेच प्रेम करत असेल तर प्रेमाचा खरा आनंद दोघांनाही उपभोगता येतो. केवळ आपणच समोरच्यावर प्रेम करतो आणि समोरचा त्या प्रेमाला कसलीच दाद देत नसेल तर प्रेमाचा खरा आनंद घेता येत नाही. समोरच्याला आपले प्रेम मान्यच नसेल तर आपण आपल्या प्रेमाला मर्यादा घातली पाहिजे आणि कोणत्याही परिस्थितीत या एकतर्फी प्रेमाचे नाराजित रुपांतर होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. एकतर्फी प्रेम हा प्रकार नाशवंत जीवाच्या बाबतीत घडू शकतो. पण शाश्वत असणाऱ्या भगवंताच्या बाबतीत असे घडत नाही. कारण भक्त आणि भगवंताकडे व्यवहाराला स्थान नसते. ज्या प्रमाणे लहान बाळाला, वासराला व्यवहार कळत नाही. त्याप्रमाणे स्वत:ला लहानपण घेणाऱ्या भक्ताला व्यवहार समजत नाही. गाय शेतातून हंबरत वासराकडे अती प्रेमाने जाऊन त्याला पान्हा पाजते. वासरूही तेवढेच प्रेम गाईला देते. आई बाळाला आणि बाळ आईला असेच प्रेम देते. भगवंताने आपणाला आई, गाई प्रमाणे प्रेम द्यावे व आपल्याकडून लेकरू, वासरा प्रमाणे प्रेम घ्यावे असे संत सेनाजींना वाटते. म्हणून सेनाजी महाराज पांडुरंगाला, हंबरोनी येती ।



वत्सा धेनू पान्हा देती । तुम्ही करावा सांभाळ । माझा अवघा सकळें । , विसरली भूकतहानें तुमचे देखिल्या चरण । सेना म्हणे प्रेम भातुकें । द्यावे आता हे कौतुकें । असे म्हणतात.

अन्न, वस्त्र, निवाराया जीवाच्या प्रमुख गरजा आहेत. या पैकी अन्न ही प्रथम गरज आहे. या गरजेची पूर्ती करण्याचा विसर जीवाला पडणे दुमिळ असते. अर्थात, ही गरज पूर्ण केल्या शिवाय इतर कांहीच करता येत नाही. पण बऱ्याच वेळा जीव अत्यंत आवड ती घटना घडली तर त्या आनंदात महत्वपूर्ण असणाऱ्या अन्नालाही विसरतो. अतिप्रिय व्यक्तिची भेट झाली तर कांही वेळ का होईना माणूस तहान भूक विसरतो. नाशवंत जीवाच्या भेटीत जर असे घडू शकते तर शाश्वत असणाऱ्या भगवंताच्या चरणाचे दर्शन झाल्यास असे घडेल का? असा प्रश्नच निर्माण होणार नाही. कारण असे घडल्याशिवाय राहणार नाही. असे फक्त त्याच व्यक्तिच्या बाबतीत घडू शकते की जो भगवंतावर नि:स्वार्थ प्रेम करतो. ज्याला भगवंताकडून संसारासाठी किंवा भौतिक सुखासाठी कांही मागायचे नाही तसेच केलेल्या पापातून मुक्ति मिळण्याची अपेक्षा नाही, अशा जीवाच्या बाबतीत भगवंताच्या चरण दर्शनाने तहान भूक विसरण्याचे घडू शकते. असे घडणे हे अतिप्रेमाचे व एकरूपतेचे प्रतिक होय. संसारातही लेकराच्या प्रेमात आई वडिल बऱ्याचवेळा तहानभूक विसरुन जातात. आपण आई वडिलांसाठी तहाणभूक विसरावीच असे नसले तरीही किमान आपल्यासाठी आई वडिलांनी खूप काही केले आहे, याची किमान आठवण तरी आपण ठेवावी, असे आम्हास वाटते. जय जय राम कृष्ण हरी.

**-ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरूवार,**
**दि. १७ जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - आषाढ शु. चतुर्थी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- मघा (१८.३४)**
**योग - व्यतिपात (२२.४५)**
**करण - वणिज (१७.२९)**
**राहू काल : शुक्रवार**

**स. १०.३० ते १२.००**

**दिनविशेष :**
**१८०२: पहिल्यांदाच मोडी लिपीतून छपाई (मुद्रण) करण्यात आली. १९५५: कॅलिफोर्नियामध्ये प्रसिद्ध 'डिस्नेलँड' पार्क लोकांच्या भेटीसाठी सुरू झाले. १९७५: शीतयुद्धाच्या काळात अंतराळ संशोधनात महत्त्वाची घटना घडली; अमेरिकेचे 'अपोलो' आणि रशियाचे 'सोयुझ' ही दोन अंतराळयाने अंतराळात एकमेकांना जोडली गेली.**




## एसपीएम स्कूलच्या विद्यार्थ्याचा राज्यस्तरीय नाट्य महोत्सवात गौरव

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

एस.पी.एम. इंग्लिश स्कूल, सोलापूरच्या विद्यार्थी सम्राट जोजंट याने अभिनय क्षेत्रात यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित २२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा (प्राथमिक फेरी) २०२५-२६ अंतर्गत सादर करण्यात आलेल्या 'झाले मोकळे आभाळ' या नाटकातील उत्कृष्ट अभिनयाबद्दल सम्राट जोजंट याला अभिनय रौप्यपदक प्रदान करून गौरविण्यात आले. हा सन्मान बहुजन हिताय बहुजन सुखाय एज्युकेशन सोसायटी यांच्या संस्थेतर्फे सादर करण्यात आलेल्या नाटकासाठी देण्यात आला आहे. या यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या संगीता कोळी व सर्व शिक्षक, पालकवर्ग व सहविद्यार्थ्यांनी सम्राटचे अभिनंदन केले. शाळा समिती अध्यक्ष अनिल बर्वे व सदस्य सुरेश मंकणी यांनी सम्राटला शुभेच्छा दिल्या.

## मधमाश्यांचा दंश; वयोवृध्द महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

राहत्या घरात मधमाशीच्या दंशाने जखमी झालेल्या ८३ वर्षीय वृद्ध महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात बुधवारी मध्यरात्री मृत्यू झाला. हरणाबाई नागनाथ उपाडे (वय ८३ वर्ष, रा. संतोषनगर, बाळे) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना दोन दिवसापूर्वी राहते घरात असताना डाव्या हाताला मधमाशीने दंश केला होता. हाताला सूज येऊन त्रास झाला होता. त्यांना बुधवारी रात्री आठ वाजता नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान रात्री साडेअकरा वाजता मृत्यू झाला.

# महापालिका आपत्कालीन नियंत्रण कक्षाकडून तक्रारींवर कार्यवाही

## दोन ठिकाणी झाडे पडल्याच्या घटना तर तीन ठिकाणी साचले पाणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

पावसाळ्यात शहरात उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्कालीन परिस्थितीला तातडीने प्रतिसाद देण्यासाठी सोलापूर महापालिकेने २४ तास कार्यरत आपत्कालीन नियंत्रण कक्ष सुरू केला असून, बुधवारी रात्रीपर्यंत विविध प्रकारच्या १२ तक्रारींची नोंद झाली. आपत्कालीन पथकाने त्वरित घटनास्थळी धाव घेत सर्व तक्रारींचे निवारण केल्या आहेत.

पावसामुळे शहरातील बलिदान चौक आणि सिव्हिल हॉस्पिटलसमोरील पीएचई स्टोअर परिसरात झाडे कोसळल्याच्या घटना घडल्या. तसेच एकता नगर, शेटे वस्ती आणि भैय्या चौक परिसरात पाणी साचल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून यंत्रणा तातडीने सक्रिय करण्यात आली आणि झाडे हटविणे तसेच पाणी उपसण्याची



**महत्त्वाचे संपर्क क्रमांक असे**

नगर अभियंता विभाग (इमारत पडणे, झाड पडणे, पाणी साचणे) दूरध्वनी : ०२१७-२७४०३३५ / ०२१७-२७३५२९३ टोल फ्री : १८००२३३१९१४, १८००२३३१९१६ मोबाईल : ९४२३९९१६५३, ९४२३९९३९०६ सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग (ड्रेनेज तक्रारी) ८४२१०४०७५५ झोन १ व २ : ८६६९१७८४६२ झोन ४ व ५ : ८२३७३८२८७३ झोन ३ व ८ : ९५७९८५४५६८ झोन ६ व ७ : ८३८१०९०७७७ पाणीपुरवठा तक्रारी टोल फ्री : ९६०७९८०३९९ ७७०९०८९३७१. हे क्रमांक नागरिकांनी पावसाळ्यातील आपत्कालीन परिस्थितीत तक्रार नोंदविण्यासाठी वापरावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

कामे पूर्ण करण्यात आली. पावसाळ्यात इमारत पडणे, झाडे कोसळणे, सखल भागात पाणी साचणे, ड्रेनेज तुंबणे तसेच पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी स्वतंत्र अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे नागरिकांना आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास मदत मिळणार आहे.नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून तक्रारी नोंदविण्याचे आवाहन केले असून ही यंत्रणा २४ तास कार्यरत राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# महापालिकेत अनागोंदी कारभार : खा. प्रणिती शिंदे

### अपूर्ण विकासकामांना गती देण्याच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

महानगरपालिकेतील प्रलंबित विकासकामांचा आढावा घेताना खासदार प्रणिती शिंदे यांनी महापालिकेच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली. भ्रष्टाचार, अनागोंदी आणि निष्क्रियतेमुळे विकासकामे रखडल्याचा आरोप करत नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

महापालिकेत झालेल्या बैठकीस आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते. बैठकीत भैय्या चौक-मरीआई चौक रेल्वे पूल, आसरा पूल, नालेसफाई, समांतर जलवाहिनी, पाणीपुरवठा, नगरोत्थान योजनेतील ड्रेनेज, शुभराय आर्ट गॅलरी, तेलगू भवन, सेटलमेंट मैदान आदी कामांचा आढावा घेण्यात आला.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक (भैय्या चौक)-मरीआई चौक रेल्वे पुलाचे काम संथ गतीने सुरू असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. आसरा पूल वाहतुकीसाठी बंद करूनही काम सुरू नसल्याबद्दल अधिकाऱ्यांना जाब विचारत ३१ मार्च २०२७ पर्यंत काम पूर्ण करण्याबाबत लेखी हमी मागितली.



नालेसफाई अपूर्ण असल्याने पावसाळ्यात नागरिकांना फटका बसू शकतो, असे सांगत मुर्गी नाला, शहारी नाला, कुंभार वेस आणि गणेश वेस नाल्यांची सफाई पूर्ण करण्याचे निर्देश दिले. समांतर जलवाहिनी प्रकल्प पूर्ण होऊनही नियमित पाणीपुरवठा होत नसल्याबद्दलही त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले.अपूर्ण विकासकामांसाठी आवश्यक मुदतवाढ २४ तासांत घेऊन कामांना गती द्यावी, असेनिर्देश त्यांनी दिले. बैठकीस नगरसेवक चेतनभाऊ नरोटे, नरसिंह आसादे, माजी नगरसेवक मनोज यलगुलवार, तिरुपती परकीपंडला, रुपेश गायकवाड, सुभाष वाघमारे उपस्थित होते.



## जयेश पटेल यांचा रविवारी पदग्रहण सोहळा

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२च्या २०२६-२७ वर्षासाठी नवनिर्वाचित प्रांतपाल जयेश आर. पटेल यांचा पदग्रहण सोहळा रविवार दि. १९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पद्मावती कन्व्हेन्शन हॉल, एमआयडीसी, अक्कलकोट रोड येथे होणार असल्याची माहिती मितेश पंचमीया यांनी पत्रकार परिषदेत दिली. या सोहळ्यास आचार्य परमपूज्य गोस्वामी १०८ श्री आश्रयकुमारजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, रोटरी इंटरनॅशनल डायरेक्टर रो. के. पी. नागेश प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मावळते प्रांतपाल सुधीर लातूरे हे प्रांतपालपदाची सूत्रे रो. जयेश आर. पटेल यांच्याकडे सुपूर्द करणार आहेत. रोटरी क्लब ऑफ सोलापूरला ९० वर्षांची परंपरा असून, या क्लबमधून आठव्यांदा प्रांतपाल होण्याचा मान मिळत आहे. डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत ११ महसुली जिल्ह्यांतील १०४ रोटरी क्लब, ४,२०० हून अधिक रोटेरियन्स आणि ३६ रोटरॅक्ट क्लब कार्यरत आहेत. या पत्रकार परिषदेस पार्थ दावडा, सलाम शेख, राजन वोरा, संजीव मेंते, अतुल चव्हाण, डॉ. केदार कहाते, सुहास लाहोटी, सुनील माहेश्वरी, धनश्री केळकर, संतोष कणेकर, पराग कुलकर्णी, शिवाजी उपरे उपस्थित होते.

## ताता गणपती मंडळातर्फे नेत्र तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

पूर्व भागातील मानाचा ताता गणपती मंडळातर्फे आधारस्तंभ मुरलीधर आरकाल व विश्वस्त उमेश मामड्याल यांच्या मार्गदर्शनाखाली साबळे नेत्र हॉस्पिटल आणि गुजराथी मित्र मंडळ संयुक्त विद्यमाने आशय्या आरकाल यांच्या स्मरणार्थ मोफत नेत्र तपासणी तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आणि रक्तदान शिबिर पार पडले.

आमदार विजयकुमार देशमुख यांचा सत्कार करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. यावेळी नगरसेवक अमर पुदाले, मुकेश मेहता, मंडळाचे विश्वस्त सत्यनारायण आरकाल, संदीप




कन्ना, अध्यक्ष बालाजी आरकाल व उपाध्यक्ष ॲड संदीप संगा, डॉक्टर राजेंद्र गुल्लापल्ली अशोक इंदापुरे, श्रीनिवास रिकमल्ले लक्ष्मीकांत दंडी तसेच राजेश पातूर, महेश कोंडले, मनोज पातूर, अंबादास अढेली, राकेश पुंजाल उपस्थित होते.




## 'ए. जी. पाटील'च्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

शांती एज्युकेशन सोसायटी संचलित ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (स्वायत्त), सोलापूर येथील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड मिळवत संस्थेच्या उत्कृष्ट प्लेसमेंट परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला आहे.

इन्फोसिस, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस), ॲक्सेन्चर, कॉग्निझंट, यार्डी सॉफ्टवेअर, टाटा पॉवर, जॅबिल, व्हॅरॉक, ओ/ई/एन इंडिया, किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज आदी माहिती-तंत्रज्ञान, ऊर्जा, ऑटोमोबाईल, बांधकाम व अभियांत्रिकी क्षेत्रातील नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, ॲप्टिट्यूड, तांत्रिक कौशल्य, मॉक इंटरव्ह्यू, रेझ्युमे बिल्डिंग, ग्रुप डिस्कशन आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण दिल्यामुळे हे यश मिळाल्याची माहिती प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. एन. पी. पाटील यांनी दिली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले व प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व प्रशिक्षण विभागाचे अभिनंदन केले. या यशामध्ये डिपार्टमेंटल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट को-ऑर्डिनेटर्स प्रा. एस. जे. लिगाडे, प्रा. के. आर.मामड्याल, प्रा. जी. एन. दोंतुल आणि प्रा. ए. बी. हन्नुरे यांनी भूमिका बजावली. विद्यार्थ्यांना डॉ. एस. बी. गदवाल, डॉ. आर. व्ही. दरेकर, प्रा. एस. व्ही.कुलकर्णी, प्रा. टी. डी. मसलेकर यांचे मार्गदर्शन लाभले.



## बाकलीवाल ट्युटोरियल्सतर्फे गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

बाकलीवाल ट्युटोरियल्सतर्फे जेईई (ॲडव्हान्स्ड) व एमएचटी-सीईटी २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून आयआयटी, एनआयटी, आयआयआयटी, सीओईपी, व्हीजेटीआय तसेच राज्यातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळिवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार हिराचंद नेमचंद वाचनालय येथे झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ट्युटोरियल्सचे प्रमुख अभिषेक सिन्हा होते, तर उद्योजक व समाजसेवक किशोर चंडक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. चंडक यांनी विद्यार्थ्यांनी सातत्य, शिस्त आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या बळावर देशासाठी नाविन्यपूर्ण कार्य करण्याचे आवाहन केले. अभिषेक सिन्हा यांनी विद्यार्थ्यांना सक्षम अभियंता व जबाबदार नागरिक घडविणे हेच संस्थेचे ध्येय असल्याचे सांगितले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी यशाचा प्रवास, अभ्यासाचे नियोजन व स्पर्धा परीक्षेच्या तयारीचे अनुभव मांडून कनिष्ठ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# दोन बैठका... दोन भूमिका... अपेक्षा मात्र एकच !

### खा. डॉ. ज्योती वाघमारे यांचा समन्वयाचा मंत्र तर खा. प्रणिती शिंदेंचा जाब

सोलापूर महापालिकेत प्रथमच एकाच दिवशी दोन खासदारांनी स्वतंत्र आढावा बैठका घेतल्या. विशेष म्हणजे, दोनही महिला खासदार...! शहराच्या विकासाच्या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही बाजूंनी प्रशासनाला वेगवेगळ्या पद्धतीने दिशा आणि धारेवर धरण्याचे चित्र पाहायला मिळाले. शिवसेनेच्या राज्यसभा खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे आणि काँग्रेसच्या लोकसभा खासदार प्रणिती शिंदे यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत शहराच्या प्रश्नांवर चर्चा केली. दोन्ही बैठका वेगळ्या होत्या, मांडणी वेगळी होती, सूर वेगळा होता पण उद्दिष्ट एकच होते ते म्हणजे सोलापूरचा विकास आणि नागरिकांना चांगल्या सुविधा. खा. डॉ. ज्योती वाघमारे यांच्या बैठकीत समन्वय, नियोजन आणि केंद्राच्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ यावर भर होता. प्रशासनाने लोकाभिमुख पद्धतीने काम करावे, विकासकामांना गती द्यावी, आवश्यक निधीसाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा सकारात्मक संदेश त्यांनी दिला. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन आणि पायाभूत सुविधांचा आढावा घेत प्रशासनाला दिशा देण्याचा प्रयत्न या बैठकीत दिसून आला. याउलट खा. प्रणिती शिंदे यांच्या बैठकीत थेट प्रश्न, कठोर शब्द आणि कामांबाबत जाब होता. भ्रष्टाचार, दिरंगाई, अपूर्ण कामे, नालेसफाई, आसरा पूल, मरीआई चौक रेल्वे पूल, समांतर जलवाहिनी, शुभराय आर्ट गॅलरी, तेलगू भवन अशा अनेक विषयांवर त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. जाब विचारला. २४ तासांत निर्णय घेण्याचे निर्देश देत उत्तरदायित्वाची मागणी केली.






या दोन बैठकींमधून दोन वेगळ्या शैली स्पष्ट झाल्या. एकीकडे सहकार्य आणि समन्वयाचा दृष्टिकोन, तर दुसरीकडे जबाबदारी निश्चित करून उत्तर मागण्याची भूमिका. लोकशाहीत या दोन्ही भूमिका आवश्यकच आहेत. सत्ताधारी विकासासाठी पाठपुरावा करतात, तर विरोधक प्रशासनाला आरसा दाखवतात. त्यामुळे प्रशासन अधिक जबाबदार राहते. मात्र खरा प्रश्न असा आहे की बैठका संपल्यानंतर पुढे काय ? बैठकीतील सूचना, आदेश आणि आश्वासने प्रत्यक्षात किती उतरतात, यावरच नागरिकांचा विश्वास टिकणार आहे. शहरात अद्याप पाणीपुरवठा, रस्ते, पूल, नालेसफाई आणि रखडलेल्या प्रकल्पांचे प्रश्न कायम आहेत. प्रत्येक बैठकीनंतर नवीन आश्वासने मिळतात पण नागरिकांना आता फाईलवरील निर्णय नव्हे, तर रस्त्यावर दिसणारे काम हवे आहे. सोलापूरला आज आरोप-प्रत्यारोपांपेक्षा परिणामकारक प्रशासनाची गरज आहे. लोकप्रतिनिधींची भूमिका वेगळी असू शकते पण विकासाच्या बाबतीत त्यांचे लक्ष्य एकच असले पाहिजे. प्रशासनानेही राजकीय भूमिकांपेक्षा नागरिकांच्या हिताला प्राधान्य दिले, तरच या बैठका सार्थ ठरतील. बैठका, आढावे आणि आदेश यांची कमतरता नाही तर कमतरता आहे ती वेळेत पूर्ण होणाऱ्या कामांची. विकासाचा खरा अहवाल बैठकीच्या मिनिटांत नाही, तर नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या समाधानात लिहिला जातो. विकासाला राजकारणाचे रंग नसतात तर कामांची गती असते. सत्ताधारी असो वा विरोधक, ध्येय एकच असले पाहिजे ते म्हणजे सोलापूरचा विकास.कारण शहराला वाद नव्हे, तर विश्वास देणारी कामेच आठवणीत राहतात..एका बैठकीने दिशा दिली, दुसऱ्या बैठकीने आरसा दाखवला. आता चेंडू प्रशासनाच्या कोर्टात आहे. प्रत्यक्ष कामांची नोंद नागरिक घेणार आहेत. लोकप्रतिनिधींच्या भूमिका वेगळ्या असू शकतात पण शहराचे स्वप्न एकच असते. विकास, विकास आणि विकासच...!

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### विद्या काळे यांना अस्तित्व रंगसाधक पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

प्रायोगिक, संगीत आणि बालरंगभूमीच्या संवर्धनासाठी गेली चार दशके अविरत कार्य करणाऱ्या ज्येष्ठ रंगकर्मी विद्या काळे यांना यंदाचा 'अस्तित्व रंगसाधक पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे, अशी अस्तित्व मेकर्स फाऊंडेशनतर्फे संयोजक ॲड. बसवराज सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे रंगभूमी क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. मानपत्र, स्मृतिचिन्ह, रोख रक्कम, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारासाठी ज्येष्ठ रंगकर्मी सुनील गुरव, रंगकर्मी अमोल धाबळे आणि आसावरी नारकर यांच्या निवड समितीने विद्या काळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. या पत्रकार परिषदेला अमोल ढाबळे, सचिन जगताप, सुनील गुरव, अश्फाक नदाफ, ओंकार साठे, सोहम खंडागळे, सोमनाथ लोखंडे, हर्षवर्धन वाघमारे उपस्थित होते.





### श्री संत दामाजी महाविद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**मंगळवेढा, दि. १६ जुलै-**

श्री संत दामाजी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या इयत्ता अकरावी कला,वाणिज्य,शास्त्र शाखेत प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले सत्र आरंभ प्रवेशोत्सवाची सुरवात संस्थापक स्व रतनचंद शहा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले यावेळी तिन्ही शाखेतील विद्यार्थ्यांचे व पालकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले प्राचार्य डॉ.परमेश्वर होनराव म्हणाले विद्यार्थ्यांनी शिक्षण, शिस्त, संस्कार आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधून आपले प्रमुख ध्येय गाठण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात असलेल्या ग्रंथालय,प्रयोगशाळा, जिम खाना, संगणक लॅब, राष्ट्रीय सेवा योजना तसेच विविध उपक्रम व कल्याणकारी योजनांचा विदयार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घेऊन सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन करून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी उपप्राचार्य प्रा विलास गुरव, पर्यवेक्षक प्रा. धनाजी गवळी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. विनायक कलुबर्मे यांनी केले तर सांस्कृतिक विभाग प्रमुख शैलेंद्र मंगळवेढेकर यांनी मानले.



### अकलूज येथील जि.प.शाळा मुले नंबर २ येथे वह्यांचे वाटप

**अकलूज, दि. १६ जुलै-**

स्पोर्टस क्लब व मनशक्ती केंद्र व शिवगर्जना ग्रुप अकलूज यांच्या सौजन्याने अकलूज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुले नंबर २ या शाळेत २०० पानी ३४ डझन वहयांचे वितरण अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील,सामाजिक कार्यकर्ते लालासाहेब अडगळे,अकलूज केंद्राचे केंद्रप्रमुख सुरज कांबळे यांच्या हस्ते शाळेस वहयांचे वाटप करण्यात आले. शिक्षण प्रेमी अण्णासाहेब खडके,गणेश खडके,सोहम खडके,तुषार पालखे, रणवीर खडके यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील गरिबांची मुले व त्या मुलांची गरज ओळखून या शिक्षणप्रेमींनी मुलांना वहयांचे वाटप केले. या कार्यक्रमाला तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी व विस्ताराधिकारी भक्ती नाचणे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सुकुमारी अंगुले, मनीषा बळवंतराव, तय्यब शेख, अंजली अडाणे, फातिमा मुलाणी व हजराबी बांगी यावेळी उपस्थित होत्या. सूत्रसंचालन दत्तात्रय गायकवाड यांनी केले. आभार श्रीकांत राऊत यांनी मानले.

### दारु पिऊन वाहन चालविणाऱ्यांवर बार्शी पोलिस स्टेशनची कारवाई

**बार्शी, दि. १६ जुलै-**

बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि अक्षय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेल्या अमावस्या ऑल आऊट विशेष मोहिमेअंतर्गत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच रस्ते अपघातांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने विशेष वाहन तपासणी व नाकाबंदी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान रात्रीच्या वेळी विविध ठिकाणी



वाहनांची कसून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान दारुच्या नशेत वाहन चालविताना आढळून आलेल्या चार वाहनचालकांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १८५ अन्वये कारवाई करण्यात आली. या कारवाईतील विशेष बाब म्हणजे लातूर येथून पुण्याकडे प्रवासी घेऊन जाणाऱ्या एका लक्झरी बसचा चालक दारुच्या नशेत वाहन चालविताना आढळून आला. सदर बसमध्ये सुमारे ३२ प्रवासी प्रवास करत होते. चालकाने मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवून सर्व प्रवाशांच्या जीविताशी खेळ करत त्यांचा जीव धोक्यात घातला होता. पोलिसांनी तात्काळ बस थांबवून चालकाची वैद्यकीय तपासणी केली असता तो मद्यधुंद असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्यावर मोटार वाहन अधिनियमाच्या कलम १८५ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली. विशेष मोहिमेत सुहास जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी, बार्शी, सपोनि अक्षय सोनवणे, प्रभारी अधिकारी बार्शी तालुका पोलीस स्टेशन, पो. उपनि. शिरगिरे, ग्रेड पीएसआय यावलकर, ट्रॅफिक पोना जगताप, पोना माने व पोना चौधरी यांनी सक्रिय सहभाग घेऊन सदरची कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

# पालकांनी पाल्यांवर आपली मते लादू नयेत

## जयसिंह मोहिते पाटील; शिक्षण प्रसारक मंडळातील गुणवंतांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ जुलै-**

पालकांनी आपली मते विद्यार्थ्यांवर लादू नयेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे पूढील शिक्षण घेऊ द्यावे. शिक्षण प्रसारक मंडळ गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करते. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांनी गुणवत्ता वाढीसाठी करावा, असे मत शिक्षण प्रसारक मंडळाचे जेष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

स्मृती भवन शंकरनगर येथे आयोजित केलेल्या शिक्षण प्रसारक मंडळातील इयत्ता १०वी,१२वी व रत्नाई मार्गदर्शन केंद्रातील सीईटी परीक्षेतील १२४ गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांचा सत्कार जयसिंह मोहिते-पाटील व युवा नेते सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी जयसिंह मोहिते-पाटील बोलत होते. कार्यक्रमास सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, संचालक सुभाष दळवी, नारायण फुले, पांडुरंग एकतपुरे, वसंत जाधव, बाळासाहेब सणस, उत्कर्ष शेटे आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते झाले. प्रस्ताविक संस्थेचे सचिव अभिजीत रणवरे म्हणाले, संस्थेच्या ५५ शाखेतून २५ हजार ४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत असे सांगून त्यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. इयत्ता १०वी परीक्षेत सृष्टी दोशी हिने ९९.२० टक्के गुण मिळवत संस्थेत प्रथम तर संस्कृती कोरेकर ९७.४० टक्के मिळवीत द्वितीय क्रमांक पटकावला समृध्दी बाबर हिने ९७ टक्के मिळवीत तृतीय क्रमांक पटकावला. तर १२ वीत अरबाज बागवान याने ९३.८३ टक्के मिळिवत संस्थेत प्रथम तर अपूर्वा राऊत यांनी ९१.८३ टक्के मिळिवत द्वितीय व आफरीन मोकाशी हिने ९१.५० टक्के मिळिवत तृतीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने रोख रकमेची बक्षीसेही देण्यात आली. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी, आर. आर. पाटील यांनी केले.

### माळशिरस येथील कन्या प्रशालेत साक्षरता दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १६ जुलै-**

माळशिरस येथील विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या कन्या प्रशालेत साक्षरता दिन साजरा करण्यात आला

यावेळी प्रशालेत साक्षरता दिंडीचे पूजन संस्थेचे अध्यक्ष अजय साहेबराव पाटील यांचे हस्ते करण्यात आले. या वेळी संस्थेचे सर्व संचालक , मुख्याध्यापक, शिक्षक , ब्ल्यू बर्डस, प्राथमिक व माध्यमिक विभाग त्यांचे विद्यार्थी व उपस्थित होते.नंतर साक्षरता दिंडी साक्षरता प्रचार व प्रसारासाठी प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. ही साक्षरता दिंडी प्रशाले पासून निघून बस स्थानक, मुख्य बाजारपेठ, नगरपंचायत चौक, मारुती मंदिर या मार्गावरून काढण्यात आली दिंडीमध्ये विद्यार्थ्यांच्या हातात साक्षरतेचे महत्त्व सांगणारे अनेक फलक होते. साक्षरता दिंडी प्रशालेत आल्यानंतर वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात आले.

### मागील भांडणावरून कटरने मारल्याने दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

मागील भांडणाचा राग मनात धरून कटर व लाथाबुक्क्यानी मारहाण करून दोघांना जखमी केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मोईन पठाण , शाहरूख पठाण, रेहान अत्तार, शाहरूख शेख , इम्रान पटेल आणि साहिल कुरेशी (सर्व राहणार सोलापूर ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत साहिर रशीद शेख (वय २१, रा घर, ६६/३, कालिका मंदिर, राहुल गांधी झोपडपट्टी सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी व फिर्यादीचा मित्र फजल हे सवारी मोहरम मिरवणुक पाहण्याकरीता बुधवारी सायंकाळी पोटफफाडी चौकात गेले होते.तेथे मागील भांडणाचा राग मनात धरून आरोपी मोईन पठाण यांने फिर्यादीस व त्याचा मित्र फलज यास कटरने मारून जखमी केले. यावेळी इतर आरोपींनी तुमको खल्लास करता अशी धमकी देऊन शिवीगाळ करून लाथाबुक्याने मारहाण केल्याचे फिर्यादित म्हटले आहे. पोलिस हवलदार कांबळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे.

### 'लोकमंगल'च्या कृषीदूतांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**लांबोटी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी आर्थिक पाठबळ मिळवून देणे आणि बँक कर्ज प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी दूर करणे या उद्देशाने लोकमंगल कृषी महाविद्यालय, वडळा येथील कृषीदूतांनी एक उपक्रम राबविला. महाविद्यालयाच्या रावे कार्यक्रमांतर्गत कृषीदूतांनी महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा लांबोटी येथे उपस्थित शेतकऱ्यांना बँक कर्ज प्रस्ताव अचूक व परिपूर्ण कसा तयार करावा, याबाबत मार्गदर्शन केले.

अनेकदा शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज घेताना आवश्यक असणारी कागदपत्रे, प्रस्तावाचा मसुदा आणि बँक नियमावलीची पुरेशी माहिती नसल्याने अडचणींचा सामना करावा लागतो. हीच अडचण लक्षात घेऊन कृषीदूतांनी प्रत्यक्ष बँकेच्या आवारातच शेतकऱ्यांसाठी हे मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते. या शिबिरादरम्यान कृषीदूतांनी आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव:




७/१२ उतारा, ८-अ उतारा, फेरफार, बँक पासबुक, आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव कशी करावी, याची माहिती दिली. तसेच पीकनिहाय खर्चाचा अंदाज : विविध पिकांच्या लागवडीसाठी व मशागतीसाठी प्रत्यक्ष किती खर्च अपेक्षित धरला जातो, याचे आर्थिक गणित समजावून सांगितले. हा उपक्रम लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, रावे कार्यक्रम समन्वयक अधिकारी डॉ. व्ही. टी. दावणे आणि विषयतज्ञ प्रा. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या राबविण्यात आला. या मोहिमेत महाविद्यालयाचे कृषीदूत शिवराज भोसले, प्रतीक गोडगे, विवेक इंजिनवारे, अविनाश जाधव, महेश चव्हाण आणि सुयश तंटक या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेऊन शेतकऱ्यांना कर्ज प्रक्रियेची माहिती दिली.

### दुचाकी स्लीप होऊन सिंदफळ गावच्या इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

तुळजापूर तालुक्यातील सिंदफळ येथे दूचाकी स्लीप होऊन एका पंचावन्न वर्षीय इसमाचा मृत्यू झाला.

नुरुद्दीन मैनोद्दीन शेख (वय ५५ वर्ष, रा. सिंदफळ) असे मयत दुचाकी स्वाराचे नाव आहे. ते बुधवारी दुपारी दोन वाजता मोटरसायकल वरून जात असताना सिंधफळ गावाजवळ दुचाकी स्लीप होऊन ते खाली पडून गंभीर जखमी झाले.

त्यामुळे त्यांना उपचाराकरिता मुलगा अरबाज याने येथील शासकीय रुग्णालयात सायंकाळी सहा वाजता दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान आज गुरुवारी पहाटे साडेचार वाजता मृत्यू झाला.

### बार्शी तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठीत; अध्यक्षपदी ॲड. रणवीर राऊत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जुलै-**

बार्शी तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती अखेर गठीत करण्यात आली असून, ॲड. रणवीर राजेंद्र राऊत यांची समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सोलापूरचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज्यमंत्री जयकुमार गोरे यांनी केलेल्या शिफारशीच्या आधारे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी या समितीस अधिकृत मान्यता दिली आहे.

शासनाच्या कार्यपद्धतीनुसार गठीत करण्यात आलेल्या या समितीत अध्यक्षासह १० अशासकीय सदस्य तसेच २ शासकीय सदस्य अशा एकूण १२ सदस्यांचा समावेश आहे. समितीचे अध्यक्ष म्हणून ॲड. रणवीर राजेंद्र राऊत यांची निवड करण्यात आली असून, सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



समितीमध्ये संतोष बळीराम कांबळे, अर्चना विजय चव्हाण, राहुल नवनाथ जाधवर, नागनाथ मारुती आडसूळ, महेश भिमराव गोरे, शांतीकुमार शाहू चोबे, संतोष बळवंत पाटील, अविनाश प्रमोद वाघमोडे आणि हनुमंत महादेव जाधव यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी हे शासकीय सदस्य तर तहसीलदार, बार्शी हे सदस्य सचिव म्हणून कार्यभार सांभाळणार आहेत. संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत विविध लाभार्थ्यांच्या अर्जांची छाननी, मंजुरी आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीची जबाबदारी या समितीकडे राहणार आहे. शासनाच्या निर्देशानुसार लाभार्थी निवड प्रक्रियेत कोणताही गैरव्यवहार किंवा अपात्र लाभार्थी आढळल्यास समितीचे अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांनाही शासकीय सदस्यांप्रमाणेच जबाबदार धरुन आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. बार्शी तालुक्यातील निराधार, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ पारदर्शक आणि वेळेत मिळावा, या उद्देशाने समितीची स्थापना करण्यात आल्याने या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे.

### आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी श्री भगवंत-लक्ष्मी मंदिरात पुरुषसूक्त, श्रीसूक्त व रुद्राभिषेक महापूजा

**समस्त सेवेकरी बडवे परिवाराचा धार्मिक सोहळा उत्साहात**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जुलै-**

बार्शीचे ग्रामदैवत व लाखो भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या श्री भगवंत-लक्ष्मी मंदिरात आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी समस्त सेवेकरी बडवे (पुजारी) परिवाराच्या वतीने जनकल्याणार्थ पुरुषसूक्त, श्रीसूक्त व रुद्राभिषेक महापूजा भक्तिभावाने संपन्न झाली. यावेळी देश व राज्यात भरपूर पाऊस पडावा, शेतकऱ्यांच्या शेतात मुबलक पीक यावे, जलसाठे भरुन निघावेत आणि सर्वत्र सुख-समृद्धी व आनंद नांदावा, अशी प्रार्थना श्री भगवंत चरणी करण्यात आली.

स्वस्तिश्री शालिवाहन शक १९४८, पराभव नाम संवत्सर, आषाढ शुद्ध प्रतिपदा (दि. १५ जुलै २०२६, बुधवार) या शुभमुहूर्तावर हा धार्मिक विधी पार पडला. वर्षानुवर्षे सुरु असलेल्या परंपरेनुसार आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी होणाऱ्या या विशेष पूजेचा मान वर्षभर श्री भगवंताची नित्य सेवा आणि पूजा-अर्चा करणाऱ्या समस्त बडवे (पुजारी) परिवाराला असतो. धार्मिक विधीनुसार श्री भगवंत



व माता लक्ष्मी यांना महाअभिषेक करण्यात आला. या धार्मिक सोहळ्यास समस्त सेवेकरी बडवे (पुजारी) परिवार सहकुटुंब उपस्थित होता. आषाढ महिन्याच्या प्रारंभी पार पडणारी ही परंपरा बार्शीच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवाची साक्ष देणारी असून, जनकल्याणासाठी करण्यात येणाऱ्या प्रार्थनेला विशेष महत्त्व असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

### बार्शीत माईर्स एमआयटीचे नवे डिप्लोमा अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जुलै-**

शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, नवोपक्रम आणि विद्यार्थीकेंद्री दृष्टिकोनासाठी ओळखल्या जाणाऱ्या माईर्स एमआयटी शिक्षण समूहाने बार्शी येथे अखउढए (अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली) मान्यताप्राप्त नवीन डिप्लोमा अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले आहे. या मान्यतेमुळे बार्शी व परिसरातील विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक, उद्योगाभिमुख आणि दर्जेदार तांत्रिक शिक्षणाची नवी दारे खुली झाली आहेत.

गेल्या चार दशकाहून अधिक शैक्षणिक उत्कृष्टतेची समृद्ध परंपरा असलेल्या माईर्स एमआयटी समूह देशभरात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रसिद्ध आहे. त्याच परंपरेचा वारसा जपत बार्शीतील हे नवे डिप्लोमा महाविद्यालय विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षणाचा प्रभावी संगम उपलब्ध करून देणार आहे.

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण व तांत्रिक शिक्षणाची सुवर्णसंधी**



महाविद्यालयामध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अत्याधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण सुविधा, अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकवर्ग, उद्योग क्षेत्राशी सुसंगत अभ्यासपद्धती आणि कौशल्य विकासावर विशेष भर यामुळे विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्याचे उद्दिष्ट संस्थेने ठेवले आहे. या नव्या डिप्लोमा महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी व तांत्रिक शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून, यामुळे स्थानिक उद्योग क्षेत्राला कुशल मनुष्यबळ मिळण्यास मदत होईल. असा विश्वास माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड - चाटे यांनी व्यक्त केला आहे. यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे यांनी या नवीन डिप्लोमा अभियांत्रिकी महाविद्यालयात 'विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शैक्षणिक सुविधा, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि उद्योग क्षेत्राशी सुसंगत प्रशिक्षणावर विशेष भर दिला जाणार असून भविष्यात हे महाविद्यालय तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रात उत्कृष्टतेचे नवे मानदंड प्रस्थापित करेल. असे मत व्यक्त करत बार्शी व परिसरातील विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन उज्ज्वल करिअरच्या दिशेने पहिले पाऊल टाकण्याचे आवाहन केले.



# पालखी पूर्वी महामार्ग प्रकाशमय

## माळशिरस शहराच्या वैभवात भर

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १६ जुलै-**

माळशिरस शहरातून जाणारा आळंदी पंढरपूर पालखी महामार्ग नव्याने तयार केलेल्या रस्ता दुभाजक व त्यावर बसवलेल्या एलईडी लाईट प्रकाश योजनेमुळे उजळून निघणार आहे. प्रकाश योजनेचे काम पुर्ण झाले असून शुक्रवारी दि. १७ रोजी त्यांचा प्रकाश सुरु होणार आहे. परिणामी रस्त्याची शोभा वाढून माळशिरस शहराच्या वैभवात भर पडली आहे.

शहरातून आळंदी पंढरपूर हा महामार्ग जातो, या महामार्गावरून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा जात असतो. याच मार्गावर प्रसिद्ध झोपाळू हनुमानाचे मंदिर असल्याने, तसेच शिंगणापूरला जाणाऱ्या भाविकांसह अनेक नागरिकांची वर्दळ असते. या महामार्गावर माळशिरस नगरपंचायतीतर्फे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर योजनेंतर्गत रस्ता दुभाजक केला आहे.

रस्ता दुभाजकावर नागरी दलितेतर वस्ती सुधारणा या योजनेअंतर्गत स्ट्रिट लाईट बसवली आहे. शहराच्या दीड किलोमीटर अंतरात रस्ता दुभाजक व ६७ पोलवर स्ट्रिट लाईट केली आहे. यामुळे हा महामार्ग प्रकाशमय झाला आहे.

तसेच रस्ता दुभाजकात शोभेची झाडे लावण्यात येणार आहेत. परिणामी रस्ता दुभाजक व प्रकाश योजनेमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.

### दुभाजकांत शोभेची झाडे लावणेही सूरु

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा येत्या चार दिवसात माळशिरस मुक्कामी येत आहे. सोहळ्याच्या आगमनापुर्वीच हा मार्ग प्रकाशमय झाला आहे. तसेच रस्ता दुभाजकांत शोभेची झाडे लावण्याचे कामही युद्ध पातळीवर काम सुरू आहे. पालखी सोहळ्यानंतर हे काम पुर्ण होईल.

**- आप्पासाहेब देशमुख, माजी नगराध्यक्ष, माळशिरस.**

# श्रींचे २४ तास दर्शन सुरु

## पलंग काढण्याचा धार्मिक विधी उत्साहात

▶▶ श्री विठ्ठल मूर्तीच्या पाठीशी लोड, श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ जुलै -**

आषाढी यात्रेदरम्यान होणाऱ्या गर्दीच्या अनुषंगाने यात्रा कालावधीत शुभ मुहूर्तावर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. तो विधी गुरुवारी दि. १६ जुलै रोजी उत्साहात पार पडला. श्री विठ्ठल मूर्तीच्या पाठीशी लोड, तर श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या दिल्याची माहिती मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्रींचा पलंग काढल्यानंतर काकड आरती, पोशाख, धूपारती, शेजारती आदी राजोपचार तात्पुरते बंद राहतील. मात्र नित्यपूजा, महानैवेद्य व गंधाक्षता हे नित्योपचार सुरू राहतील. दि. ०३ ऑगस्ट (प्रक्षाळपूजा) पर्यंत भाविकांना २४ तास दर्शनाची सुविधा असेल. गुरुवारी श्रींचा पलंग काढण्याचा विधीप्रसंगी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, अॅड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजी मोरे, प्रणिता भालके, अनिल अत्रे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा, विभागप्रमुख भिमाशंकर सारवाडकर तसेच पुरोहितवर्ग उपस्थित होता.

भाविकांना जलद, सुलभ व सुरक्षित दर्शनासाठी मंदिर समितीने विविध उपाययोजना राबविल्या आहेत. दर्शनरांगेत बॅरिकेटिंग व संरक्षक जाळी बसवून घुसखोरी रोखली आहे. व्हीआयपी दर्शन व टोकन दर्शन व्यवस्था पूर्णपणे बंद केली आहे. भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजाही बंद केल्या आहेत. दर्शनरांगेतील रहदारी सुरळीत राहण्यासाठी तात्पुरत्या उड्डाणपुलाची उभारणी केली आहे. तसेच अनुभवी पर्यवेक्षक, कमांडो व माजी सैनिकांची सुरक्षा व्यवस्थेत नियुक्ती, अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे निगराणी, मंदिराचे व्हीआयपी प्रवेशद्वार बंदे, सार्वजनिक सूचना प्रसारण प्रणाली, लाईव्ह दर्शन व्यवस्था आणि दर्शनरांगेत भक्तिगीतांचे प्रसारण आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. याशिवाय, श्रींच्या नित्योपचारापूर्वी दर्शनरांग योग्य पद्धतीने नियंत्रित करून दर्शन बंद राहण्याचा कालावधी कमीतकमी ठेवण्याचे नियोजन केले आहे. भाविकांना शक्य तितक्या कमी वेळेत दर्शन मिळावे यासाठी आवश्यक ती सर्व दक्षता घेतली जात असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज, संत गजानन महाराज

# पालखी भेटीचा ऐतिहासिक सोहळा शनिवारी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१६ जुलै -**

श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराजांच्या पालखीचा व श्रीक्षेत्र शेगाव येथून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचा ऐतिहासिक भेटीचा सोहळा शनिवारी (दि. १८) दुपारी १२ वाजता श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात होत आहे.

पन्नास वर्षांहून अधिक काळ अखंड सुरू असलेली ही पालखी भेटीची परंपरा सोलापूरच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि वारकरी परंपरेतील एक मानाचा सोहळा म्हणून ओळखली जाते. सोहळ्यात संत श्री गजानन महाराज आणि श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांच्या भक्तांचा प्रेम, श्रद्धा, समता आणि भक्तिभावाचा अद्वितीय मिलाफ दिसतो.

सोहह्यात संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचे मंदिरात पारंपरिक स्वागत होणार आहे. संतांच्या पादुकांचे पूजन, आरती, पुष्पवृष्टी, हरिनाम संकीर्तन आणि टाळ-मृदंगाच्या निनादात पालखी भेटीचा सोहळा होईल. या दिवशी संत श्री गजानन महाराजांना अत्यंत प्रिय असलेला पिठलं-भाकरीचा नैवेद्य अर्पण होईल. त्यानंतर सर्वप्रथम संत श्री गजानन महाराजांच्या वारकऱ्यांना महाप्रसाद देण्यात येईल. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली आहे.

शेगावहून येणाऱ्या वारकरी भाविकांच्या सोयी-सुविधा लक्षात घेऊन शनिवारी (दि. १८) सकाळी ९ वाजल्यापासून श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराजांचे दर्शन तात्पुरते बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच मंदिर परिसरात येणाऱ्या भाविकांसाठी प्रशस्त वॉटरप्रूफ शेडमध्ये बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पालखी भेटीचा संपूर्ण सोहळा सर्वांना सहज पाहता यावा यासाठी दोन मोठ्या एलईडी स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे.

### दिव्य सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन

दिव्य आणि ऐतिहासिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी सोलापूर शहर व परिसरातील भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टचे चीफ ट्रस्टी मोहन बोड्डू यांनी केले आहे.

# पालखी मार्गावरील आपत्कालीन यंत्रणा सज्ज

## अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडून इमर्जन्सी ऑपरेटिंग सेंटरचा आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आपत्कालीन व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी पालखी मार्गावरील सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्या आहेत. अपर जिल्हाधिकारी तथा इन्सिडेंट कमांडर गणेश निऱ्हाळी याच्या अध्यक्षतेखाली इमर्जन्सी ऑपरेटिंग सेंटरच्या नियोजन सुरु आहे.

इमर्जन्सी ऑपरेटिंग सेंटरच्या नियोजनाबाबत दूरदृष्य प्रणालीद्वारे आढावा बैठक पार पडली. वारी कालावधीत नागरिकांनी कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. बैठकीस जिल्ह्यातील प्रांताधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, नायब तहसीलदार, बांधकाम विभागाचे अधिकारी, नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, पुरवठा निरीक्षक तसेच महसूल, पोलीस, आरोग्य, महावितरण व इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### सात तालुक्यांत इमर्जन्सी ऑपरेटिंग सेंटर कार्यान्वित

पंढरपूर, मोहोळ, माळशिरस, करमाळा, माढा, बार्शी आणि उत्तर सोलापूर या सात तालुक्यांतील पालखी तळांवर इमर्जन्सी ऑपरेटिंग सेंटर कार्यान्वित केले आहेत. आषाढी वारीदरम्यान या केंद्रांचे कामकाज प्रभावीपणे पार पाडण्याच्या सूचना अपर जिल्हाधिकारी निऱ्हाळी यांनी दिल्या आहेत.

### २४ तास अलर्ट मोडवर राहण्याचे आदेश

कोणतीही आपत्कालीन घटना घडल्यास तात्काळ उपाययोजना करता याव्यात, यासाठी सर्व यंत्रणांनी २४ तास अलर्ट मोडवर राहून कार्य करावे, अशा सूचनाही अपर जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. पूरस्थिती, अपघात, गर्दी व्यवस्थापन, वैद्यकीय मदत, अग्निशमन यासारख्या आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी सर्व विभाग सज्ज आहेत.

### सोपविलेली जबाबदारी सर्वांनी पार पाडावी : निऱ्हाळी

बैठकीत अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना क्षेत्रभेटी देऊन पालखी मार्गावरील नियोजनाचा सातत्याने आढावा घेण्याचे निर्देश दिले. पालखी मार्गस्थ होईपर्यंत सोपविलेली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी, मुख्यालय सोडू नये, तसेच सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून कार्य करावे, असे स्पष्ट निर्देश दिले.



# वारकऱ्यांच्या सुविधांना प्राधान्यक्रम द्या

▶▶ जि.प.अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या प्रशासनाला सूचना

▶▶ पालखी मार्गावरील सुविधांची पदाधिकारी, अधिकाऱ्यांची संयुक्त पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जुलै -**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी जिल्हा परिषद पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी मंगळवारी धर्मपुरी (ता. माळशिरस) येथून संयुक्त पाहणी दौरा केला. यावेळी पालखी मार्गावरील विविध मुक्काम तळ, रिंगण स्थळे, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा व्यवस्था आणि स्वच्छतेच्या कामांचा आढावा घेण्यात आला.

संयुक्त पाहणीदरम्यान धर्मपुरी येथील स्वागत कमान व श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी विसावा तळ, पुरंदावडे व खुडूस येथील गोल रिंगण सोहळा स्थळे, पुरंदावडे प्राथमिक आरोग्य केंद्र, वेळापूर येथील पालखी मुक्काम स्थळावरील जर्मन हँगर, शौचालये व स्नानगृहे, बोंडले येथील श्री चांगावटेश्वर महाराज पालखी मुक्काम तळ, बोरगाव व पिराची कुरोली येथील श्री संत तुकाराम महाराज पालखी तळ, पिण्याच्या पाण्याचा टँकर फिटिंग पॉईंट तसेच भंडीशेगाव येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत सोपानकाका महाराज पालखी तळाची प्रत्यक्ष पाहणी केली. वाखरी येथील गोल रिंगण सोहळा स्थळाचाही आढावा घेतला. वारकऱ्यांसाठी उपलब्ध आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे पाणी, निवारा व इतर मूलभूत सुविधांची गुणवत्ता आणि तयारी तपासली. भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण केले. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठल सेवा मानून काम करण्याचे आवाहन केले. दौऱ्यात जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अमृता वाघे, पंचायत समिती पंढरपूरचे सभापती शुभम अगवणे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, विनायक सुतार तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# वारकऱ्यांसाठी ‘लाईफलाइन’ ठरणारे ‘आयसीयू’चे जाळे

## ८८ ठिकाणी सुविधा; पालखी मार्गापासून विठ्ठल मंदिरापर्यंत २४ तास आरोग्य सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जुलै -**

आषाढी वारीसाठी जिल्ह्यात विविध मार्गांवरुन लाखो वारकरी दाखल होतात. ते जिल्ह्यात येण्यापासून ते पंढरपुरात दाखल होईपर्यंत त्यांच्या आरोग्याची कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी राज्य शासनाने अत्याधुनिक आयसीयू सुविधांचे व्यापक जाळे उभारले आहे. पालखी मार्ग, पंढरपूर शहर आणि विठ्ठल मंदिर परिसरात २४ तास सज्ज असलेली ही आरोग्य व्यवस्था गंभीर रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी उभारली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या समन्वयातून उभारलेल्या व्यवस्थेमुळे वारीदरम्यान आरोग्य सेवा अधिक सक्षम बनली आहे. उष्माघात, हृदयविकार, श्वसनाचे विकार, अपघात किंवा इतर गंभीर आजारांच्या रुग्णांवर घटनास्थळाजवळच तातडीने उपचार करण्यावर भर दिला आहे.

या आयसीयूंमध्ये अत्याधुनिक व्हेंटिलेटर, मल्टीपॅरामॉनिटर, ऑक्सिजन सुविधा, प्रशिक्षित डॉक्टर, परिचारिका आणि आपत्कालीन वैद्यकीय पथके तैनात आहेत. रुग्णांची प्रकृती गंभीर झाल्यास त्यांना तत्काळ उपचार देऊन पुढील उच्चस्तरीय आरोग्य केंद्रात हलविण्याची व्यवस्थाही तयार आहे.

‘भक्तीबरोबरच आरोग्याचीही सुरक्षितता‘ हे ब्रीद प्रत्यक्षात उतरविण्याचा शासनाचा प्रयत्न सत्यात येत आहे. श्रद्धेच्या महासागरात कोणत्याही वारकऱ्याचा जीवाचीही काळजी घेण्यासाठी आरोग्य यंत्रणा पूर्ण क्षमतेने सज्ज आहे.

### अत्याधुनिक व शीघ्र वैद्यकीय मदत उपलब्ध

पालखी मार्गावर तब्बल ४३ सुसज्ज आयसीयू, पंढरपूर परिसरात १६ आयसीयू कक्ष, विठ्ठल मंदिर परिसरात २४ तास कार्यरत आयसीयू सुविधा, तसेच पंढरपूर-माळशिरस मार्गावर ५ अतिरिक्त आयसीयू कार्यान्वित केले आहेत. त्यामुळे वारीच्या संपूर्ण मार्गावर गंभीर रुग्णांना तातडीची आणि अत्याधुनिक वैद्यकीय मदत उपलब्ध होणार आहे.

# खड्ड्यांच्या विळख्यात मंगळवेढ्याचा मुख्य रस्ता

● आषाढी वारी तोंडावर असतानाही प्रशासन झोपेत

● संत गजानन महाराज पालखीचा मार्गही धोकादायक




**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १६ जुलै-**

शहरातील श्री संत दामाजी चौक ते श्री संत चोखामेळा चौक हा मुख्य रस्ता आता खड्ड्यांच्या विळख्यात सापडला आहे. आषाढी वारीसाठी या मार्गावरुन संत गजानन महाराजांची पालखी जात असते. आषाढी वारी तोंडावर आली असतानाही संबंधित प्रशासन कुंभकर्णासारखे झोपेत असून नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

मार्गावर मोठमोठे पडलेले खड्डे वाहनचालक, पादचारी, शाळकरी विद्यार्थी व वृद्धांसाठी धोकादायक ठरले आहेत. दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी, रिक्षा, बस व मालवाहू वाहने या मार्गाने ये-जा करतात, त्यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. पावसाळ्यात खड्डयांमध्ये पाणी साचल्याने गाड्यांना मोठे नुकसान होत आहे. नागरिकांना सहज दिसणारी ही गंभीर समस्या कशी प्रशासनाच्या नजरेस येत नाही, हा प्रश्न नागरिक विचारत आहेत. आषाढी वारी काही दिवसांवर आहे. शेगाव येथील संत गजानन महाराजांची पालखी या मार्गानेच शहरात प्रवेश करणार आहे. हजारो वारकरी व वाहनांची वर्दळ लक्षात घेतली तर रस्त्याची सद्यपरिस्थिती पालखीमार्गासाठी खूपच धोकादायक आहे.

स्थानीय नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते तातडीने या मुख्य मार्गाची दुरुस्ती करून खड्डेमुक्त करण्याची मागणी करत आहेत. त्यांनी आगाऊ इशारा दिला की अपघात घडल्यास पूर्ण जबाबदारी संबंधित यंत्रणांची राहील.

### तात्काळ दुरुस्ती करावी

रस्त्यांवरील खड्डे हे केवळ गैरसोय नसून नागरिकांच्या जीवाशी संबंधित बाब आहे. तरी संबंधित प्रशासनाने तात्काळ या मार्गाची दुरुस्ती केली पाहिजे.

**- सतिश दत्तू, रहिवासी.**